# माणूस

शनिवार । १५ एप्रिल १९७८ । ७५ पैसे

१९४७ मधील विभाजनाची
मागणी एका धर्मांध पक्षाकडून
झालेली होती.
वेगळ्या संदर्भात आणि वेगळ्या
आशयात तीच मागणी पुन्हा
पुढे आली आहे ती धर्म
न मानणाऱ्या साम्यवादी
पीठाकडून; परंतु त्या दोन्ही
मागण्यांमागचा हेतू
एकच आहे –
केंद्रसत्ता हतबल करण्याचा....

– दिल्ली वार्तापत्र

– सदाशिव पेठकर

जनसंघ—
रा. स्व. संघाची शक्तिस्थाने,
डाव्या पक्षातील
औपचारिक लोकशाही,
नेतृत्वाची दार्शनिक,
राजकीय व संघटनात्मक
उच्चभ्रूंना आणि
ब्राह्मणेतर जातीजमातीतील
स्वयंप्रज्ञ नेतृत्व
विकसित होऊ द्यायला
विरोध, ही आहेत....

– कॉ. शरद पाटील

– पुस्तक परीक्षण

## साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे-अंक सेहेचाळीस
१५ एप्रिल १९७८
मूल्य पंचाहत्तर पैसे



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४४३४५९
¤


# सप्रेम नमस्कार

### एक दुरुस्ती

¤ 'माणूस' दि. ४ मार्च १९७८ च्या अंकात 'तुम्हाला नशीबवान बनायचंय...?' हा वाचनीय लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यात 'मुकी बिचारी कुणी हाका अशी मेंढरे बनू नका!' म्हणून सांगणाऱ्या माधव ज्यूलियनांनी आपणाला नेमके हेच सांगितलंय" (पृ. १७) असे विधान आहे. वस्तुतः या पंक्ती अमेरिकन कवी लाँगफेलो यांच्या 'A Psalm of Life' (जीवित स्तोत्र) या काव्यातील 'Be not like dumb, driven cattle!' या पंक्तीच्या ह. ना. आपटेकृत भाषांतरित ओळी आहेत. प्रस्तुत लेखातील 'माधव ज्यूलियन' हा शब्द बरोबर नसून तो माधव जूलियन असा हवा.

**डॉ. र. वि. हेरवाडकर**

दि. ५-३-७८ मुंबई

# Now or Never

दि. ४-५ एप्रिलच्या महाराष्ट्र काँग्रेस बैठकीचे उलटसुलट वृत्तान्त वाचल्यावर जे चित्र स्पष्ट होते ते असे : दोन काँग्रेसच्या विलिनीकरणाचा वाङ्‌निश्चय झालेला आहे. मुहूर्त मात्र थोडा पुढे ढकलला गेला आहे.

चव्हाणवादी वृत्तपत्रांनी 'विलिनीकरण-वाद्यांचा फज्जा' असा आभास कितीही निर्माण करण्याचा प्रयत्न केला तरी चव्हाण या बैठकीत अलग पडले, दादा–मोहिते वगैरे महाराष्ट्र काँग्रेसचे अध्वर्यु लवकरच त्यांचा निरोप घेण्याच्या तयारीत आहेत ही गोष्ट आता लपून राहिलेली नाही.

विलिनीकरणाचा मुहूर्त पुढे ढकलला जाण्याची कारणे दोन संभवतात.

१ : चव्हाणांना लगेच रामराम म्हटले तर सर्वसाधारण काँग्रेस-कार्यकर्त्यांत नाराजी पसरते. विलिनीकरण की ऐक्य यावर शब्दच्छल माजवून काही काळ लोटू दिला तर ही नाराजी हळूहळू कमी होईल व प्रथम ऐक्यासाठी व नंतर विलिनीकरणासाठीही कार्यकर्त्यांची मनोभूमिका अनुकूल करून घेता येईल.

२ : ऐक्य म्हणा, विलिनीकरण म्हणा झाले तरी नेतृत्वाचा प्रश्न कसा सोडवायचा यासंबंधी मतभेद आहेतच. ऐक्यानंतर दादांचे मुख्यमंत्रिपद टिकून राहीलच याची शाश्वती नाही. ही शाश्वती नाही तोवर दादा तरी ऐक्याची घाई कशासाठी करतील? सुसरीबाई तुझी पाठ मऊ म्हणतम्हणत सध्याची स्थिती चालू ठेवणेच त्यांच्या दृष्टीने अधिक सोयीचे आहे.

म्हणून विलिनीकरणाचा मुहूर्त पुढे ढकलला गेला.

शिवाय बाईंना कुठे घाई आहे?

शिकार टिपलेली आहे. केव्हाही त्या गोळा करू शकतात.

¤

प्रश्न आहे श्री. शरद पवार व चव्हाणांचे नेतृत्व अद्यापही मानणाऱ्या इतर मूठभर कार्यकर्त्यांचा. या मंडळींनी तिरपुडे–दादा-मंत्रिमंडळाला असलेला त्यांचा पाठिंबा लवकर काढून घेतला नाही तर पुढे जोरदार भाषणे ठेवण्याव्यतिरिक्त फारसे काही करणे त्यांना शक्य होणार नाही, हेही त्यांनी ओळखून असले पाहिजे. अगोदरच उशीर झालेला आहे. वनवासाची भाषा व्याख्यानात वगैरे ठीक आहे; पण मंत्रिमंडळात सहभागी होऊन वनवासाची तयारी कशी काय होऊ शकणार? दादाही वनवासाची भाषा उच्चारतात; पण त्यांच्या या वनवासाच्या भाषेवर जसा फारसा कुणी विश्वास ठेवीत नाही तसे पवारगटाचे होऊ नये. घाव घालण्याचे खरोखरच या गटाच्या मनात असेल तर हीच वेळ आहे. दिवस लोटतील तसे मंत्रिमंडळ स्थिरावेल व गटही फुटू लागेल. शिवाय अखिल भारतीय पातळीवरील एकीकरणाचा किंवा विलिनीकरणाचा रेटाही वाढत जाईल.

एक खरे आहे, की जनता पक्षाला श्री.

पवार हे प्रतिगामी पक्ष मानीत असल्याने दादा-मंत्रिमंडळातून बाहेर पडल्यावर त्यांना अगदीच एकाकी वाटचाल करावी लागणार आहे; पण अखिल भारतीय पातळीवर श्री. यशवंतराव चव्हाण जर एकाकी वाटचाल करू पाहत असतील तर महाराष्ट्राच्या पातळीवर श्री. पवार व अन्य चव्हाणनिष्ठ यांनीही अशा वाटचालीची तयारी ठेवायला हवी. राजकारणात काहीच नित्याचे नसते. शक्तिकेंद्रे बदलतात. गटांची अदलाबदल होते. अशा एखाद्या गटाशी संधान बांधून महाराष्ट्रात चव्हाणवादी मंडळी योग्य त्या संधीची वाट पाहणे पसंत करतात, की दादा-तिरपुडे-मंत्रिमंडळाला स्थिरावू देतात यावर येथील पुढचे राजकारण अवलंबून आहे. त्यातल्या त्यात तिरपुडे यांची चाल तर भलतीच आक्रमक आहे. ही चाल आणखी थोडी यशस्वी ठरली तर कर्नाटकात देवराज अरस यांना लाभलेले स्थानही ते प्राप्त करून घेऊ शकतील. तिरपुडे यांनी वसंतरावदादांशी जमवून घेतलेले दिसते. त्यांचा मुख्य रोख यशवंतराव चव्हाण व त्यांची पाठराखण करणारा पवारांचा गट यावर आहे, हे आजवरच्या त्यांच्या निवेदनांवरून पुरेसे स्पष्ट झालेले आहे. गृहखात्याबरोबर सहकारखातेही तिरपुडे यांनी आपल्याकडे घेतले आहे ते उगाच नाही. हे खाते हातात असल्याने उद्या ते वसंतरावदादांनाही चाप लावू शकतात व यशवंतरावांना दिल्लीत व पवारांना मुंबईतच रोखून धरू शकतात. तेव्हा पवारांना टोला हाणायचाच असला तर ही वेळ आहे. उडी अंधारातली आहे; पण इंदिरा गांधींशी दोन हात करण्याची उमेद बाळगणाऱ्यांनी अंधाराला भ्यायचे सोडून दिले पाहिजे. फॅसिझमच्या प्रतिकारासाठी पवार व त्यांचा लहानसा गट वचनबद्ध आहे. जनता पक्ष त्यांना फॅसिस्ट-प्रवृत्तीचा वाटतो. इंदिरा काँग्रेसचे फॅसिस्ट स्पष्ट आहे. दोन्ही आघाड्यांवर राजकारणी लोक एकदम लढणे सहसा पसंत करीत नाहीत; पण यशवंतरावांनी अ. भा. स्तरावर व पवारांनी महाराष्ट्राच्या पातळीवर या दोन्ही आघाड्यांवर लढण्याच्या निदान घोषणा तरी केलेल्या आहेत. जनता पक्षाच्या वाटा बंद केल्या गेल्या आहेत. अंधारात उडी मारण्याची आता टाळाटाळ केली, तर तिसरा मार्ग एकच उरतो–वसंतरावदादांचा – यशवंतराव मोहित्यांचा. हा मार्ग श्री. पवार व त्यांचे अन्य सहकारी यांनी निर्विवादपणे ठोकरला आहे असे ४–५ एप्रिलच्या महाराष्ट्र काँग्रेसच्या सभेवरून तरी छातीठोकपणे म्हणता येत नाही. विलिनीकरणाला पवारांनी विरोध केला; पण ऐक्याला पाठिंबा व्यक्त केला. उद्या दिल्लीहून ऐक्याचा खलिता आला तर पवार त्याचा स्वीकार करतील असे मानायचे का? मग फॅसिझमविरोधी लढण्याच्या उद्घोषित भूमिकेचे काय?

भोवऱ्याचा वेग वाढत चालला आहे आणि जोराने हात मारून वेळीच बाहेर पडले नाही तर गटंगळ्या खाण्याशिवाय दुसरा कोणता पर्याय असू शकतो?

**Now or Never.**

—श्री. ग. मा.

---

# केरळचा रवी वायलर

---

एक संध्याकाळ! नेहमीचीच!!

दोन दिवसांपूर्वीच वर्तमानपत्रात 'काहीही परिणाम भोगावे लागले तरी इंदिरा गांधींबरोबर जाणे नाही' अशी थाटात मुलाखत देऊन मोकळा झालो होतो. अर्थात तशी तयारी होतीच; परंतु कुठलीही गोष्ट तत्त्व म्हणून स्वीकारल्यावर सुद्धा एक सार्वजनिक कार्यकर्ता म्हणून त्याची व्यावहारिक गणिते स्वतःशीच मांडीत बसलो होतो. उत्तर सापडत नव्हते. मनात विचार आला, समुद्रावर चक्कर मारू या. तेव्हढेच मोकळे वाटेल. तयारी केली. निघणार, इतक्यात निरोप आला वायलर रवी भेटीसाठी येत आहेत. वाट पहात बसलो. वाटलं, अशा वेळी वायलर रवींचं येणं हे एका दृष्टीने बरंच झालं. कारण त्याची भेट आणि गप्पा दरवेळी काही तरी सांगून जाणारी असते. गप्पा म्हणजे तो बोलतो आणि आपण ऐकायचं. आपल्या एका प्रश्नाला लांबलचक व त्याच्या विशिष्ट दाक्षिणात्य हिंदी–इंग्रजीतून लांबलचक उत्तर देतो आणि प्रश्न विचारायला लागलाच की, कोर्टातल्या उलटतपासणीसारखा विचारतो. स्वारी मोठी बिलंदर! त्यागही तसाच मोठा आहे. इंदिरा गांधी आणि संजय गांधी यांचे संबंध देशभर पोवाडे गायिले जात असताना, संजयच्या सभेसाठी दोन–दोन लाख लोक जमविले जात असताना, आमच्या राज्यात संजयजी केव्हा येतील यासाठी दिल्लीदरबारी मुख्यमंत्री आणि प्रांताध्यक्षांची रीघ लागत असताना, संजयचा शब्द हा भारतीय राजकारणात अखेरचा शब्द असताना, संजय गांधींनी स्वतः आखलेला केरळचा दौरा 'हे संजय गांधी काँग्रेसचे कोण?' असा सवाल करून दौरा रद्द करायला लावणारा हा कलंदर! युवक काँग्रेसचाच कार्यक्रम घ्यायचा असेल तर तो अंबिका सोनींचा घ्या, कारण त्या अध्यक्षा आहेत असे ठणकावून सांगणारा रवी आम्हा दोस्तांना नेहमीच एक आकर्षण होऊन राहलंय. ज्या वेळी आम्ही गप्प होतो, त्या वेळी तो ठणकावून आपल्या मनातले विचार मांडीत होता. आता आम्हीही बोलके झाल्यावर त्याची प्रतिक्रिया समजावून घेण्यात मजा वाटत होता.

नेहमीच्या पद्धतीनं धाड्कन दरवाजा उघडून तोंडाचा तोफखाना चालवीतच तो आत आला. पांढरीशुभ्र लुंगी, शुभ्र कुडता. बडबड चालूच. आल्या आल्या पहिले वाक्य आपल्या लकबीत फेकतो, 'साला ठीक हुवा. कोभी तो मराठा जिंदा है, मैं समझा सब मर गया क्या' याचा अर्थ शरद पवार व आम्हा समविचारी आमदारांची इंदिरा काँग्रेसमध्ये न जाण्याची स्टेटमेंट्स त्यानं वाचली असावीत.

'अरे क्यू भाग रहे भाओ?' उलट प्रश्न करून तोच बोलतो, 'क्या हरहमेशा कुर्सीपर बने रहना इसकोही पॉलिटिक्स कहते हैं? देखो भाई विनायक, अब मॅडमके साथ जाना, it is like doing vasactomy on yourselves by your own hands on T. V. और अगर उसके साथ जानाही था, तो दो

महीनेके पहले ऐसा कौनसा आयडॉलॉजिकल डिफरन्स था की उसको अलग कर दिया. अगर उसमें कोई आयडॉलॉजी हो तो अब क्या फर्क हुवा है ? According to me the only difference is Madam got seventy seats in Maharashtra ? तो उससे डर गये ? 'मला आता हा अजिबात बोलू न देता अशीच हजामत करीत राहणार, आणि त्याचा तो अधिकार आहेच. कारण ६७ साली कॉंग्रेसचे केवळ नऊ आमदार असताना केरळात पक्षाचा झेंडा घेऊन उभा राहणाऱ्या रवीने ७८ साली स्वतःच्या पक्षाचा मुख्यमंत्री केलाय्. त्याची आर्थिक परिस्थिती आणि महाराष्ट्रातील सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या परिस्थितीत तशी बरीच तफावत. नाही म्हटलं तरी दोन्ही वेळच्या जेवणाची भ्रांत नसलेले आम्ही कार्यकर्ते. ६७ साली केरळात किरकोळ विक्रीचे दुकान थाटून खांद्यावर कॉंग्रेसचा झेंडा घेतलेला व केरळी राजसत्तेला आव्हान देणारा हा एक आदमी सडकका ! परिणामही भोगावे लागलेच. मोर्चे काढणे, मोर्चात भाग घेणे म्हणून पोलिसांची मारहाण आलीच. दुकानाचीही नासधूस, शरीरावर जखमा आणि दुकानही विस्कळित; पण खांद्यावरचा झेंडा आणि मन मात्र खंबीर होतं. त्या वेळेपासून केरळ प्रांत कॉंग्रेसांतर्गत स्वतंत्र विचारांचा आणि अभिव्यक्तीचा बालेकिल्ला समजला जाऊ लागला. मी रवीला म्हणालो, 'रवी, अरे, आम्ही आता कोणतीही राजकीय किंमत द्यावी लागली, तरी श्रीमंतीच्याबरोबर जायचं नाही असं ठरवलंय्. तसं जाहीर स्टेटमेंटही केलंय्. तू आता कृती झाल्यानंतर ती कशी योग्य आहे हे समजावून सांगतोयस. आमचे दोर कापले गेले आहेत. आता पुढं काय ते सांग !'

'*अरे बाबा !* वास्तविक या लढाईत बिनीचे सैनिक महाराष्ट्रातील कार्यकर्ते होतील अशी आमची अपेक्षा. तोंड केरळने फोडले. ठीक आहे; पण तुम्ही या लढाईत सामील झाला नसता तर केरळ हे युद्ध एकाकी लढला असता; पण यशाची खात्री नव्हती. परवाच आमच्या प्रांतात एका युवक मेळाव्यात त्यांचा हुरूप वाढावा म्हणून महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचा एक मोठा संच आपल्याबरोबर आहे असं मी ठणकावून सांगितलं. तुमच्या कोणाबरोबर बोलणं झालं नव्हतं; पण आत्मविश्वास होता. तो खरा ठरला. शरद पवारांची भूमिका समजल्याबरोबर पहिल्या विमानानं मुंबईस आलो. फॅसिस्ट वृत्तीच्या या आक्रमणाची पाहिजे तशी गंभीर दखल अजूनही महाराष्ट्रानं घेतलेली दिसत नाही. राज्य मिळविणं आणि टिकविणं याच्या हिशेबातच तुम्ही सारे मश्गुल दिसता. आणीबाणीच्या काळात गप्प होता. आता तरी बोला !'

रवी असं काही तरी बोलून जातो आणि आतड्याला पीळ पडतो. 'एका राष्ट्रीय पक्षाची मालकी एका व्यक्तीकडे आणि त्या पक्षामार्फत ती व्यक्ती देशाचीही मालक होऊ पाहाते याला आपली पिढी विरोध करणार आहे की नाही ? राहू थोडा वेळ सत्तेच्या बाहेर. भोगू थोडा राजकीय वनवास! विनायक, सत्ता मिळाली नाही तरी ज्या वेळी हिंदुस्तानातल्या फॅसिस्ट विरोधी प्रवृत्तींचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळी निदान एखादी ओळ तरी आपल्यासाठी राखून ठेवलेली असेल ! या सत्ताधाऱ्यांची नावं वर्तमानात *असतील, इतिहास त्यांची नोंद घेईलच* असं नाही !' रवी बोलत होता. मला दिलासा तर मिळत होताच; पण सुखावतही होतो.

मी रवीला विचारलं, 'रवी, बाईबरोबर जाणं नाही. एक मार्ग तर थांबलाच. आता पुढं काय ?'

'इंदिराजींचं पुनरागमन हे फॅसिस्ट वृत्तीचं पुनरागमन आहे. यावर तू जर खंबीर असशील तर या वृत्तीला थोपविण्यासाठी आपल्या शत्रूचा शत्रू तो आपला मित्र अशा विशाल भूमिकेवरच आपण या आक्रमणाचा मुकाबला केला पाहिजे !'

—विनायक पाटील

आमदार, निफाड

---

# विलंब का ?

□ भट्टी मजदूर आंदोलनाची श्री. निशिकांत भालेराव यांनी दिलेली सविस्तर माहिती हृदयाला पीळ पडणारी वाटली. (माणूस : दि. २५ मार्च ७८ अंक) असला काही प्रकार स्वातंत्र्योत्तर काळातही चालू राहवा आणि तो थांबविण्यास आंदोलन करावे लागावे हें सारेच घृणास्पद आहे. आपण खरोखरीच स्वतंत्र झालो आहोत का ? की परकीयांच्या दास्यातून मुक्ती ही स्वजनांच्या दास्यासाठी केलेली होती ? *राजकारणात गढलेल्या* निरनिराळ्या पक्षप्रतोदांनी ही चळवळ उचलून धरली पाहिजे आणि भट्टी कामगारांवरचा अन्याय संपुष्टात आणला पाहिजे. हे नवीनच प्रकरण वाचून मात्र वाटले; आपण *काही प्रगती केली आहे यात समाधान मान*ण्यात अर्थ नाही. अशी अनेक क्षेत्रे अजूनही असण्याची शक्यता आहे, की ज्याकडे कुणाचे लक्ष गेले नसेल.

१०–१२ वर्षांची लहान मुले हॉटेलात सकाळी ६ पासून रात्री १० वाजेपर्यंत राबतात. हॉटेल मजदूर युनियन तो जॉइन करू शकत नाही. कारण मालक लगेच काढून टाकतील. विना नोकरी ते राहू शकत नाहीत. कारण दारुडा किंवा परागंदा झालेला बाप असून नसल्यासारखाच असतो. आईची आसवे बघवत नाहीत. मग साप्ताहिक सुट्टी न देणारा व १४–१६ तास राबवून घेणारा मालक त्यांना चालतो. २० रुपये वेतनात तीनशेसाठ तास राबणारा नोकर मालकालाही चालतो. त्याला त्याचा जाब कुणीही (अगदी सरकारी अधिकारी देखील !) विचारू शकत नाही. हे महाराष्ट्रातच नव्हे तर सर्वत्रच चालते. राजकारण्यांना हे का दिसत नाही ?

'समाजवादी साथी गाती' म्हणायला किंवा दक्ष, आराम करायला हरकत नाही; पण ह्या गाण्यांनी हृदये पेटत नसतील, स्वार्थाच्या बाबतीत दक्ष आणि परदुःखाच्या बाबतीत आराम अशी अवस्था असेल तर केवळ शारीरिक क्रिया यापलीकडे ह्या गोष्टींना अर्थ काय ?

भांडवलदारधार्जिणे सरकार अधिकारावर आहे हा सूर आजवर कॉंग्रेसच्या नावाने लावण्यात येत होता, व काय केले गेले पाहिजे याची बौद्धिके होत होती. आता तरी सरकार तुमचे आहे ना ? मग तुमची तत्त्वे, प्रणाली यांना अंमलात आणण्यास विलंब का ? एखादा झंझावात सुटल्याप्रमाणे तुम्ही अन्यायांवर तुटून का पडत नाही ? हा प्रश्न विचारला गेला पाहिजे.

समाजातले अन्याय शेवटी राजकारणी दूर करू शकतील का ? की मानवतावादाचा झेंडा मिरविणारे आधुनिक संत हे करू शकतील ? कारण शेवटी सामाजिक अन्यायाचा शेवट हा मूलतः मानवतावादाच्या उदयाचाही प्रश्न आहे.

— जयंत प्र. तारे

२५–३–७८ उल्हासनगर–४

# अवती - भवती

शरद कृष्णन्

## □ इंदिरा गांधी........एक बोचरे प्रश्नचिन्ह

इंदिरा गांधी यांनी म्हटल्याप्रमाणे आक्रमक भूमिका घेण्यास प्रारंभ केला आहे. कर्नाल पोटनिवडणुकीमध्ये पराभूत होऊनही इंदिरा काँग्रेसचे बळ वाढले आहे. 'शहा आयोग एक नाटक आहे' अशा अर्थाच्या भितो-पत्रकांनी नवी दिल्ली रंगवून-संजय गांधी आयोगा-समोर हजर झाले आणि केवळ नाटकच नव्हे तर चांगला तमाशा करून आपण जिकल्याच्या थाटात कोर्टातून बाहेर पडले ! कर्नाल निवडणूक-निकालाने अधिकृत काँग्रेसची उरली-सुरली इज्जत काढून घेतली असून या पक्षाला सध्या तरी जनतेत स्थान मिळणे कठीण असल्याचे सिद्ध केले आहे. शहा आयोगाविरुद्ध वातावरण नेऊन पुढे त्यातूनच जनता-पक्ष व सरकार या विरुद्ध उग्र आंदोलन उभे करण्याची तयारी इंदिरा काँग्रेसमार्फत चालू आहे. त्यांच्या प्रयत्नांना मिळणारा प्रतिसाद लक्षात घेतला तर इंदिराजी हे एक बोचरे प्रश्नचिन्ह आहे असेच मानावे लागेल. इंदिराजींना कोणत्या ना कोणत्या खटल्यात अडकवून तुरुंगात पाठवायचे आणि लोकसभा निवडणुका लढविण्या-पासून त्यांना वंचित करायचे असे जर जनता पक्षाने ठरविले तर त्याचे काय परिणाम होतील आणि त्यात जनता पक्षाला कितपत यश मिळेल याची चर्चा दिल्लीत चालू आहे. बाईंवरील जुना खटला पुन्हा उकरून काढून त्यांची हकालपट्टी करता येईल का याचाही कानोसा घेतला जात आहे. त्या दृष्टीने या प्रश्नाची नेमकी कायदेशीर बाजू काय आहे हे जाणून घेण्यास जनताही उत्सुक आहे. लोकप्रतिनिधित्वाचा या संदर्भातला जो कायदा आहे तो असा की, *न्यायालयाकडून ज्या व्यक्तीची तुरुंगात पाठवणी करण्यात आली आहे अशा व्यक्तीचा* शिक्षाकाळ दोन वर्षांचा असेल, तर शिक्षा भोगून झाल्यानंतर पाच वर्षेपर्यंत अशा व्यक्तीला निवडणूक लढविता येणार नाही. मात्र ही शिक्षा-आर्थिक गुन्हेगारी, औषधातील अथवा अन्नधान्यातील भेसळ अथवा तस्करीविषयक कायदे यांचा भंग केल्याबद्दल असेल तर शिक्षेचा काळ जरी सहा महिन्यांइतका कमी असला तरी संबंधित गुन्हेगाराला शिक्षा भोगून आल्यानंतर सहा महिनेपर्यन्त निवडणूक लढविता येणार नाही. कायद्याचा हा संदर्भ लक्षात घेतला तर इंदिराजींना पाच वर्षे निवडणुकीपासून दूर ठेवण्यासाठी किमान दोन वर्षांची शिक्षा होणे जरूर आहे. शपथपूर्वक निवेदन करण्यास नकार दिल्याबद्दल शहा आयोगाने त्यांच्याविरुद्ध जो दावा दाखल केला आहे त्या संदर्भात त्यांना जास्तीत जास्त ६ महिन्यांचा तुरुंगवास होऊ शकेल. कदाचित एक हजार रुपयांचा दंड भरून त्यांची सुटका होईल अथवा दंड व सहा महिन्यांची कैद अशा दोन्ही शिक्षा त्यांना ठोठावण्यात येतील. अशी शिक्षा झाली तरी त्या निवडणूक लढ-विण्यास अपात्र ठरू शकत नाहीत. उलट या सहा महिन्यांच्या तुरुंग-वासामुळे *त्यांची लोकप्रियता वाढण्याचीच शक्यता जास्त !* म्हणजेच लोकशाही मार्गाने सत्तेवर येण्यापासून त्यांना दूर ठेवण्याच्या दृष्टीने हे खटले निरुपयोगी आहेत. समजा, जनता पक्षाने कायदा करून या संदर्भातील मुदत दोन वर्षांवरून सहा महिन्यांवर आणली तर केवळ इंदिराजींना अडकविण्याच्या दृष्टीने हे बदल करण्यात आले आहेत असा समज होऊन जनता पक्षाबद्दल नाराजी वाढेल आणि या बदललेल्या कायद्याची तुलना अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालानंतर इंदिराजींनी स्वतःच्या बचावासाठी जे कायदेबदल कर-वून घेतले त्याच्याशी होऊ शकेल. लोकशाहीच्या गप्पा मारणारे जनता सरकार जर असा कायदेबदल करण्यास पुढे सरसावले तर असंतोषाची लाट उसळल्यावाचून रहाणार नाही.

शहा आयोगाने जो अंतरिम अहवाल दिला आहे त्यामध्ये माजी पंतप्रधानांना दोन-वर्षांची अथवा त्याहून जास्त शिक्षा होईल असा पुरावा पुढे आलेला नाही. आणीबाणीची घोषणा हाच एक जुलूम होता असा निष्कर्ष या अहवालात काढण्यात आलेला असला तरी त्याचा आधार घेऊन इंदिराजींविरुद्ध विद्यमान कायद्याप्रमाणे कोण-ताही खटला लावता येत नाही. कारण आणीबाणीची घोषणा हा एक राजकीय निर्णय होता. लोकशाही प्रथा जाणूनबुजून मोडून काढल्या यासाठी शिक्षेची तरतूद असलेले कलम नाही. घटनात्मक तरतुदींचा भंग केल्याबद्दलचा खटला जर सरकारने यशस्वीरीत्या चालविला तर कदाचित काही तरी निष्पन्न होऊ शकेल. एखाद्या आयोगाने जर एखाद्या व्यक्तीला दोषी ठरविले तर सरकार जोपर्यंत काही कारवाई करीत नाही तोपर्यन्त आयोगाच्या अहवालाला अर्थ नसतो. म्हणजेच आयोगकायद्यान्वये नेमण्यात आलेला कोणताही आयोग त्याने दोषी ठरविलेल्या व्यक्तीस शिक्षा देण्यास समर्थ नसतो. *त्यामुळे शहा आयोगाने काहीही निष्कर्ष काढले तरी खटले दाखल* करूनच त्यातून अखेरची वाट काढावी लागेल.

असाही एक विचार आहे की, *निवडणूक-कायद्यामध्ये दुरुस्ती* करावी आणि अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयापूर्वी ते जसे होते तसे स्वरूप त्यांना पुन्हा प्राप्त करून द्यावे व मग इंदिराजीं-वरील जुनाच खटला उकरून काढावा. या बाबतीत कायदाखात्याचे माजी राज्यमंत्री सय्यद महमंद म्हणतात – आपल्या घटनेप्रमाणे एकाच व्यक्तीवर एकाच गुन्ह्याखाली दोन वेळा खटला लावता येत नाही. बाईंच्या जुन्या खटल्यावर सर्वोच्च न्यायालयाने एकदा निर्णय दिला असल्याने तोच खटला पुन्हा उकरून काढता येणार नाही. आणीबाणीच्या काळात जॉर्ज फर्नांडिस यांच्या खटल्याचे काम पहाणारे स्वराज कौशल म्हणतात– लोकसभेने एक ठराव करून गेल्या तीन वर्षांमधील निवडणूक-दाव्यांचे पुनरावलोकन

करावे, असा निर्णय घ्यावा, म्हणजे इंदिराजींचा जुना खटला पुन्हा उभा राहू शकेल. इंदिरा गांधींची निवडणूक वैध ठरविताना सर्वोच्च न्यायालयाने केवळ बदललेल्या कायद्याचा संदर्भ देऊन निवडणुकीचा निकाल दिला होता. खटल्यातील पुराव्याचा त्या वेळी विचारही करण्यात आला नाही. त्यामुळे इंदिराजींविरुद्धचा जुना खटला पुनरावलोकनासाठी निघाल्यास आणि समोरील पुराव्याची छाननी करून आणि आता बदललेल्या कायद्याचा संदर्भ लक्षात घेऊन तो सर्वोच्च न्यायालयात चालविला गेला तर तो बाईंच्या विरुद्ध जाईल असेही कौशल यांना वाटते. ज्या गुन्ह्यांचे निमित्त करून इंदिराजींना अटक करण्यात आली आणि न्यायालयाने त्यांची बिनशर्त मुक्तता केली ते खटले जर सबळ पुराव्यासह उभे राहिले आणि बाईंच्या विरोधात गेले तर मात्र त्यांना दोन वर्षांपेक्षा अधिक काळ शिक्षा होऊ शकेल आणि निवडणूक लढविण्याचा हक्क त्यांना गमवावा लागेल आणि अशा पद्धतीने केल्या गुन्ह्याबद्दल शिक्षा भोगण्यासाठी जर त्यांची तुरुंगात रवानगी झाली तर मात्र त्यांना या तुरुंगवासाचा लक्षणीय राजकीय लाभ मिळू शकणार नाही. ◻

## ◻ संजय गांधी—तोच उद्धटपणा—तसेच वर्तन

संजय गांधींबद्दल काहीही प्रश्न इंदिराजींना विचारला की, त्या म्हणतात, ‘ राजकारणातून निवृत्त होण्याची त्याने घोषणा केली आहे आणि खोटे बोलण्याची नेहरू घराण्याची परंपरा नाही.’ यानंतर त्या संजयबद्दल काहीही बोलत नाहीत. संजयच्या निवृत्तीची अशी जाहिरात करण्यात येत असली तरी, प्रत्यक्षात संजय गांधी इंदिरा काँग्रेसच्या कारभारात लक्ष घालतात असे दिसते. अर्थात आणीबाणीच्या काळात जसे वर्चस्व त्याने गाजविले तसे वर्चस्व आज त्याला गाजविता येत नसले तरी संधी मिळाली की, त्याच्या जुन्या उद्धटपणाची आठवण यावी असे वर्तन तो करतो. इंदिरा काँग्रेसचे सरचिटणीस म्हणून बुटासिंग यांची नेमणूक झाली त्या वेळी पंजाबच्या माजी मुख्यमंत्र्यांनी या नेमणुकीला आक्षेप घेताच संजय ताडकन म्हणाला— चूप बसा हो तुम्ही ! आणि ग्यानी झेलसिंग यांची स्वारी चुपचाप झाली. संजय राजकारणामध्ये नसला तरी तो आपल्या आईच्या पाठीमागे सावलीसारखा असतो आणि त्याच्या या पाठपुराव्याला इंदिराजी हरकत घेत नाहीत. त्यामुळे निरीक्षक असे म्हणतात की, संजयची स्वारी राजकारणात नसल्याचे वारंवार सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्षामध्ये अनेक महत्त्वपूर्ण निर्णयात त्याचा सहभाग असतो. आजही इंदिरा काँग्रेसशी एकनिष्ठ असलेली काही मंडळी या गोष्टीला मान्यता देतात. डी. पी. सिंग यांचे उदाहरण देता येण्यासारखे आहे. राज्यसभा निवडणुकांचे वेळी तिकिट देण्याचे आश्वासन खुद्द इंदिराजींनी त्यांना दिले होते; परंतु प्रत्यक्ष निवडणुकीची वेळ आली त्या वेळी त्यांची वर्णी लागू शकली नाही. आपल्या उपेक्षेमागे संजय गांधी आणि अन्य बदनाम मंडळी आहेत हे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. इंदिराजींना लिहिलेल्या पत्रात त्यांनी असा स्पष्ट उल्लेख केला की, तुमच्या भोवती असलेली मंडळी इतकी प्रभावी आहेत, की तुम्ही स्वतः दिलेल्या वचनांची पूर्तता करणेही तुम्हाला कठीण होऊन बसले आहे. डी. पी. सिंग यांना तिकिट न मिळण्यामागे संजय गांधी यांचा कितपत हात होता हे अद्यापी स्पष्ट झालेले नसले तरी याबाबतीत संजयने ढवळाढवळ केली असाच त्यांचा ग्रह झालेला दिसतो. याउलट इंदिरा—आख्यान लावण्यात तरबेज असलेले वसंत साठे अगदी शपथेवर सांगतात की, संजय गांधी यांचा राजकारणाशी आता काहीएक संबंध नाही. ते म्हणाले की, संजयने स्वतःला राजकारणापासून कटाक्षाने दूर ठेवले आहे. काँग्रेस एक असताना अधिवेशनाची मागणी आम्ही पुढे रेटली त्या वेळेपासून मी संजय गांधी यांना पक्षाच्या कामात दखल देताना अजिबात पाहिलेले नाही. मी स्वतः त्याच्याबरोबर राजकारणासंबंधी कधीही चर्चा केलेली नाही अथवा आमच्या पक्षाचा अन्य कुणी नेता त्याच्याबरोबर चर्चा करतो आहे असेही मी कधी पाहिले नाही. आता साठे यांच्यावर या बाबतीत विश्वास किती ठेवायचा हे शेवटी वाचकांनी ठरवायचे; पण संजय प्रत्यक्ष राजकारणामध्ये भाग घेत नसावा याचा पुरावा म्हणून ‘ सोशॅलिस्ट युवक काँग्रेस ’कडे बोट दाखविता येईल. सोशॅलिस्ट युवक काँग्रेस ही इंदिरा काँग्रेसची युवक शाखा. अरुणकुमार हे या संघटनेचे प्रमुख आहेत. जुन्या काँग्रेसमध्ये संजय गांधी यांच्याकडे ज्या वेळी युवक काँग्रेसची सूत्रे होती त्या वेळी ज्यांची संजयच्या आदेशाप्रमाणे हकालपट्टी झाली अशी अनेक मंडळी आज इंदिरा काँग्रेसच्या युवकशाखेमध्ये दिसतात. याचा अर्थच असा की, संजय गांधी राजकारणामध्ये लक्ष घालीत नसावेत आणि समजा लक्ष घालीत असले तरी त्यांच्या विचाराला पहिल्यासारखे महत्त्व राहिलेले नसावे.

असे असले तरी इंदिरा काँग्रेसची ताकद ज्या प्रमाणात वाढत जाणार, त्या प्रमाणात संजयचे सामर्थ्य वाढत जाणे ही एक अगदी अपरिहार्य गोष्ट आहे असा एक विचार संजयचा पुरस्कार करणाऱ्या काही तरुण पक्षकार्यकर्त्यांकडून करण्यात येतो. संजय योग्य वेळी राजकारणामध्ये येईल आणि आता येईल तेव्हा अधिक आत्मविश्वासाने येईल असा त्यांचा दावा आहे. संजयवर विश्वास असणाऱ्या तरुणांची संख्या काही कमी नाही असे या गटाकडून नेहमी सांगण्यात येते. याउलट यापुढे चार पावले जाऊन बोलणारा गट तर म्हणतो की, संजयची राजकारणनिवृत्ती हे केवळ नाटकच आहे. लोकक्षोभाची धार कमी व्हावी यासाठी आपण राजकारणातून निवृत्त होत असल्याचे त्याने घोषित केले असले तरी आतून त्याचे काम पद्धतशीरपणे चालू आहे. तो इंदिरा काँग्रेसच्या कामात प्रत्यक्ष सहभागी होतो. गरज भासेल तेव्हा तो पक्षाला आणि आपल्या आईला योग्य तो सल्लाही देतो. अनेक संसद-सदस्य आणि काँग्रेसनेते त्याच्या भोवती-भोवती करीत असतात आणि संजय हा अखेरीस संजयच राहणार आहे. तो खऱ्या अर्थाने आणि पूर्ण वेगाने राजकारणात ओढला गेला तर संजय आणि त्याच्या भोवतालची राजकारणी मंडळी यांच्या परस्पर सहकार्यातून एक त्रासदायक गट निश्चितपणे उभा राहू शकेल असे वाटते आणि इंदिरा काँग्रेसला या गटाचा पुरेसा उपद्रवही होईल.

◻

## □ राज्यांची वाढती भूक— एक त्रासदायक बाब

राज्यांना अधिक प्रमाणावर स्वायत्तता मिळाली पाहिजे असे आग्रहाने सांगणाऱ्या मंडळींमध्ये केवळ ज्योती बसू, शेख अब्दुल्ला किंवा एम्. जी. रामचंद्रन यांच्यासारखे मुख्यमंत्रीच आहेत असे नाही. वाढत्या प्रमाणात हे अधिकार राज्यांना मिळाले पाहिजेत असे मत राष्ट्रपतींनीही व्यक्त केले असल्याने याबाबतीत ताठर भूमिका घेणाऱ्या पंतप्रधानांना राज्यांची स्वायत्ततेबाबतची वाढती भूक ही एक त्रासदायक बाब ठरली आहे. अंदाजपत्रकी अधिवेशनाच्या प्रारंभी राष्ट्रपतींनी जे भाषण केले त्यामध्ये या प्रश्नाबाबत मतप्रदर्शन होते. प्रजासत्ताकदिनाच्या निमित्ताने राष्ट्रपतींचे जे आकाशवाणीवर भाषण झाले त्यामध्येही या प्रश्नांचा उल्लेख होता. तथापि मोरारजीभाईंनी हे दोन्ही उल्लेख काढून टाकणे भाग पाडले. राज्यांना अधिक स्वायत्तता दिली तर देशाच्या एकजिनसीपणावर त्याचा परिणाम होईल असे त्यांना प्रामाणिकपणे वाटते आणि म्हणूनच या विषयाला राष्ट्रपतींनी स्पर्श करू नये अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली आणि ती मानण्यातही आली. तथापी प्रश्न समजावून घेऊन, त्यावर चर्चा करून तोडगा काढण्याऐवजी तो दडपून टाकण्याची वृत्ती पंतप्रधानांनी दाखविली ती अनेक मंडळींना रुचली नाही. हा प्रश्न निघालाच आहे तर त्यावर विस्ताराने चर्चा व्हावी आणि केंद्र-राज्यसंबंधांचीच फेरतपासणी व्हावी असे अनेक मुख्यमंत्र्यांना वाटते. त्यांच्या या विचाराचे पडसाद राष्ट्रीय विकास परिषदेच्या बैठकीमध्येही उमटले आणि केंद्र-राज्य आर्थिकसंबंधाबाबत एक समिती नेमावी असाही निर्णय घेण्यात आला आणि तरीही ज्योती बसूंनी राष्ट्रीय विकासपरिषदेच्या अहवालाला मान्यता देण्याचे नाकारले. असा प्रकार या बैठकीमध्ये प्रथमच घडला. त्रिपुराचे मुख्यमंत्रिपद भूषविणारे डावे–कम्युनिस्टनेते या बैठकीच्या अखेरीस असेही म्हणाले की, राज्यांच्या स्वायत्ततेची मागणी केवळ माझाच पक्ष करतो आहे असे नव्हे, हेही या बैठकीत पुरेशा स्पष्टपणे नोंदले गेले. या प्रश्नाबाबत त्रिपुराच्या मुख्यमंत्र्यांची भावना चांगलीच तिखट असल्याने त्यांनी आपल्या राज्याच्या विधानसभेमध्ये राज्य-केंद्र-संबंधावर राष्ट्रीय पातळीवर चर्चा व्हावी आणि राज्यांना अधिक प्रमाणावर आर्थिक स्वातंत्र्य मिळेल अशा सुधारणा घटनेमध्ये करण्यात याव्यात असा ठरावही मंजूर करून घेतला. जनता पक्षाचे मित्रपक्ष म्हणवणाऱ्या डाव्या कम्युनिस्टांनी केंद्र-राज्य-संबंधाचा प्रश्न धसाला लावण्याचे ठरविल्यानंतर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्र्यांनी अनेक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पत्रे लिहिली होती आणि अशा सवलती मिळविण्यात यश आल्यास राज्यामध्ये सत्तेवर असणाऱ्या शासनाला भरपूर लाभ मिळणार असल्याने अनेक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी प. बंगालच्या मुख्यमंत्र्यांकडून आलेल्या पत्राला अनुकूल प्रतिसाद दिला. पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल याबद्दल लिहिलेल्या पत्रात म्हणतात, 'राज्य-केंद्र-संबंध हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. म्हणूनच याबाबतीतील गेल्या ३० वर्षांचे अनुभव लक्षात घेऊन त्यावर चर्चा करण्यास व आवश्यकता वाटल्यास योग्य त्या सुधारणा करण्यास काहीही हरकत नाही. जनता पक्षाचे सरकार असलेल्या राजस्थानचे मुख्यमंत्री लिहितात, बलशाली केंद्रसरकार व सामर्थ्यवान राज्यसरकार ही आजची गरज आहे. आर्थिक बाबीमध्ये अधिक विकेंद्रीकरणाची निश्चितपणे आवश्यकता आहे. तथापी आर्थिक विकेंद्रीकरणाची ही प्रक्रिया राज्यपातळीवर थांबू नये, तर जिल्हापातळीपर्यंत ती व्यापक करावी. म्हणजे स्थानिक गरजा लक्षात घेऊन गुंतागुंतीच्या आर्थिक प्रश्नावर त्याच पातळीवर तोडगा काढता येईल.

थोडक्यात सांगायचे तर आज जे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न आहेत त्यात या एका नव्या प्रश्नाची भर पडली आहे. गेल्या निवडणुकांनंतर केंद्रीय पातळीवर जे बदल झाले ते लक्षात घेतले तर या प्रश्नावर आता अधिक मनमोकळी चर्चा होऊ शकेल असे वाटले होते; परंतु पंतप्रधानांना अशी चर्चा नकोच असल्याने हा प्रश्न थोडा बाजूला पडल्यासारखा दिसत असला तरी प. बंगालच्या मुख्यमंत्र्यांनी या विषयावरील आपले म्हणणे नेटाने लावून धरले असून त्यांना मिळणारा वाढता पाठिंबा लक्षात घेतला तर राष्ट्रीय विकासमंडळाच्या बैठकीत अर्ध्यावर तुटलेले हे प्रकरण चंडीगढ येथील बैठकीमध्ये जास्त वेगाने मार्गी लागेल आणि आता या विषयाबाबत काहीशी उदासीनता दाखविणाऱ्या केंद्रशासनाला अनिच्छेने का होईना पण या चर्चेत उतरावे लागेल. □

## असे ऐकिवात आहे की . . .

□□ प. बंगालचे माजी मुख्यमंत्री सिद्धार्थ शंकर रे यांची सारी व्यवस्था बिर्ला पहातात. बिर्लांच्या न्यायालयामधील कामकाजाची जबाबदारी श्री. रे व त्यांच्या पत्नी माया रे यांच्यावर आहे. या कामाच्या बदल्यात रे दांपत्यांना देशाच्या कोणत्याही भागात फिरण्यासाठी विमानखर्च, उत्तम निवास यांची व्यवस्था करून देण्यात आली असून व्यवसाईन कामाबद्दल दरमहा दहा हजार रुपयेही देण्यात येतात. या वकिली व्यवसायामध्ये परत आल्यामुळेच आपली आर्थिक परिस्थिती सुधारली असून आपण जर मुख्यमंत्री राहिलो असतो तर आपली अवस्था कठीण होती असे रे म्हणतात. पाच वर्षांच्या मुख्यमंत्रिपदामुळे मी जवळजवळ कंगाल झालो होतो असे म्हणणारे आणि आज बिर्लांच्या सेवेत गर्क असणाऱ्या या माजी मुख्यमंत्र्यांचे राजकीय हालचालींवर चांगलेच बारीक लक्ष असते. इंदिराजींनी निवडणुका जिंकल्या मात्र त्यांनी लगोलग दोन तारा ठोकल्या. पहिली स्तुतिसुमनांचा वर्षाव करणारी चार पानी तार इंदिराजींना आणि दुसरी इंदिरा कांग्रेसबरोबर कांग्रेसचे तातडीने विलिनीकरण करण्यात यावे अशी सूचना करणारी तार कांग्रेस अध्यक्षांना !

□□ इंदिराजींचा पराभव करून उदंड कीर्ती संपादन केलेले भारताचे आरोग्यमंत्री राजनारायणजी रायबरेलीच्या दौऱ्यावर गेले असताना, कोणा विश्वासाच्या माणसाने कानगोष्ट सांगितली. राजनारायणजींच्या कानात तो हळूच पुटपुटला—नेताजी, आपली कालची लोकप्रियता आज येथे पहावयास मिळत नाही आणि आजची लोक-

प्रियता आपल्यासंबंधीच्या आणखी दोन बातम्या कानी आल्या की, उद्या टिकत नाही ही घसरण अशीच चालू राहिली तर पुढल्या निवडणुकांपर्यंत... राजनारायण शांतपणे त्यांच्या कानात कुजबुजले... पुढच्या निवडणुकांची मी कशाला काळजी करू ? इंदिराजींनी या मतदारसंघासाठी एवढे केले त्यांच्याशी नमकहरामी करणारा हा मतदारसंघ मला साथ देईल या भ्रमात मी नाही. पुन्हा मतांसाठी मी या मतदारसंघात येत नाही हे नक्की समजा ! मूळ कानगोष्ट करणारा धूर्त सहकारी आपल्या नेत्याच्या या बिनतोड उत्तरानंतर चुपचाप बसला !

▫ ▫ दिल्लीच्या जामा मशिदीचे शाही इमाम एक नवीन राजकीय पक्ष स्थापन करण्याच्या विचारात आहेत. आपल्या या पक्षाला कितपत पाठिंबा मिळतो याची चाचपणी करण्यासाठी सभा घेण्याचा त्यांनी सपाटा चालविला आहे. अल्पसंख्य जमातींचा-- विशेषत: मुसलमानांचा-- आपल्याला पाठिंबा मिळेल असा विश्वास त्यांना वाटत असून लवकरच लखनौ अथवा दिल्ली येथे आपल्या तमाम पाठिराख्यांचा एक मेळावा त्यांनी बोलावला आहे. दरम्यान मौलानासाहेबांनी आपल्या दौऱ्यात विविध ठिकाणी जी भाषणे केली ती प्रक्षोभक व जातीयवादाला खतपाणी घालणारी असल्याची तक्रार काही राज्यसरकारांनी केली असून उत्तर प्रदेश व बिहार या राज्यांनी तर याबाबत खटला दाखल करण्याची तयारी चालविली आहे. अर्थात दोन्ही राज्यांत जनता पक्षाचे सरकार असल्याने केंद्र सरकारच्या सल्ल्यानेच आगामी पाऊल टाकले जाईल असे दिसते आणि केंद्रसरकार तरी आज इमामसाहेबांना दुखविण्याच्या मन:स्थितीत नाही.

▫ ▫ महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची काँग्रेस एकीकरणाच्या संदर्भात जी बैठक झाली त्या सभेमध्ये बोलताना यशवंतराव म्हणाले, एकीकरणाला माझा विरोध आहे, विरोध आहे, विरोध आहे ! कोणत्या का कारणामुळे होईना पण साहेबांनी इतका सुस्पष्ट नकार दिल्यामुळे वसंतराव नाईक गालातल्या गालात हसले. त्यांच्या शेजारी बसलेल्या दादांना या हास्याचा अर्थ लागेना. कारण यशवंतरावांच्या भाषणाला कोणताही प्रतिसाद द्यायचा नाही असे ठरले असताना नाईकसाहेब हसले कसे याचे दादांना आश्चर्य वाटले. सभा आटोपल्यावर न राहवून त्यांनी नाइकांना त्या मिस्किल हास्याचे कारण विचारले. त्यावर नाईकसाहेब असे म्हणाल्याचे समजते की, यशवंतरावांबरोबर मी इतकी वर्षे राजकारण केले; पण कधीच त्यांनी सुस्पष्ट भूमिका घेतली नाही. हयातभर थोडे इकडून थोडे तिकडून बोलणाऱ्या साहेबांना एकदा तरी निग्रही भूमिका स्वीकारताना पाहिले आणि मला हसू आले ! नाईकसाहेबांच्या या उत्तरानंतर दादा आणि नाईक दोघेही मनमोकळे हसले !! ▫


प्रसिद्ध झाले

# पश्चिमेचे पुत्र

रवींद्र पिंगे

ऑस्कर वाइल्ड
अर्नेस्ट हेमिंग्वे
विन्स्टन चर्चिल
एडगर वॉलेस
......

पश्चिमेच्या या प्रतिभावंतांची
सुंदर व्यक्तिचित्रे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.
मूल्य : चवदा रुपये

# पक्ष बैठका

## समस्या, पवित्रे व प्रवाह

वा. दा. रानडे

विधानसभा निवडणुकीनंतरच्या परिस्थितीचा विचार करून नव्याने पक्षबांधणी करण्याच्या दृष्टीने प्रमुख राजकीय पक्षांच्या महत्त्वाच्या बैठका नुकत्याच झाल्या. निवडणुकात जनता पक्षाला अपेक्षित यश मिळाले नाही याबद्दल राजनारायण यांनी चंद्रशेखर यांच्यावर उघड टीका केली होती. चरणसिंग गटाच्या काही खासदारांनी तर चंद्रशेखर यांच्या राजिनाम्याची मागणी करणारे पत्रक काढले. हे सर्व थांबवून पक्षात ऐक्य व शिस्त कशी निर्माण करता येईल हा जनता नेत्यांपुढे मुख्य प्रश्न होता. पार्लमेंटरी बोर्डात या प्रश्नावर चर्चा झाली; पण एकमत झाले नाही. तेव्हा मोरारजी देसाई, चरणसिंग, जगजीवनराम, अटलबिहारी बाजपेयी आणि पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर या पाच नेत्यांनी एकत्र बसून सर्व अडचणींचा, तक्रारींचा, मतभेदाच्या मुद्द्यांचा विचार करून निर्णय घ्यावेत असे ठरले. हे पंचायतन म्हणजे पक्षाचे सामुदायिक नेतृत्व असल्याचे वर्णन करण्यात आले. सरकारी कारभारात आणि पक्षाच्या कार्यपद्धतीत त्यामुळे अधिक सुसूत्रता आणि शिस्त येईल अशी अपेक्षा आहे.

हा उपक्रम स्वागतार्ह असला तरी काही प्रश्नांबाबत स्पष्ट भूमिका व संकेत आताच निश्चित करायला हवेत. सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे जनता पक्ष प्रामुख्याने विधिमंडळात कार्य करणारा पक्ष बनणार आहे की, विधिमंडळातील कार्य हे त्याच्या अनेक कार्यक्षेत्रांपैकी एक क्षेत्र राहाणार आहे? संपूर्ण क्रांतीचे जयप्रकाशांचे उद्दिष्ट साधायचे असेल तर केवळ विधिमंडळाची आघाडी पुरेशी नाही. विधायक कार्य आणि अन्यायाविरुद्ध शांततापूर्ण संघर्ष या आणखी दोन आघाड्यांची त्याला जोड द्यावयास हवी; पण या दोन्ही आघाड्या आज जवळजवळ थंडावल्या आहेत. पक्षसंघटनेचे कार्यही दुर्लक्षित राहिले आहे. जनता पक्षही काँग्रेसप्रमाणेच केवळ निवडणुका लढविणारा आणि सत्तेच्या राजकारणात रस घेणारा पक्ष बनणार की काय अशी शंका येऊ लागली आहे. सर्व महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी जे पंचायतन नेमले, त्यात चार केंद्रीय मंत्री असून फक्त चंद्रशेखर मंत्रिमंडळाबाहेरचे आहेत. त्यामुळे पक्षाच्या निर्णयावर व धोरणांवर संसदीय शाखेचाच प्रभाव राहण्याची शक्यता आहे. दुसरी जाणवणारी गोष्ट म्हणजे या पंचायतनाच्या घटनेत समाजवाद्यांना का डावलले? समाजवादी नेत्यांपैकी कोणीही याबद्दल तक्रार केलेली नाही हा त्यांचा थोरपणा; पण महत्त्वाचे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत समाजवाद्यांचा सहभाग राहणार नाही, ही गोष्ट योग्य आहे काय, असे कार्यकर्त्यांच्या मनात आल्याशिवाय राहणार नाही.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची बैठक ही दुसरी महत्त्वाची घटना, इंदिरा काँग्रेस पक्षाशी एकीकरण की त्यात विलिनीकरण हा बैठकीपुढे मुख्य प्रश्न होता. इंदिरा काँग्रेसला मान्य होत असेल तर एकीकरणाच्या हालचाली करण्याबाबत पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने निर्णय घ्यावा असा ठराव अखेर पास झाला; पण ठरावाप्रमाणे कृतीची थोडीही शक्यता दिसत नसल्याने एक अर्थहीन ठराव असेच त्याचे वर्णन करावे लागेल. इंदिरा काँग्रेसला एकीकरण नको आहे. पक्षाच्या ऐक्यापेक्षा स्वतःचे नेतृत्व इंदिरा गांधींना अधिक महत्त्वाचे वाटते. त्यासाठी तर काँग्रेसमध्ये फूट पाडून त्यांनी वेगळा पक्ष काढला. दक्षिणेतल्या निवडणुका त्यांनी जिंकल्या. यावरून देशाच्या काही भागावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अजूनही प्रभाव आहे हे मान्य करायलाच हवे; पण त्यांची कार्यपद्धती हुकुमशाही प्रवृत्तीची आहे याचा एकदा पुरेपूर अनुभव आल्यानंतरही लोक त्यांच्यामागे का धावत आहेत? आणि हे धावणारे लोक कोण आहेत? सत्तेच्या मागे लागलेली मंडळी आणि दलितवर्ग मुख्यतः यात आहे. सत्ताकांक्षी मंडळींना वाटले की जनतापक्षाला इंदिरा काँग्रेस हाच पर्यायी पक्ष आहे आणि जनता पक्षाबद्दलचे असमाधान लक्षात घेता काही वर्षांत इंदिरा काँग्रेसच पुनः सत्तारूढ होण्याची शक्यता आहे. दलितवर्ग इंदिरा गांधींचे मागे जाण्याचे कारण आपणच दलितांच्या खऱ्या कैवारी हा आभास निर्माण करण्यात इंदिरा गांधींना यश आले आहे. दलितांबद्दलचा त्यांचा कळवळा खरा नसून तो देखावा आहे हे दलितवर्गाला पटविण्यात जनता नेत्यांना यश आलेले नाही. याचे कारण दलितांच्या विकासाचा कार्यक्रम जनता सरकार धडाडीने अंमलात आणीत असल्याचे दिसत नाही.

रेड्डी काँग्रेस जवळजवळ नामशेष झाल्यासारखीच आहे. कर्नाटक निवडणुकीत त्यांच्या उमेदवाराला अवघी २८०० मते मिळावीत यावरून दक्षिणेप्रमाणे उत्तरेतही रेड्डी काँग्रेसला काही स्थान राहिलेले नाही. एकीकरण-विलिनीकरणाचा शब्दछळ करीत न बसता रेड्डी काँग्रेसच्या आमदार-खासदारांचा ओघ इंदिरा काँग्रेसकडे वळू लागला आहे. लोकसभेत आपला पक्षच प्रमुख विरोधी पक्ष झाला असल्याचा दावा डाव्या इंदिरा काँग्रेसचे नेते स्टीफन यांनी केला असून हा लेख प्रसिद्ध होईपर्यंत यशवंतराव चव्हाणांनी विरोधी पक्षाचे नेतेपद गमविल्याची बातमीही येईल. चव्हाणांच्या राजकीय जीवनाची ही शोकांतिकाच म्हटली पाहिजे; पण या परिस्थितीला ते स्वतःच जबाबदार आहेत. इंदिराविरोधाची खंबीर भूमिका त्यांनी प्रथमपासूनच घेतली असती तर हा प्रसंग आला नसता. महाराष्ट्र काँग्रेसवरही त्यांची काही पकड राहिली नाही हे प्रदेशकाँग्रेसच्या बैठकीवरून स्पष्ट झाले आहे. एकीकरणाला ठाम विरोध करण्याच्या भूमिकेपासून यशवंतरावांना माघार घ्यावी लागली. शरद पवारांची राणा भीमदेवी थाटाची भाषणे म्हणजे पोकळ आवेशच ठरला. काँग्रेस आघाडीचे मंत्रिमंडळ बनविण्यास चव्हाणांनी मान्यता दिली हीच चूक झाली; पण आपण विरोध केला तरी आपले कोणी ऐकणार नाही हे चव्हाणांना कळून चुकले होते. आपल्यातील जे आमदार इंदिरा काँग्रेसला मिळतील त्यांना मंत्रिपद दिले जात नाही ना एवढे तरी पहा अशी अजीजी करण्याची पाळी चव्हाणांवर यावी हे त्यांच्या नेतृत्वाचा अस्त झाल्याचेच निदर्शक आहे. रेड्डी काँग्रेसमधून जनता पक्षाला पर्यायी पक्ष उभा राहण्याची आशा आता पूर्णपणे नष्ट झाली आहे.

मलपृष्ठ २ वर

# डाव्या कम्युनिस्टांचा कावेबाज मनसुबा

सदाशिव पेठकर

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष स्वतःला जनता पक्षाचा संसदेमधील मित्र म्हणून संबोधितो. गेल्या वर्षभरातील जनता पक्षाच्या कारकीर्दीत मार्क्सवादी कम्युनिस्टांनी जनता पक्षाची साथसंगत केली हेही खरे आहे; परंतु यापुढे मित्रपक्षाची भूमिका वठविण्याची डाव्या कम्युनिस्टांची तयारी दिसत नाही हे ज्योतिर्मय बसू यांच्याशी बोलताना जाणवते. ज्योतिर्मय बसू हे डाव्या कम्युनिस्ट पक्षाचे लोकसभेतील प्रमुख प्रवक्ते. त्यामुळे दिल्लीतील यापुढील राजकारणाच्या दृष्टीने त्यांच्या मतांना महत्त्व द्यावयास हवे. एका बंगाली पत्रकाराबरोबर ज्योतिर्मय बसू यांच्या घरी जाऊन त्यांच्याशी सविस्तर बोलण्याचा योग आला. लोकसभेतील बसू यांचे वक्तव्य घणाघाती स्वरूपाचे असते. शब्दच्छल न करता ते सरळ प्रतिस्पर्ध्यांवर निकराचा हल्ला चढवितात. घरच्या गप्पांमध्ये मात्र त्यांचा स्वर सहसा चढत नाही.

इंदिरा गांधी यांच्या कारकीर्दीमध्ये आणि विशेषतः आणीबाणीमध्ये जनता पक्षात संमीलित झालेल्या घटक पक्षांना जशी मुस्कटदाबी सहन करावी लागली तेवढा काच डाव्या कम्युनिस्टांच्या वाट्याला आलेला नव्हता. तरीही हा पक्ष नेस्तनाबूत व्हावा या दृष्टीने इंदिरा गांधींचे प्रयत्न शेवटपर्यंत चालू होते. तसा हा पक्ष स्वतःला अखिल भारतीय म्हणवीत असला तरी पश्चिम बंगाल आणि केरळ या दोन राज्यांपुरतेच त्याचे प्रभावक्षेत्र मर्यादित आहे. या दोन्ही राज्यांमध्ये डाव्या कम्युनिस्टांचा झगडा होता तो उजव्या कम्युनिस्ट पक्षाशी. गेल्या वर्षीच्या मार्चमधील लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी केरळ विधानसभेची निवडणूक झाली आणि तिच्यात उजव्या कम्युनिस्टांनी मार्क्सवाद्यांचा धुव्वा उडविला. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी जनता पक्षाशी केलेली युती मार्क्सवाद्यांना पश्चिम बंगालमध्ये मात्र खूपच उपयोगी पडली. तेथे मार्क्सवाद्यांनी उजव्या कम्युनिस्टांवर मात केली. त्यामुळेच मध्यंतरीच्या काळात हतबल झालेला हा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष पुन्हा एकदा नव्या जोमाने दिल्लीच्या राजकारणामध्ये प्रविष्ट झाला.

'इंदिरा गांधींच्या हुकुमशाहीला आमचा साफ विरोध असल्यामुळे लोकशाहीचे पुनरुज्जीवन करणाऱ्या जनता पक्षाला आम्ही पाठिंबा देत राहू,' असे लोकसभेच्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर ज्योतिर्मय बसू यांनी जाहीर केले होते. त्याप्रमाणे संसदेमध्ये घटनादुरुस्तीसंबंधी किंवा नागरी स्वातंत्र्य पुनश्च प्रस्थापित करण्यासंबंधी जनता पक्षाने जी जी विधेयके मांडली वा प्रस्ताव सादर केले त्यांचा डाव्या कम्युनिस्टांनी पाठपुरावा केला. त्यामुळे हा पक्ष कम्युनिस्ट असला तरी त्याला लोकशाहीसंबंधी आस्था आहे, हा समज दृढ होत गेला; परंतु आपल्यासंबंधी जनमानसामध्ये पूर्वी जो ग्रह निर्माण झाला होता तो नाहीसा करण्याच्या दृष्टीने डाव्या कम्युनिस्ट पक्षाने हा केवळ पवित्रा घेतला असला पाहिजे, असे नंतरच्या घटनांवरून दिसून येऊ लागले.

गेल्या फेब्रुवारीतील पाच राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुकीनंतर इंदिरा गांधींच्या झुंडशाहीच्या राजकारणाचा उपद्रव सुरू होण्याची शक्यता निर्माण झालेली असताना, तुमचा पक्ष पूर्वीच्या खंबीरपणाने उभा राहील ना? हा माझा प्रश्न ज्योतिर्मय बसूंना तेवढासा महत्त्वाचा वाटला नाही. त्याऐवजी ते केंद्र आणि राज्य यांच्या संबंधांची फेरआखणी केली पाहिजे याच मुद्द्यावर अधिक भर देत होते. पश्चिम बंगालचे मार्क्सवादी मुख्य मंत्री ज्योती बसू यांनी गेल्या दोन-चार महिन्यांपासून राज्यांना जास्तीत जास्त स्वायत्तता मिळाली पाहिजे यासाठी एक पद्धतशीर मोहीम हाती घेतली असून, ज्योतिर्मय बसू यांनाही ती इतर कोणत्याही प्रश्नापेक्षा अगत्याची वाटू लागली आहे.

ते म्हणाले की, सध्या राज्यसरकारांची अवस्था केंद्रसरकारचे हुकूम कार्यवाहीत आणणारी माध्यमे एवढी मर्यादित झाली आहे. जनता पक्षाने आपल्या निवडणूकजाहीरनाम्यामध्ये सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे तत्त्व मान्य केले आहे. हे सिद्धांताला प्रत्यक्ष रूप देण्याचा पहिला मार्ग म्हणणे राज्य सरकारांना आर्थिक बाबतीमध्ये म्हणजेच आपल्या विकासासाठी करआकारणी करण्याचे आणि भांडवल उभारण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे.

डाव्या कम्युनिस्टांची राज्यीय स्वायत्ततेची मागणी सध्या तरी आर्थिक बाबींपुरतीच मर्यादित आहे; परंतु हा केवळ प्रारंभ आहे. त्यांना संघशासनाकडे अधिक अधिकार देणारी सध्याची राज्यघटनाच मंजूर नाही. पुन्हा एकदा घटनासमिती बोलावून केंद्र आणि राज्ये यांच्यातील संबंधांना नवे रूप देण्यात आले पाहिजे असे डाव्या कम्युनिस्टांना वाटते. आपले हे अंतरंग आपण लगेच उघडे केले तर यदाचित सध्याच्या आपल्या लोकप्रियतेला तडा जाईल अशी त्यांना भीतीवाटते म्हणून सुरुवातीला त्यांनी महसुलाच्या वाटपाबाबत वाद सुरू केला आहे. केंद्र आणि राज्य यांच्यामधील महसुलाच्या विभागणीबाबत अर्थमंडळ जो निर्णय देते तो दोन्ही घटकांना स्वीकारावा लागतो. अर्थमंडळाच्या सूचनेनुसार सध्या हे प्रमाण ७५ आणि २५ असे आहे. म्हणजे केंद्रसरकारला करांच्या रूपाने जो पैसा मिळतो त्यापैकी एकचतुर्थांश रक्कम राज्य सरकारांना दिली जाते.

हे प्रमाण ३० आणि ७० असे झाले पाहिजे अशी राष्ट्रीय विकास मंडळाच्या बैठकीच्या वेळी ज्योती बसू यांनी मागणी केली. इतकेच नव्हे तर या मागणीचा केंद्रसरकारकडून विचार होईपर्यंत सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्याला आपण संमती देणार नाही असे सांगून ती बैठक अनिर्णित ठेवली.

राष्ट्रीय विकास मंडळाच्या बैठकीतील मुख्यमंत्री ज्योती बसू यांची ही भूमिका विशद केल्यानंतर ज्योतिर्मय बसू आपल्या संकल्पित मागणीच्या पुढच्या भागाकडे वळले. ते म्हणाले की, आपली राज्य-घटना संघराज्यपद्धतीची आहे असे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षामध्ये ती एकात्म पद्धतीची आहे. अमेरिका किंवा कॅनडा या देशातील राज्यसरकारांना काही थोडी क्षेत्रे वगळता इतर सर्व बाबतीत केंद्रशासनाइतकेच अधिकार आहेत. आपल्या देशातील राज्यांनाही तेवढे व्यापक अधिकार मिळाल्याशिवाय सध्या जे दिल्लीत सत्तेचे केंद्रीकरण झालेले आहे ते नाहीसे होणार नाही.

ज्योतिर्मय बसूंना काय अपेक्षित आहे ?

परराष्ट्रीय संबंध, संरक्षण, चलन आणि दळणवळण ही चार क्षेत्रे सोडली तर इतर कोणत्याही बाबतीत राज्यसरकारांना केंद्राचे बंधन स्वीकारावे लागता कामा नये असे त्यांना वाटते.

यामागचा त्यांचा दृष्टिकोन काय आहे ?

ते स्पष्टच सांगतात की, भारत हे एक राष्ट्र आहे असे आम्ही मानीतच नाही. अनेक राष्ट्रांचा मिळून हा एक देश झालेला आहे. म्हणून या देशातील प्रत्येक राष्ट्राला (म्हणजे राज्याला) स्वतःच्या विकासासाठी पूर्ण स्वातंत्र्य मिळायला हवे. संघशासनाबरोबरचा त्याचा संबंध अगदी किमान असला पाहिजे.

याचाच अर्थ असा की, आर्थिक आणि राजकीय स्वायत्ततेच्या गोंडस आवरणाखाली डाव्या कम्युनिस्टांना फुटीरपणाला म्हणजे एकात्मतेवर प्रहार करायला प्रोत्साहन द्यायचे आहे.

गेल्या वर्षीच्या जूनमध्ये बंगाल विधानसभेची निवडणूक झाली तेव्हा डाव्या कम्युनिस्टांनी जनता पक्षाशी निवडणूक-समझोता कर-ण्याची तयारी दर्शविली होती; परंतु आपल्याला निर्विवाद बहुमत मिळाले पाहिजे एवढ्या जागांची त्यांनी मागणी केल्यामुळे जनता पक्षाच्या पश्चिम बंगाल शाखेचे अध्यक्ष प्रफुल्लचंद्र सेन यांनी या कावेबाज समझोत्याला विरोध केला आणि जनता पक्षाने स्वतंत्रपणे निवडणूक लढविली. तिच्यात अर्थातच जनता पक्षाचा पराभव झाला. डाव्या कम्युनिस्ट पक्षाने पुढे केलेला सहकार्याचा हात सेनबाबूंनी झिडकारला. म्हणून अनेकजण त्यांच्यावर नाराज आहेत. अर्थात ही नाराजीची प्रतिक्रियाही पराभवानंतरची आहे; परंतु कम्युनिस्टां-बरोबर संमिश्र मंत्रिमंडळ स्थापन करणाऱ्या पक्षाच्या हातात प्रत्यक्षा-मध्ये काहीच उरत नाही. याचा अनुभव पश्चिम बंगालमधल्या अजय मुखर्जी यांच्या बांगला काँग्रेसने दहा वर्षांपूर्वी पुरेपूर घेतला आहे. म्हणून पराभव पत्करला, पण केवळ नामुष्की देणारी फरफट नको असा विचार करूनच सेनबाबूंनी डाव्या कम्युनिस्टांचे मतलबी सह-कार्य नाकारले. त्या वेळी जर पश्चिम बंगालमध्ये डाव्या कम्युनिस्ट पक्ष आणि जनता पक्ष यांची निवडणूकयुती झाली असती आणि तेथे संमिश्र मंत्रिमंडळ अधिकारावर आले असते तर राज्यांच्या स्वायत्ततेच्या ज्योति बसू यांच्या मागणीबाबत तेथील जनता पक्षाची अवस्था अतिशय बिकट झाली असती. कारण फुटीरपणाला प्रोत्साहन देणाऱ्या कोणत्याही मागणीबाबत नमते घ्यायची आमची तयारी नाही असे पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी निःसंदिग्ध शब्दांत अनेक वेळा जाहीर केले आहे. राज्यांच्या स्वायत्ततेबाबत केंद्रीय जनता पक्षाची एक भूमिका आणि पश्चिम बंगालमधल्या जनता पक्षाची वेगळी भूमिका अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली असती. (केवळ राजकीय सोयीसाठी संमिश्र मंत्रिमंडळाचा प्रयोग हाती घेतला की केवढी बदनामी आणि लाचारी निमूटपणे सहन करावी लागते याचा अनुभव महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील एक घटक पक्ष सध्या घेतच आहे.)

पश्चिम बंगालच्या पाठोपाठ त्रिपुरा या पूर्वेकडील आणखी एका राज्यामध्ये डाव्या कम्युनिस्ट पक्षाचे सरकार सत्तारूढ झाल्यानंतर या पक्षाच्या नेत्यांनी तोपर्यंत झाकून ठेवलेली स्वायत्ततेची मागणी पुढे रेटायला प्रारंभ केला आहे, हे या संदर्भामध्ये लक्षात ठेवायला पाहिजे.

आणि आता तर या मागणीला आणखी जोर चढण्याची शक्यता आहे.

चौदा वर्षांपूर्वी वेगळे झालेले उजवे आणि डावे कम्युनिस्ट पक्ष एकत्र येण्याची भाषा बोलू लागले आहेत.

मी ज्या वेळी ज्योतिर्मय बसू यांना भेटलो तेव्हा ते या एकीकरणा-वरून असे म्हणाले की, जोपर्यंत उजवा कम्युनिस्ट पक्ष इंदिरा गांधी यांच्या हुकुमशाहीचा निषेध करीत नाही आणि कोणत्याही काँग्रेसशी सहकार्य करण्याचे धोरण सोडून देत नाही तोपर्यंत आम्ही एकीकरणाच्या बाबतीत मुळीच तयार होणार नाही.

भटिंडा येथे नुकत्याच झालेल्या उजव्या कम्युनिस्टांच्या अधिवेशना-मध्ये इंदिरा गांधी यांनी जारी केलेल्या आणीबाणीचे स्वागत कर-ण्यात आणि त्यांची हुकुमशाही दृढमूल करण्याचा उद्देश असलेल्या बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीला पाठिंबा देण्यात आपली चूक झाली अशी कबुली देण्यात आली आहे.

याच सुमारास भटिंडापासून जवळच असलेल्या जालंधरमध्ये डाव्या कम्युनिस्ट पक्षाची बैठक भरून 'डाव्या शक्तीच्या एकत्रीकरणा'ची गरज व्यक्त करण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर जनता पक्ष हा प्रतिगामी असल्यामुळे त्याच्याशी सहकार्य करण्याऐवजी त्याला धारेवर धरण्याचे धोरण अंगीकारले पाहिजे असाही आग्रह काही प्रतिनिधींनी व्यक्त केला आहे.

त्यामुळे दोन्ही कम्युनिस्ट पक्ष लगेच एकत्र येतील असे नाही; परंतु गेल्या वर्षभरामध्ये डाव्या कम्युनिस्ट पक्षाने जनता पक्ष आणि उजवा कम्युनिस्ट पक्ष यांच्याबाबत जे धोरण अंगीकारले होते त्यात हळूहळू बदल होत जाईल आणि त्याची दखल डाव्या कम्युनिस्टांशी चुंबाचुंबी करण्यासंबंधी उतावीळ झालेल्या जनता पक्षातील नेत्यांना घ्यावी लागणार आहे. प्रतिगामी आणि पुरोगामी हे शब्द आपल्या सोयीनुसार वापरावयाचे असतात असा मार्क्सवादी परिपाठ आहे. काँग्रेस पक्ष आणि त्याच्याशी सहकार्य करणारा उजवा कम्युनिस्ट पक्ष याच देशातील खऱ्याखुऱ्या प्रतिगामी शक्ती आहेत असे काल-पर्यंत ज्योतिर्मय बसू आणि त्यांचे सहकारी म्हणत होते.

जालंदरहून परतल्यानंतर त्यांची भाषा बदलली आहे.

उजव्या कम्युनिस्ट पक्षाने ज्याप्रमाणे भटिंडा येथे एकदम कोलांट-उडी मारली तसेच काहीसे हे घडले आहे.

आता एकत्रीकरणाची भाषा बोलू लागलेले हे दोन कम्युनिस्ट पक्ष चौदा वर्षांपूर्वी वेगवेगळे का झाले, याचा विचार केला म्हणजे त्यांच्या बदललेल्या भाषेमागचा अन्वयार्थही उलगडता येतो.

१९६२ च्या ऑक्टोबरमध्ये चीनने भारतावर आक्रमण केले तेव्हा अविभक्त कम्युनिस्ट पक्षाची भूमिका एकच होती. कम्युनिस्ट देश कोणावरही आक्रमण करीत नाही (कारण युद्ध ही भांडवलशाहीची अपरिहार्य निर्मिती आहे) हा बऱ्याच वर्षांपूर्वी घोटलेला सिद्धांतच त्या वेळी कम्युनिस्ट पक्षाकडून मांडण्यात आला. नंतर चीनने भारतावर आक्रमण केले आहे असा जेव्हा सोव्हिएट रशियाने निर्वाळा दिला तेव्हा हे खरोखरच आक्रमण आहे असे रशियासंबंधी खास ममत्व बाळगणाऱ्या कम्युनिस्टांना वाटू लागले. दुसरा गट चीनधार्जिणा होता. तो आपल्या प्रेरणाकेंद्राला दोषी कसा धरणार? हा गट पुढे वेगळा झाला आणि आपणच काय ते सच्चे मार्क्सवादी आहोत हे दाखविण्यासाठी त्याने आपले नामकरण केले – 'भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी).' कालांतराने या पक्षातील काही-जणांच्या मते हा नाममात्र मार्क्सवादी पक्षही सुधारणावादी झाला आणि म्हणून त्यांनी 'भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी–लेनिन-वादी)' हे अधिक जहाल नाव घेऊन नवा पक्ष स्थापन केला. नक्षलवादी म्हणून ओळखला जातो तो हाच पक्ष. या पक्षाचा संसदीय लोकशाहीवर विश्वास नसल्यामुळे त्याला चीनकडून सर्वतोपरी मदत मिळू लागल्यापासून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष चीनपासून दूर गेला आणि आंतरराष्ट्रीय चळवळींपासून तो एकाकी पडला.

परिस्थितीचे अचूक विश्लेषण करण्यात आणि पुरोगामी शक्तींचा शोध घेण्यात मार्क्सवादासारखे दुसरे साधन नाही असे कम्युनिस्ट मानतात; परंतु त्यांचा हा तर्क खरा नव्हे हे इंदिरा गांधी यांच्या अधिकारशाहीच्या प्रारंभकाळीच दिसून आले. इंदिरा गांधींनी देशा-तील चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण करताच, ही समाजवादाची नांदी आहे असा उजव्या कम्युनिस्टांप्रमाणे डाव्या कम्युनिस्टांनीही गजर केला. म्हणूनच त्यांनी १९६९ मधल्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत इंदिरा गांधी यांनी पुरस्कारिलेल्या व्ही. व्ही. गिरी यांच्या उमेद-वारीचा पाठपुरावा केला. त्या वेळी डाव्या कम्युनिस्टांची मते जर गिरी यांना मिळाली नसती तर ते निवडून आले नसते आणि इंदिरा गांधींची हुकुमशाही तेथल्या तेथेच रोखली गेली असती. म्हणून भारतात हुकुमशाहीचा उदय होण्यातील आपला वाटा डाव्या कम्युनिस्टांना नाकारता येणार नाही. पश्चिम बंगालमधील डाव्या कम्युनिस्टांचा प्रभाव खच्ची करण्यासाठी इंदिरा गांधींनी जेव्हा प्रियरंजनदास मुनशी यांच्या छात्र परिषदेला हाताशी धरून नक्षल-वाद्यांच्या नावाखाली डाव्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना मारझोड केली तेव्हा कोठे हा पक्ष इंदिरा गांधी हुकुमशाहीचे बीजारोपण करीत आहेत असे म्हणू लागला. उजवे कम्युनिस्ट तर इंदिरा गांधी पंत-प्रधानपदावरून खाली उतरल्या जाईपर्यंत त्यांची आरती करीत होते. म्हणून आणीबाणीच्या काळात काँग्रेस आणि उजवा कम्युनिस्ट पक्ष यांच्या फॅसिझमविरोधी संयुक्त मेळाव्यांचे पेव फुटले होते.

देशातील खरी फॅसिस्ट प्रवृत्ती कोठे केंद्रित झालेली आहे याचा डाव्या आणि उजव्या कम्युनिस्टांना बोध व्हायला एवढा वेळ लागावा हीच स्वतःला डाव्या म्हणविणाऱ्या चळवळीची शोकांतिका आहे. यापैकी उजव्या कम्युनिस्ट पक्षाची आतापर्यंतची भूमिका एका दृष्टीने समजण्यासारखी आहे. हा पक्ष सर्वस्वी सोव्हिएट रशियाच्या तंत्राने नाचणारा आहे. त्यामुळे मॉस्कोहून येणारे आदेश बिनतक्रार मान्य करण्यावाचून त्याला गत्यंतरच उरत नाही. इंदिरा गांधींच्या कार-कीर्दीत भारताचे परराष्ट्रीय धोरण निश्चितपणे रशियाच्या बाजूने कललेले होते. त्या बदल्यामध्ये सोव्हिएट रशियाचे सर्वेसर्वा ब्रेझनेव्ह यांनी इंदिरा गांधी यांच्या पुरोगामी नेतृत्वाचा गौरव करावा हे ओघानेच आले. त्याचीच री उजव्या कम्युनिस्टांनी ओढली. 'डांगे लाइन' म्हणतात ती हीच.

भटिंडा येथल्या अधिवेशनामध्ये इंदिरा गांधींच्या आणीबाणीचा पुरस्कार करून आपण चूक केली अशी जी कबुली उजव्या कम्यु-निस्ट पक्षाने दिली आहे त्यामागेही रशियाचे मार्गदर्शन आहे किंवा नाही हे कळावयास मार्ग नाही. कदाचित डाव्या कम्युनिस्ट पक्षाशी सहकार्य करण्याचा मार्ग मोकळा व्हावा म्हणून अशी जाहीर माफी मागण्याची सूचना मॉस्कोहून आली नसेलच असे नाही. आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीमधून मिळणाऱ्या सहाय्याची अपेक्षा, आतापावेतो एकाकी पडलेल्या डाव्या कम्युनिस्ट पक्षालाही वाटत असावी म्हणूनच परस्परांना आपले कट्टर शत्रू मानणारे हे दोन कम्युनिस्ट पक्ष आता कोठेही, केव्हाही आणि कोणत्याही पद्धतीने दिलजमाई करण्याचा पवित्रा घेऊन उभे ठाकले आहेत. अर्थात त्यामुळे राजकीय वातावरणामध्ये एकदम बदल होणार आहे असे येथे कोणीच मानीत नाही; परंतु साम्यवादी पक्षांचे लोकशाहीप्रेम हा केवळ त्यांच्या डावपेचांचाच भाग असतो याचा पुन्हा एकदा प्रत्यय आणून देण्याचे कार्य या घटनेने पार पाडले आहे. उद्या जरी हे दोन्ही पक्ष कम्यु-निस्ट पक्ष एक झाले तरी पश्चिम बंगाल आणि केरळ या दोन राज्यांपुरतीच केंद्रशासनाला उपद्रव देण्याची त्यांची शक्ती सीमित राहणार आहे. मात्र त्याचबरोबर हेही लक्षात घ्यावयास हवे की, लोकशाहीशी वचनबद्ध झालेल्या जनता पक्षाला या संभाव्य घटनेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. इंदिरा काँग्रेस आणि रेड्डी काँग्रेस यांच्या एकत्रीकरणासाठी रेड्डी काँग्रेसचे काही नेते अधीर झालेले दिसतात. इंदिरा गांधी यांचे एकतंत्री नेतृत्व मान्य करायला कर्नाल येथल्या फजितवाड्यामुळे अधिकच हताश झालेल्या रेड्डी काँग्रेसने मान्यता दिली तर एकीकरणाच्या नावाखाली रेड्डी काँग्रेसचे इंदिरा काँग्रेसमध्ये विलिनीकरण व्हायला फारसा वेळ लागणार नाही.

तसे झाले तर जनता पक्षाला दोन आव्हाने स्वीकारावी लागतील. एक इंदिरा गांधी यांच्या हुकुमशाही प्रवृत्तीचे. (ही प्रवृत्ती जनता पक्षाला नामोहरम करण्यासाठी कोणत्या पद्धतीचे राजकारण खेळू इच्छित आहे याचे विवेचन पहिल्या वार्तापत्रात आलेलेच आहे.) दुसरे आव्हान संयुक्त कम्युनिस्ट पक्षाकडून येण्यासारखे आहे आणि त्याचे स्वरूप राज्यांच्या स्वायत्ततेच्या मागणीचे राहील, असे ज्योति-र्मय बसू यांनी त्या प्रश्नाबाबत आम्हाला जनता पक्षाशी वेळप्रसंगी दोन हात करावे लागतील असे जे म्हटले त्यावरून वाटते.

या लढाईत डावा कम्युनिस्ट पक्ष एकटा उतरणार नाही. फुटीर वृत्तीचे सगळे समर्थक तो आपल्या बाजूला वळवून घेईल. जम्मू-

काश्मीरचे मुख्यमंत्री शेख अब्दुल्ला यांनी तर कलकत्त्याला जाऊन ज्योती बसू यांच्याशी बोलणीही केली आहेत. तामीळनाडूचे मुख्यमंत्री एम्. जी. रामचंद्रन् यांनीही राष्ट्रीय विकास मंडळाच्या बैठकीत ज्योती बसू यांनी घेतलेल्या भूमिकेचा पाठपुरावा केला. पंजाबमध्ये अकाली दलाचे सरकार आहे तर केरळमध्ये काँग्रेस–कम्युनिस्ट आघाडीचे. या दोन्ही राज्यसरकारांकडून स्वायत्ततेचा पुरस्कार केला जाईल अशी ज्योतिर्मय बसू अपेक्षा व्यक्त करतात.

येथे हे लक्षात घेण्यासारखे आहे की, जे प्रादेशिक पक्ष आहेत किंवा ज्या पक्षांचे एकाच राज्यात वर्चस्व आहे त्यांनीच भारताच्या केंद्रीय शासनाचे महासंघराज्यामध्ये रूपांतर करण्याचा आग्रह धरलेला आहे. डाव्या कम्युनिस्टांना बंगालशिवाय स्थान नाही. अण्णा द्र. मु. क. ला तामीळनाडूखेरीज कार्यक्षेत्र नाही, अकाली दल हा केवळ शिखांचा पक्ष आहे. शेख अब्दुल्लांची नॅशनल कॉन्फरन्स श्रीनगरच्या खोऱ्यातच डरकाळ्या फोडीत असते आणि रेड्डी काँग्रेस नि उजवे कम्युनिस्ट यांचे संमिश्र सरकार केवळ केरळमध्येच अधिकारावर आहे. प्रादेशिक पक्ष किंवा एकराज्यीय पक्ष बलिष्ठ झाले की, ते स्वतःच्या सोयीसाठी एकत्र कसे येतात आणि आपापला सवता सुभा मजबूत व्हावा यासाठी कसे धडपडत असतात याची चुणूक लवकरच चंडीगड येथे भरणाऱ्या स्वायत्तता मागणी परिषदेवरून पहायला मिळणार आहे.

हा सगळा सोहळा राज्यांचा आर्थिक विकास, नैसर्गिक आकांक्षा, सत्तेचे विकेंद्रीकरण, उपलब्ध साधनसामग्रीचा अधिकाधिक उपयोग, सर्व विभागांची समतोल प्रगती अशा भरघोस शब्दांमध्ये साजरा होणार आहे. सुरुवातीला या मागणीचे स्वरूप आर्थिक विकासापुरतेच सीमित राहणार असले तरी केंद्रीय अधिसत्तेला आव्हान देण्याचे स्वप्न स्वायत्ततेचे पुरस्कर्ते पहात आहेत.

इंदिरा गांधी यांच्या राजवटीमध्ये राज्यांचे सारेच अधिकार केवळ कागदावर राहिले होते. मुख्यमंत्री कोणी व्हायचे हे 'मॅडम' ठरवायच्या आणि त्याप्रमाणे एखादे राव खाली उतरायचे आणि पंत गादीवर बसायचे. तशी परिस्थिती पंतप्रधान मोरारजी देसाई यांना मुळीच अभिप्रेत नाही. समर्थ केंद्रीय शासन म्हणजे दुबळे राज्य शासन असे ते मानीत नाहीत; परंतु संपूर्ण राज्यघटनाच बदलून टाकायची आणि कॅनडा–अमेरिकेच्या धर्तीवरची नवी राज्यघटना स्वीकारायची ही डाव्या कम्युनिस्टांची मागणी कोणत्याही परिस्थितीत मान्य करायची नाही हे त्यांनी स्पष्ट केले आहे. म्हणूनच ते म्हणतात की, एखाद्या मुख्यमंत्र्याशी त्याच्या राज्यातील आर्थिक अडचणींबाबत चर्चा करायला मी केव्हाही तयार आहे; परंतु राज्यांची स्वायत्तता हा राष्ट्रीय चर्चेचा विषय व्हावा हे मला सर्वस्वी नामंजूर आहे.

अखंड भारत म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ पूर्वीचा भारत अशी कोणाची भावना असेल तर असो; परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा भारत अखंड रहावा असे ज्यांना वाटत असेल त्यांनी मात्र भारत हा बहुराष्ट्रीय देश आहे आणि म्हणून या देशातील प्रत्येक राष्ट्राला कमाल स्वातंत्र्य मिळाले पाहिजे या डाव्या कम्युनिस्टांच्या गोटातून आलेल्या आरोळीमागचे कारस्थान ओळखले पाहिजे.

१९४७ मधील विभाजनाची मागणी एका धर्मांध पक्षाकडून झालेली होती. वेगळ्या संदर्भात आणि वेगळ्या आशयात तीच मागणी पुन्हा पुढे आली आहे ती धर्म न मानणाऱ्या साम्यवादी पीठाकडून; परंतु त्या दोन्ही मागण्यांमागचा हेतू एकच आहे– केंद्रसत्ता दुबळ करण्याचा.

सत्तांतराचा तपशील ठरविण्यासाठी १९४६ मध्ये ब्रिटनचे त्या वेळचे पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांनी जे त्रिसदस्य शिष्टमंडळ भारतात धाडले होते त्याने अशीच प्रादेशिक स्वायत्तता सुचविली होती आणि ज्या कारणाकरिता आज मोरारजी देसाई डाव्या कम्युनिस्टांनी मांडलेल्या प्रस्तावाला विरोध करीत आहेत. तेच कारण सांगून जवाहरलाल नेहरूंनी त्रिसदस्य शिष्टमंडळाची योजना फेटाळून लावली होती.

प्रत्येक कम्युनिस्ट देशातील केंद्रसत्ता सर्वशक्तिमान असते. तेथील घटकप्रदेशांना नाममात्रही स्वायत्तता नसते. सर्व आर्थिक आणि राजकीय निर्णय केंद्रीय नेते करतात आणि घटकप्रदेशांना त्यांची बिनतक्रार अंमलबजावणी करावी लागते. येथील कम्युनिस्टांना मात्र प्रत्येक राज्याला संपूर्ण अंतर्गत स्वातंत्र्य हवे आहे, आणि त्यासाठी लढा द्यायची भाषा ते बोलू लागले आहेत.

केंद्र आणि राज्ये यांच्या संबंधांचा आमूलाग्र फेरविचार व्हावयास हवा असे जेव्हा ज्योतिर्मय बसू म्हणतात तेव्हा वरवर वाटते तेवढी ही मागणी सोज्ज्वळ नाही हेच ध्यानात येते. (क्रमशः)

**पुढील अंकात**

# कर्नालच्या छायेत जनता पक्ष

कथा

# कोंडी

इरगोंडा पाटील

१

त्यांनी माझ्याभोवती कोंडी केलीय्. आता मी विचार करतोय, यातून मी कसे बाहेर पडावे.

पण...ही सक्ती आहे. कदाचित ही शिक्षाही असेल; पण एक खरे आहे– 'सर्वांनाच शेजाऱ्याची बायको सुंदर दिसते आपल्या बायकोपेक्षा.' असे बरेच काही तरी सकाळपासून सुचत होते. मी हे सगळे नाकारत होतो.

ऐक !

आता मी नाकासमोरून चालणारा माणूस झालोय.

'इथे बैस.'

'हूं' असे मनातल्या मनात काही तरी आले. त्याचा स्वीकार करून मी त्यांच्यासमोर गप्प बसलो.

'इकडे पहा.'

'......'

'हा हत्ती आहे.' समोर काहीच नव्हते. तरी त्यांनी मला असे सांगितले. मी नाही म्हटले नाही. केवळ हूं म्हणालो. ते खूष झाले. असे आता मी सर्वांना खूष करीत निघालोय. असे वागणे फार फायद्याचे असते. पण हे फार लवकर समजायला हवे होते.

२

ती वाटेत भेटली. गोष्ट तशी जुनीच. तेव्हा ती वाटेत भेटली हा एक योगायोग.

आता वाटते, ती तेव्हा वाटेत भेटायला नको होती.

खरंच ! मी भेटलो नसतो असे समजून चला. तेव्हा तिला कोणी तरी भेटलाच असता. फक्त मी भेटलो हाच योगायोग.

'साफ खोटे.' मीच मला जोराने बजावले. पुन्हा गुंता. कोंडी. कोंडमारा. पुन्हा अंगअंग शहारून आले.

मला असे अलीकडे वाटू लागले आहे. आपण काय–काय पुढे करणार हे कोणी तरी लिहून ठेवले असेल का ?

'ती–मी' अगर 'मी–ती' हे कसे अगदी सरळ जमून आले. म्हणजे माझ्यापुढे तीच कशी बरोबर आली ?

ती–मी हे तरी निदान खरे असावे.

असेल ! असेल ! !

३

हे विचार माझ्या मनात कोठून येतात ? कोणी तरी याचे उत्तर शोधून काढले पाहिजे.

एकदा मी ठरवलं, अगदी प्रामाणिकपणे. माझ्या मनात जे जे सगळे विचार येताहेत ते ते सगळेच लिहून काढायचे.

असं काही ठरवतो. अगदी तसा वागूही लागतो. मी लिहिलेले एके दिवशी सगळे मी वाचू लागलो. मला खरेच वाटेना. इतके विषारी विचार माझ्या मनात आलेच कसे ? पुन्हा मी हा विचार सोडून दिला. मी इतका वाईट आहे असे वाटल्याने माझी संगत मलाच नको झाली.

तेव्हापासून मलाच मी छळत निघालोय.

४

आता थोडया वेळाने एक झाड दिसेल. असे मला चालता-चालता उगीचच वाटले. याचे असेही आहे की, पुढे झाड आहे याची मला कल्पना नव्हती. ते मी पाहिलेच नव्हते. कळू लागल्यापासून असे सगळे मी ओळखत निघालोय.

माणसे कपडे बदलतात इतक्या सहजतेने मी गावे बदलत निघालोय.

आता जे गाव पाठीमागे गेले ना त्या गावाला एक नदी होती. तसं पाहायला गेलं तर जवळजवळ प्रत्येक गावाला एक नदी असते. याच्यापेक्षा आपण असे म्हणू–दुथडी भरून वाहणाऱ्या नद्यांच्या काठी गावे वसली.

काही गावांना दोन–दोनही नद्या आहेत.

काही गावांत या नद्यांचा संगमही झालाय. आता ही सगळी पवित्र स्थानं हं.

बोला ! प्रत्येक गावाला नदी आहे.

नद्या दुथडी भरून वाहतात.

पण ! इथल्या माणसांना कधीच असे अगदी भरून येत नाही ! नद्यांना पूर येतो ना अगदी तसे.

फक्त प्रत्येक गावातून नद्या दुथडी भरून वाहताहेत. माणसे मात्र अजून कोरडीच आहेत.

अरबस्तानातील वाळवंटासारखी. कितीही खोल खोदा, पाणी लागणार नाही.

५

मी समोर आरसा धरला.

नियमाप्रमाणे मला प्रतिबिंब दिसले. इथपर्यंत ठीक आहे. मी खूप वेळ माझे आरशातील प्रतिबिंब न्याहाळले आणि त्यावरूनच मी समजून बसलोय की, मी ह्या आरशातल्या प्रतिबिंबासारखा आहे.

हे माझेच प्रतिबिंब असेच मला म्हणावे लागेल.

आता मला नाही असे म्हणताच येणार नाही.

खरं म्हणजे सगळेच सांगतात म्हणून मी कबूल करून ठेवले आहे.

६

मी जगभर दृष्टी टाकली. सर्व जग मला सुंदर दिसू लागले. खरंच जग सुंदर आहे ?

होय म्हटलेच पाहिजे. मनात एक शंका आहे, 'जग सुंदर आहे की माझे डोळे सुंदर आहेत ?'

शेवटचे खरे असले तर पहिले तरी खोटे कसे म्हणायचे ? पण यातील कोणते तरी एक निश्चित करायला हवे.

अशी सगळीकडून माझी कोंडी झाली आहे.

पण...

सोसले पाहिजे.

सुखसुद्धा, सुख पचविणे फार अवघड असते.

७

'तुला मी फसविणार नाही. या आभाळाची – झाडामाडांची शपथ घेऊन सांगतोय.'

'............'

'हे सगळं मी आतून बोलतोय. आतल्या आत मला किती भडभडून येतंय्. तू आता अशी समोर उभी रहा ना. तुझ्या डोळ्यांत मलाच मी खूप शोधणार आहे. मला ठाऊक आहे तुला हे सगळे आवडणार नाही.'

'माझी शंका येते ?'

'नाही.'

'मग ? '

'मी जो कोणी आज आहे ना म्हणजे सर्वांच्या दृष्टीने [ कारण माझे मत तुला पटणार नाही ] तो तुझ्यामुळेच.'

८

नाटकाला माणसं गर्दी करीत होती. मी मनःपूर्वक सर्वांच्याकडे पाहातोय.

कधीमधी संशय येतोय सगळयाच माणसांचा. मी खूप वेळा मलाच छळतोय. कारण समाधानकारक उत्तर मला हवे असते ना.

'तू पण...नाटकाला' पाठीवर थाप आणि ओळखीचा आवाज एकदमच आला. मी त्याच्याकडे पाहिले. मला पाहून त्याला गुदमरून आले. त्याला राहावले नाही. कारण त्याच्या डोळयांच्या कडा आपोआपच ओल्या झालेल्या दिसल्या.

मला आता हे पाहावेना.

त्याला चेहरा हसरा करण्यासाठी आणि अश्रू लपविण्याने खूप त्रासाचे होत होते.

आपणाला हसता येत नसेल तर बिघडले कोठे ? हसायचे नाही.

तो माझ्याशी नाटकी का वागला ?

मनात गोंधळ चालूच आहे. तिकडे माणसंही नाटकाला गर्दी करीत आहेत.

मी त्याला मनःपूर्वक विचारले, 'तू जेवलायेस् ? ' खरं म्हणजे ही काय जेवायची वेळ नव्हे. तरी मी प्रामाणिक प्रश्न विचारतोय. लालबुंद तापलेल्या लोखंडावर लोहार ज्याप्रमाणे घाव घालतो ना अगदी तसेच त्याला झाले. त्याच्या हृदयावर हे शब्द प्रहार करून गेले.

मुखवटा पांघरून मीही नाटकाच्या गर्दीत मिसळलो. तोही बरोबर होता.

९

सकाळीच रेडिओवर कळले तो कवी देवाघरी गेला. त्याचे कोणाशी फारसे जमले नाही. एका-दुसऱ्याचा अपवाद सोडून देऊ.

पहिल्या प्रथम मला चौकातला पानवाला म्हणाला, 'तुझा दोस्त गेला...फार चांगला होता !

तसं पाहायला गेले तर तसा तो कवी माझा इतक्या जवळचा मित्र नव्हता.

तरी दिवसभर रिताच मी झालो होतो.

कवीच्या आठवणीने.

त्याची कविता मला सारखी हाकीत होती. पुट पुढे.

सगळयांनीच कबूल केलंय्. 'तो कवी कविता जगला ?

पुढे.

पुढे काय ?

आता सगेसोयऱ्यांची चंगळ.

हे मला अस्वस्थ करणारे प्रकरण.

त्याच्या कवितेसारखेच सगळे जग दुर्बोध.

१०

मुसळधार पावसात मला मी खूप भिजवून घेणार आहे.

मनापासून फार दिवसात भिजलोच नाही.

पावसात तर मला भिजायचे आहे; पण कोठेच आभाळात ढग दिसेनात.

आता पाऊस येईल ना ? आभाळात ढग नाहीत मग पाऊस कसा येणार ?

पाऊस शोधायला मी निघालोय. भेटेल का हो मला पाऊस वाटेत ?

मी असे ठरवायलाच नको होते. मी असे म्हणालो असतो तर बरे झाले असते–'पाऊस येईल ना तेव्हा मी खूप भिजणार आहे.'

याचं असं होतं जे काही करायचे असते त्याच्याविषयी निश्चित भूमिका हवी. कार्यही तपासून पाहायला हवे.

असं कुठंच कधी न ठरवल्यामुळे बरेच धोके निर्माण झाले आणि धोके घेत जगणे भाग पडले. कधी ठेचाही लागल्या. आता पहा ना 'ही सगळीच माणसे' आहेत ना, ही सर्वच आपल्या इच्छेविरुद्ध जगत आहेत. गल्ल्यावर बसलेला शेटजी सुद्धा मला काल काही तरी तक्रार सांगत होता. मी तेव्हा फक्त छद्मी हसलो; पण मनातल्या मनात हं.

आता कधी तरी पाऊस आला तर मी चिंब–चिंब भिजून नवा होणार आहे.

११

तो मनुष्य सर्वांना काही तरी सांगत होता.

पण तो इतक्या उंच आवाजात का सांगत असावा ? खरं म्हणजे त्याच्या तोंडापुढे माईकही आहे. त्याने जरा हळू आवाजात सांगितले असते तर –?

–'खोटं बोल खरं नेटाने बोल–' मी मनातल्या मनात त्याच्यावरती शेरा मारला. असे मला फार चांगले जमते.

ही सगळी माणसे थांबली आहेत.

का ठाऊक आहे ?

मी थांबलो आहे यातच त्याचे उत्तर आहे.

१२

मोठा मोर्चा. एक पुढे होता. त्याच्या हातात निशाण होते. सगळी माणसे त्याच्या मागून जात होती. तो नेईल त्या दिशेने. पाठीमागे असलेल्या कोणत्याही माणसाने तक्रार केली नाही. आताही पाठीमागून जाणारी सगळी माणसे स्वतःला लपवीत निघाली आहेत.

का ?

त्यांना वाटत असेल आपण पाठीमागे आहोत तेच बरे आहे.

१३

किती माणसे भेटली.

तितक्या माणसांनी प्रत्येकाचे थोडे थोडे शहाणपण मला दिले.

मी ते घेतलेही.

आता भोवती कोंडी झाली आहे.

निघेन का मी सुखरूप या जंजाळातून ?

पण...

प्रत्येकाची एक कोंडी वेगळीच. □




पुस्तके

# झोत : दोन प्रतिक्रिया

'असंतोष' नेहरूनगर, धुळे
३१।३।७८

श्री. श्री. ग. माजगाकर यांस स. न.

प्रा. रावसाहेब कसबेंच्या विनंतीवरून मी 'झोत'चे– रा. स्व. संघावर एका दलित विचारवंताचा द्रष्टेपणाचा प्रकाश झोत' हे परीक्षण लिहिले आहे. परीक्षण खळबळजनक, Sensational आहे.... तुम्हाला जनता पक्षाबद्दल वा जनसंघाबद्दल जवळीक असली तरी एकूण पुरोगामी चळवळीच्या हितासाठी हा लेख छापायचे धैर्य दाखवाल अशी अपेक्षा आहे. हा लेख म्हणजे माझे तर अग्निदिव्य आहे!

आपला
शरद पाटील

हे परीक्षण प्रसिद्ध करण्यात काही 'धैर्य' वगैरे दाखवण्याची गरज आहे असे 'माणूस'ला वाटत नाही. विरोधी किंवा वेगळ्या मतप्रदर्शनाला 'धैर्य' लागते ते रशिया किंवा चीनसारख्या साम्यवादी राजवटी असलेल्या देशात. आपल्याकडे सुदैवानें ही परिस्थिती अद्याप निर्माण झालेली नाही. निर्माण झाल्यास 'धैर्या'ची आवश्यकता 'माणूस'ला भासेल. तेव्हा शक्य झाल्यास श्री. पाटील यांनी ते पुरवावे.

तसेच अग्निदिव्याचे. पाटील स्वतःवर बळेबळे अग्निदिव्य ओढवून का घेत आहेत? वेगळ्या मतांसाठी या देशात 'अग्निदिव्य' आजवर कुणालाही करावें लागलेले नाही. आता तथाकथित आगरकर–प्रेतयात्रा–प्रकरणालाच 'अग्निदिव्य' वगैरे समजून लिहायचे–बोलायचे असल्यास गोष्ट वेगळी. पण सध्या त्या आनंदी–गोपाळराव जोशी यांच्याइतकीही वात्रटगिरी करण्याचा उत्साह कुणाजवळ दिसत नाही.

स्वमतसंस्थापनेसाठी खरेखुरे 'अग्निदिव्य' केल्याचे एक उदाहरण आपल्याकडे कुमारिल भट्ट याचे आहे; पण श्री. पाटील यांच्या दुर्दैवाने तो बौद्धमताचा पाडाव करणारा वैदिक ब्राह्मण होता. त्यामुळे उदाहरण टाकावू!

सनातन धर्माचे केंद्र असलेल्या काशीविश्वेश्वरमंदिराच्या पायऱ्यावरून चार्वाक आपली नास्तिक मते प्रचारित होता, अशी एक आख्यायिका आहे, त्यामुळे या बाजूने अग्निदिव्याचा धोका संभवत नाही. त्यांचे डावे पोथीबंद सहप्रवासी बिथरतील–खवळतील अशी तर भीती पाटील यांना वाटत नाही ना? पण तेही शेवटी हिंदुस्थानातले डावे आहेत. बोल्शेव्हिकांइतके क्रूर होणे त्यांना कसे जमू शकेल?

'सत्याकडे जाण्याचे अनेक मार्ग असू शकतात' ही श्रद्धा हिंदुधर्माचे अनन्यसाधारण वैशिष्टय आहे. भिन्नभिन्न मतांचा आदर करण्याची वृत्ती या श्रद्धेतून विकसित होते. 'सुगंधित ते आदरावे। बकुल वा प्राजक्त॥' हे येथील ज्ञानेश्वरमहाराजच म्हणतात असे नाही, येथल्या सामान्यातल्या सामान्य खेडुताचाही हा सहजस्वभाव आहे.

या सहजस्वभावाची, त्यामागील जीवनश्रद्धेची समाजवादी व इतर डाव्या विचारवंतांनी थोडी अधिक ओळख करून घेतली तर त्यांची रा. स्व. संघावरील व एकूण हिंदूपरंपरेवरील टीका अधिक समंजसपणाची व परिणामकारक ठरण्याची शक्यता आहे.

श्री. पाटील यांच्या परीक्षण-लेखात अवांतर मुद्दे बरेच असल्याने थोडी संपादकीय काटछाट आवश्यक होती, परंतु 'गळचेपी' झाल्याचा समज करून घ्यायला त्यामुळे वाव उत्पन्न होतो. म्हणून ही साधी संपादकीय कारवाई या लेखावर केलेली नाही.

लेख 'खळबळजनक' 'Sensational' ठरला तर उत्तमच. नाही ठरला तर श्री. पाटील यांनी फार निराश होऊ नये.

एक विनंती : यापुढे तरी लिखाणातील बोजडपणा कमी करण्याचा श्री. पाटील यांनी आवर्जून प्रयत्न करावा. असे बोजड लेख छापण्यास मात्र एक विशेष प्रकारचे 'धैर्य' (स्थैर्य!) नियतकालिकाजवळ असावे लागते. ते 'माणूस'जवळ नाही.

चुकभूल देणे घेणे.

–संपादक

प्रतिक्रिया एक

# राज्यांवर ब्राह्मण मुख्य मंत्री लादू पहाणारी व मुसलमानांविरुद्ध 'तुर्कोमान गेट' करणारी इंदिरा गांधी जनसंघ– रा. स्व. संघाच्या नेतृत्वाखालील प्रस्थापित वर्गाच्या हुकुमशाहीची पूर्वतयारी करीत आहे.

'स्रोत' या प्रा. रावसाहेब कसबेंच्या पुस्तिकेचे अनन्य वैशिष्ट्य असे की, ते रा. स्व. संघाच्या आधारभूत तत्त्वज्ञानाचे विवरण करताना आपले लक्ष भारतातील मूलभूत दार्शनिक संघर्षाकडे वेधतात–

'गोळवलकरांची इतिहासाची मांडणी पूर्णपणे चैतन्यवादी भूमिकेवर उभी आहे. चैतन्यवाद विरुद्ध भौतिकवाद हा एक जागतिक विचारक्षेत्रातील प्रमुख झगडा आहे. भारतीय परंपरेतही त्याला महत्त्वपूर्ण स्थान आहे....' (पा. ८)

## तत्त्वज्ञान व धर्म

चैतन्यवादाचे रूपांतर धर्मशास्त्रात झाले तेव्हापासून जन्मजात विषमतेचा उघडपणे प्रचार सुरू झाला, या त्याच पानावरील विधानातून ते चैतन्यवादाची परिणती अटळपणे विषमतासमर्थक धर्मात होते असे दाखवू पाहतात. या मांडणीतून चार दोष संभवतात. १. भारतीय दार्शनिक संघर्षातील या दोन मूलभूत पक्षांवर भारतीय वर्णजातिव्यवस्थेचा काहीएक प्रभाव नव्हता. २. भौतिकवाद हा धर्म वा विषमतेचा समर्थक नसतो. ३. चैतन्यवादाचे रूपांतर धर्मशास्त्रात होण्यापूर्वी तो धर्म वा विषमतेचा समर्थक नव्हता. ४. धर्मशास्त्रे रचली जाण्यापूर्वी धर्म नव्हता.

भारतीय दर्शनांची मूलभूत विभागणी नास्तिक वा अब्राह्मण आणि आस्तिक वा ब्राह्मण अशा दोन छावण्यात झालेली होती, ती वर्णजातिव्यवस्थेच्या प्रभावामुळे.

औपनिषदीय दार्शनिक उद्दालक आरुणि याचे शारीरक ब्रह्मवादी वा सर्वजीवनवादी (hylozoist) दर्शन भौतिकवादी होते; पण तो चतुर्वर्ण्यधर्माचा कडवा पुरस्कर्ता होता. महाश्रोत्रिय ब्राह्मण भौतिकवादी वा लोकायतिक असल्याचे उल्लेख प्राचीन साहित्यात वारंवार येतात; पण तेही चातुर्वर्ण्यसमर्थक होते. भौतिकवादी वा निरीश्वरवादी हे धर्म व विषमतेचे पुरस्कर्ते नसतात हा समज चुकीचा आहे.

धर्मशास्त्रांचा उदय बुद्धोत्तर काळाचा, म्हणजे सामंतप्रथाक काळाचा आहे; पण चैतन्यवादी दर्शनांचा उगम बुद्धपूर्व काळाचा म्हणजे प्राक्औपनिषदीय वा दासप्रथाक काळाचा आहे. आद्य चैतन्यवादी दार्शनिक कैकयांचा अश्वपती, पंचालांचा प्रवाहण जैवलि, विदेहांचा जनक यासारखे राजर्षि होते आणि ते चातुर्वर्ण्य धर्माचे शास्ते होते.

धर्मशास्त्रपूर्व धर्म व धर्मशास्त्रप्रणीत धर्म यात भेद दोन समाजव्यवस्थांचा आहे. धर्मशास्त्रप्रणीत धर्म हा सामंतप्रथाक (feudal) समाजाचा धर्म होता व धर्मसूत्रकार हे व्यक्तिगत ब्राह्मण होते, तर धर्मशास्त्रपूर्व धर्म हा दासप्रथाक गणसमाजाचा धर्म होता व या समयकायद्यांचा सूत्रकार कोणीही व्यक्तिगत ब्राह्मण वा ब्राह्मणवर्ग नसून त्याचे ज्ञाते गणराज्याचे द्विजवृद्ध (elders) असत. दासी द्रौपदीने विचारलेल्या स्त्रीधर्मविषयक प्रश्नाचे उत्तर ब्राह्मण कृपाने नाही, क्षत्रिय भीष्माने दिले. धर्म दुर्बलांचा नसून बलवानांचा असतो ही धर्माची व्याख्या आणि शांती व अनुशासनपर्वातील धर्माचे तपशीलवार निरूपणही भीष्मानेच केले. धर्मशास्त्रपूर्व धर्माची व्याख्या श्रुतिप्रणीत वर्णधर्म अशी केली पाहिजे, तर धर्मशास्त्रप्रणीत धर्माच्या व्याख्या श्रुतिस्मृतिप्रणीत वर्णजातिधर्म अशी. हे दोन्ही धर्म भारतीय समाजविकासाच्या विशिष्ट अशा अटळ मजला होत्या आणि भारतीय उत्पादनविकास अशाच श्रमविभाजनातून झाल्याने त्यांची स्थलकालसापेक्ष आवश्यकता मान्य करणे वैज्ञानिकदृष्ट्या जरुरीचे आहे. या दोन्ही धर्मांचे जनक ब्राह्मण होते असे मानणे हे समाजशास्त्रीय वा वास्तविकदृष्ट्या चुकीचे आहे; पण श्रौतकर्मकांडी वर्णधर्माचे व श्रौतस्मार्त वर्णजातिधर्माचे मिरासदार बनल्यानंतर मात्र ब्राह्मण हे धर्माचे नियंते बनले.

## वैदिक धर्म व हिंदू धर्म

धर्माबद्दलचा एक सोयिस्कर समज गोळवलकरांनी प्रसृत केला आणि कसबे त्याला बळी पडले आहेत. वैदिक चातुर्वर्ण्यधर्म हा समतावादी होता, तर जातिधर्म हा चातुर्वर्ण्यधर्माचे अवनत रूप आहे असे गोळवलकर प्रतिपादतात, तर वैदिक काळ हा वर्गविरहित गणव्यवस्थेचा होता तर मौर्यकाळात ब्राह्मणवर्गाने वैदिक धर्माचा लोप करून हिंदू धर्माला जन्म दिला असे कसबे म्हणतात (पा. २१–२२). चातुर्वर्ण्याचा निर्देश करणारे पुरुषसूक्त हे प्रक्षिप्त आहे, वेदोत्तर आहे, असे कसबे म्हणूनच मानतात. वेदांचे मूळ कर्ते आर्यपूर्व कृषिप्रधान सिंधुसंस्कृतीचे शिल्पकार होते. क्षत्रिय, ब्राह्मण व दासकर्मकर या त्रैवर्णिक दासप्रथाक वर्गसमाजाचा उदय उत्तरकालीन सिंधुसंस्कृतीत झाला आणि आर्यांनी त्यात वैश्यवर्णाची भर घालून दासकर्मकराऐवजी शूद्र वर्ण रूढ केला. यावरून वैदिक काय पण पूर्ववैदिक धर्मही दासप्रथाक गणसमाजाचा विषमतावादी

धर्म होता हे दिसून येईल.

याचा अर्थ असा नाही की, वेदांमध्ये वर्गविहीन गणांची सूक्ते नाहीत. एक तर कोणताही गण (tribe) दासप्रथाक वर्णसमाज बनण्यापूर्वी वर्गविहीन असायचा आणि दुसरे म्हणजे भारत हा खंडप्राय व विषम समाजविकासाचा देश असल्यामुळे त्यात ऐन ब्रिटिश आमदानीपर्यंत वर्गविहीन आदिवासी गण राहिले; पण वैदिक चातुर्वर्ण्यधर्म हा समतावादी होता हे गोळवलकरांचे विधान मात्र फसवे आहे. चातुर्वर्ण्यसमाजाची अनुल्लंघनीय दरी होती उपनयनाची. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे उपनीत वा द्विज म्हणून सर्व गणाधिकारांचे हक्कदार होते, तर दासकर्मकर वा शूद्र हे उपनयनविहीन वा एकजन्मा म्हणून गणाधिकारांना पूर्णपणे पारखे. धर्मानुसार दास वा शूद्र हे ऋय्य, दंड्य व वध्य होते हे लक्षात घेतल्यास या वैदिक धर्माच्या समतेचा फोलपणा लक्षात येईल.

## भक्ती

भूप्रदेश, भक्ती व धर्म या गोळवलकरप्रणीत हिंदुराष्ट्रवादाच्या सूत्रत्रयीची कसबेंनी केलेली चिकित्सा मर्मभेदी आहे. या सूत्रत्रयीचे अधिष्ठाते सूत्र आहे भक्ति. हा शब्द भज् या धातूपासून बनलेला आहे. भज् म्हणजे विभाजन वा वाटप करणे. विभाजन वा वाटप कशाचे ? गणभूमीचे वा गणधनाचे. विभाजक कोण ?. वर्गविरहित स्त्रीसत्ताक गणाची गणमाता, जी भूमातेची मानवी प्रतिनिधी मानली जायची. भक्तीसाठी गोळवलकर ज्या अथर्ववेदीय भूमिसूक्ताचा दाखला देतात ते अशाच एका वर्गविरहित स्त्रीसत्ताक गणाचे सूक्त आहे. भारताची आद्य भूमाता आर्य नव्हती, तर सिंधुसंस्कृतीची आद्य गणमाता निर्ऋति व नंतर तिची पुत्री नैर्ऋती दुर्गा वा वाक् होती. ऋग्वेद व अथर्ववेद या दोघातही असलेल्या तिच्या आत्मवर्णनपर सूक्तात ती सांगते की, तिच्या अपत्यांनी गणभूमीत पिकवलेल्या अन्नाचे व आणलेल्या शिकारीचे समान विभाजन करून ती त्यांना गणभोजन देते. देवी हे निर्ऋतीचे आद्य बिरुद आहे. देवी हा शब्द दिव् धातूपासून बनलेला आहे. दिव् म्हणजे अक्ष वा फाशांच्या सहाय्याने गणभूमीचे वा गणधनाचे गणापत्यात समान विभाजन वा वाटप करणे. हे करणारी ती देवी. स्त्रियांना रास्वसंघात प्रवेश नाकारणाऱ्या गोळवलकरांना भूमाता वा भारतमातेची अशी वर्गविरहित स्त्रीसत्ताक भक्ती अभिप्रेत असणे अशक्य आहे.

वैय्याकरण जेव्हा भक्ति शब्दाची व्याख्या करतात तेव्हा भारतीय दासप्रथाक वर्णसमाजाची दुपार टळून गेलेली असते. पाणिनीच्या ४-३-१०० या सूत्रावर भाष्य करताना काशिका म्हणते– अंग जनपदावर व या जनपदाच्या स्वामींवर वा जनपदिनांवर ज्याची भक्ती त्याला आंगक म्हणावे. भारत जनपदावर भक्ती करणाऱ्यासाठी भारतक असा शब्दप्रयोग मात्र शोधून सापडत नाही ! ९५ वे सूत्र भक्ती शब्दाची व्याख्या सेवा करणे अशी करते. अशी भक्ती वा सेवा करणारे कोण होते ? दास ! अंगराज कर्णाने दासी द्रौपदीला सांगितलेला वर्णधर्म संशयनिवृत्त्यर्थ देतो–

" त्रय: किल इमे ह्य अधना भवन्ति
दास: पुत्रश्च अस्वतंत्रा च नारी । "
(" हे तीन अधन व अस्वतंत्र असतात: दास, पुत्र व नारी ! ")

कुलमुख्याला त्याचे सर्व जनपदिन् कुलसदस्य दासाप्रमाणे ऋय्य व वध्य असत. जे दुसऱ्याला गुलाम करतात ते स्वत:ही गुलाम झाल्याखेरीज राहात नाहीत ! अशी जनपदिनशासित दासप्रथाक वर्णसमाजाची भक्ती गोळवलकरांना अभिप्रेत आहे.

दासप्रथाक समाजाच्या जागी आलेल्या सामंतप्रथाक समाजात मग खुद्द भक्तिपंथाचे प्रवर्तन होते, वर्णजातिव्यवस्थेच्या भौतिक व जन्मदत्त असमानतेत आध्यात्मिक समता मिळविण्यासाठी ' बुद्धं सरणं गच्छामि ' हा बहुजनांचा उद्‌घोष विरतो ना विरतो तोच ' दासोऽस्मि तव केशव ' हा भक्तांचा गजर उठू लागतो. हे भक्त कोण होते ? भक्तचा अर्थ धान्यात रोज असाही होतो. कौटल्य अर्थशास्त्रात सांगतो की, भक्त-कर्मकर म्हणजे जे पैशावर, धान्यावर वा अन्नावर रोजंदारीने, सालदारीने आजीवन वा बद्ध श्रमिक म्हणून काम करतात ते. हे होते सामंतसमाजाचे पोशिंदे, शूद्र जातीजमातीचे कष्टकरी. या शूद्रातिद्रातिशूद्रांनी उच्च जातीयांवर व सामंतस्वामींवर देशनिरपेक्ष भक्ती करावी असा धर्मशास्त्रे आदेश देतात. जगन्नाथ पंडित बादशहाला भक्तिभावाने म्हणतो– " दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा । " अशी सामंतशासित वर्णजातिसमाजाची दास्यभावी भक्ती गोळवलकरांना अभिप्रेत आहे !

गोळवलकरांच्या या हिंदुराष्ट्रवादाला लोकशाहीचे साध्य असलेली व्यक्ती कशी नगण्य आहे हे विशद करताना कसबे पुष्ट्यर्थ खुद्द गोळवलकरांचेच म्हणणे देतात–

' ... गोळवलकर म्हणतात, " अनंत पिढ्या आल्या आणि गेल्या परंतु राष्ट्र टिकून राहिले आहे... राष्ट्रजीवन हे ' नित्य ' आहे आणि व्यक्ती अनित्य आहे. म्हणून या समाजव्यवस्थेमध्ये ' अनित्य ' असलेली व्यक्ती ' नित्य ' असलेल्या समाजाचे हित साधण्याचे साधन होईल." (पा. १८)

लोकशाहीप्रमाणे साम्यवादालाही गोळवलकरांचा विरोध असल्याचे कसबे सांगतात–

' ... लोकशाही आणि साम्यवाद नाकारताना गोळवलकर म्हणतात, " लोकशाही व साम्यवाद या दोन्ही तत्त्वज्ञानांचा जन्म त्यांच्यापूर्वी असलेल्या समाजव्यवस्थेच्या प्रतिक्रियेतून झाला आहे आणि लोकशाही व साम्यवाद या दोन्हीही तत्त्वप्रणाली जडवादावर किंवा भौतिकवादावर उभ्या आहेत. "...'(पा. ३).

भौतिकवादाची संभावना गोळवलकर– " मनुष्यप्राणी भौतिक गरजांचे एक गाठोडे आहे, बस् ! " अशा तुच्छतादर्शक उद्‌गारात करतात (पा. ४). हिंदु राष्ट्रधर्माची विचारसरणी गोळवलकरांना मुसलमान व ख्रिश्चन धर्मीयांनाही शत्रु मानण्याकडे घेऊन जाते. (पा.६४)

## जातिव्यवस्था व लोकशाही क्रांती

विद्यमान भारतीय समाज जमीनदारशाहीच्या प्राधान्यामुळे जसा निमसामंती (Semi-Feudal) म्हटला जातो, तसा भारतीय सामंतप्रथेची उपज असलेल्या वर्णजातिव्यवस्थेच्या बळकट अवशेषांमुळेही तो निमसामंती म्हटला पाहिजे. पण भारतीय निमसामंती समाजाच्या या दुसऱ्या वैशिष्ट्याकडे डावे पक्ष अजूनही पाहिजे तेवढे लक्ष द्यायला तयार नाहीत. भारताची लोकशाही क्रांती केवळ

जमीनदारी नष्ट करून उपलब्ध जमिनीचे भूमिहीनांत फेरवाटप केल्याने पूर्ण होणार नाही, तर ती जातिव्यवस्था नष्ट करूनच पूर्ण होऊ शकते. वर्णजातिव्यवस्था ही भारतीय ग्रामीण समाजात सर्वांत प्रबल असल्याने जमीनदार हे उच्चवर्गीय म्हणून निमसामंती वर्णव्यवस्थेचे समर्थक आहेत तर उच्चजातीय म्हणून ते या निमसामंती जातिव्यवस्थेचे समर्थक आहेत. वर्णजातिव्यवस्थेचे समर्थन करणारी भारताची एकमेव राजकीय– सांस्कृतिक संघटना म्हणजे रा. स्व. संघ. बिहारच्या नालंदा महाविद्यालयाचे प्रा. केदारनाथ कुमार त्यांच्या पाहणीप्रबंधात म्हणतात– '... राष्ट्रीय स्वयंसेवक संघास जनसंघाच्या निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत प्रधान स्थान आहे! (लोकसत्ता, १–४–७८). या संदर्भात गोळवलकरांच्या जातिव्यवस्थासमर्थनाची कसबे जी नोंद घेतात ती महत्त्वाची आहे–

'... हिंदुधर्म हा जगातील सर्वश्रेष्ठ धर्म असून ऋग्वेदात वर्णन केलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था म्हणजे सर्व शक्तिमान परमेश्वराचेच चतुर्विध स्वरूप आहे. आजची जातिसंस्था नष्ट करणे आणि वर्गविहीन समतेवर आधारलेला समाज निर्माण करणे म्हणजे सारे शरीर वर्गविहीन करण्यासाठी कापून टाकणे होय, (पृ. ९०) इतकेच नव्हे तर, जातिसंस्था ही भारतीय समाजाला गेल्या हजार वर्षांच्या इतिहासात उपकारक ठरली आहे... जातिविरहित समाज परकीय आक्रमणाला जितक्या सहजपणे बळी पडले, त्याच्या तुलनेत भारत हा आक्रमणाला सहजासहजी बळी पडला नाही याचे कारण भारतात असलेली जातिसंस्था होय, असे गोळवलकरांचे म्हणणे आहे...' बौद्धधर्माने जेथे जातिसंस्था नष्ट करून टाकल्या, ते आपल्या देशाच्या वायव्य आणि ईशान्य दिशांकडील भाग मुसलमानांच्या स्वाऱ्यांना लागलीच बळी पडले. गांधार– आताचा कंदाहार– पूर्णतया इस्लाममय झाला, बंगालमध्येही फार मोठया प्रमाणावर धर्मांतर झाले. याउलट दिल्ली व उत्तरप्रदेश हे जातिबंधनांच्या बाबतीत फार सनातनी व कट्टर समजले जाणारे भाग. तेथे कित्येक शतके मुस्लिम सत्ता व धर्मांधता यांनी थैमान घातले असताही बहुसंख्य भाग हिंदु राहिला...' (पा. १६–१७).

पहिली गोष्ट म्हणजे बौद्धधर्माने जातिसंस्था नष्ट केली हे विधानच चुकीचे आहे. बुद्धाने व बौद्धधर्माने भिक्षुसंघापुरती वर्गवर्णजातिविहीनता आचरली, वर्णजातिव्यवस्थेला वैचारिकदृष्टया प्रखर विरोध केला, हे खरे; पण ख्रिश्चन व इस्लामधर्मात अनुक्रमे बाप्तिस्मा व सुंता या जशा त्यांच्या धर्मदीक्षा आहेत, तशी दीक्षा बौद्ध उपासकांसाठी कधीही नव्हती. जन्म, विवाह, मृत्यु इ. चे कोणतेही संस्कार बुद्धाने उपदेशिले नाहीत. त्यामुळे बौद्धउपासक वर्णजातिप्रधाक समाजातच राहात आणि त्यांचे संस्कार श्रौतस्मार्तधर्मानुसारच होत. वर्णजातिव्यवस्थेचा उदयही त्या वेळी नुकताच झालेला असल्याने या वर्धिष्णु संस्थेचा विनाश अजून इतिहासाच्या अजेंड्यावर नव्हता. भारतात वर्गसंस्था वासाहतिक काळात उदयाला आली हे ध्यानी घेता तत्पूर्वी वर्णजातिव्यवस्था हीच भारतीय वर्गव्यवस्थेचे स्वरूप होती हे लक्षात येईल. बुद्ध, ख्रिस्त व पैगंबर हे तत्कालीन सामंतप्रधाक क्रांत्यांचे, म्हणजे एका कालबाह्य वर्गव्यवस्थेऐवजी दुसऱ्या कालसंमत वर्गव्यवस्थेचे, समाजपरिवर्तक 'प्रेषित' होते हे वरील संदर्भात लक्षात घेतल्यास बुद्धाच्या पदरी वर्णजातिव्यवस्था अबाधित ठेवल्याचा 'दोष' येत नाही. गोळवलकरांच्या दृष्टीने बुद्धाचा हा गुणच मानावा लागेल! गोळवलकरांच्या प्रतिपादनाप्रमाणे भारताचे बौद्धमय भाग जातिविरहित असते तर त्यांनी इस्लामचे आक्रमण मोडून काढले असते! पण हे बौद्धभाग अर्धनारीनटेश्वराप्रमाणे वर्णजातिव्यवस्थाक राहिल्याने आणि तुर्कांच्या आक्रमणकालापर्यंत वर्णजातिव्यवस्थेची प्रागतिकता संपून गेलेली असल्याने हे भाग इस्लाममय झाले. वर्णजातिव्यवस्थेच्या वर्धिष्णुतेच्या काळात भारतीय समाजाने जगज्जेत्या सिकंदरचे अभियान रोखले होते हे येथे लक्षात घेतले पाहिजे. भारताचे अबौद्ध भाग कट्टर सनातनी असल्याने ते इस्लाममय केले जाऊ शकले नाहीत ही गोळवलकरांची उपपत्तीही सदोष आहे. प्रारंभिक धर्माभिनिवेशानंतर तुर्क आक्रमकांनी हे जाणले की, भारतावर राज्य करायचे तर भारतीय हिंदु जमीनदारांशी, देसाई-देशमुखांसारख्या वरिष्ठ वतनदारांशी व राजांशी वर्गीय तडजोड केली पाहिजे. तुर्क आक्रमक भारतात राज्य करण्यासाठी आले होते, धर्मप्रचारासाठी नाही; हे ऐतिहासिक सत्य हिंदु राष्ट्रवादी लक्षात घ्यायला तयार नसतात. कुंठित झालेल्या हिंदु सामंतप्रथेला तुर्कांनी कोणती नवी योगदाने दिली याचे सर्वोत्कृष्ट व वैज्ञानिक विवेचन प्रा. मोहंमद हबीब यांनी त्यांच्या '*पॉलिटिक्स अँड सोसायटी ड्यूरिंग द अर्ली मीडिव्हल पीरिअड*' या ग्रंथात केलेले आहे (पा. ५९–८६).

अशा प्रकारे गोळवलकर तुर्कांचा व ब्रिटिशांचा भारतविजय शक्य करणाऱ्या वर्णजातिव्यवस्थेचे समर्थन करतात. भारतीय राजकारणाच्या वर्तमान संदर्भात याचा अर्थ होतो भारतीय लोकशाही क्रांतीला विरोध करणे. प्रस्थापितांचे बाकीचे राजकीय पक्ष लोकशाही क्रांतीला वर्गीय वा एकेरी विरोध करतात, तर रा. स्व. संघ लोकशाही क्रांतीला वर्गीय व जातीय वा दुहेरी विरोध करतो.

## रा. स्व. संघ व जनसंघ

जनसंघ व रा. स्व. संघ यांचे नाते जरी अनुक्रमे राजकीय पक्ष व स्वयंसेवकसंघटना असे असले, तरी जनसंघाची धोरणाची सूत्रे रास्वसंघ–कॅडरच्या हातात असतात हे उघड गुपित आहे. हुकुमशाहीविरोधी लोकशाही पुनरुज्जीवनाच्या राष्ट्रीय लढयानंतर जनसंघाने जनता पक्षात 'विलीन' होऊन गांधीवादी समाजवाद स्वीकारलेला असला, तरी त्याचे व रास्वसंघाचे बाह्य व आंतरिक नाते पूर्ववत राहिले. रास्वसंघ जनता पक्षाच्या स्वयंसेवक संघटनात विलीन व्हावा, अशी मागणी जेपींनी करून रास्वसंघाच्या हिंदुत्वनिष्ठ संघटना व विचारसरणीविरुद्ध जो राष्ट्रीय संघर्ष वैचारिक पातळीवर सुरू केला त्याच्या परिणामीही रास्वसंघ बदललेला नाही, बदलायला तयार नाही, हे स्पष्ट होऊन चुकले आहे. ७५ साली जेपींना एका उजव्या कम्युनिस्ट नेत्याने 'भारताचे सर्वांत संवेदनाक्षम हवामापकयंत्र' असे संबोधले होते. ही संवेदनाक्षमता जेपींनी हा नवा वैचारिक संघर्ष सुरू करून पुन्हा दाखवली आहे. नव्या परिस्थितीने उभ्या केलेल्या नव्या समस्येकडे लक्ष वेधण्यात म्हणूनच कसबेंनी द्रष्टेपणा दाखविला आहे–

'ज्या पुरोगामी शक्तींना या देशात शोषणमुक्त समाज निर्माण करण्यासाठी वर्णलढा आणि वर्गलढा हातात हात घालून चालावा

असे वाटत असेल त्यांनी संघाचे हे स्वरूप व त्यांचे डावपेच (स्ट्रॅटेजी) नीट समजावून घेतले पाहिजेत. जोपर्यंत वर्गश्रेष्ठत्वाची व जातिश्रेष्ठत्वाची भावना प्रस्थापितांच्या मनात जागृत असेल तोपर्यंत संघाचे अस्तित्व अटळ आहे व त्याच्या भूमिकेतील ताठरताही तीच असणार आहे. कदाचित त्याची दृश्य रूपे वेगवेगळी असतील. पुरोगामी लोकशाही समाजवाद्यांचे संघाशी तात्त्विक, सामाजिक, राजकीय व आर्थिक या सर्व क्षेत्रांत मूलभूत स्वरूपाचे मतभेद आहेत. ते सदैव राहणारे आहेत. अर्थात काही पुरोगामी शक्तींनी जनता पक्षाच्या रूपाने राजकारणात केलेल्या तडजोडी लोकशाही समाजवादाच्या तत्त्वांशी विघातक ठरणार नाहीत अशी आशा काही काळ करायला हरकत नाही; परंतु लोकशाही समाजवादाशी केलेली तडजोड हा आत्मघात ठरेल, याचीही स्पष्ट जाणीव असली पाहिजे. इंदिरा गांधींच्या फॅसिस्ट प्रवृत्तीमुळे सर्व विरोधी पक्ष जनता पक्षाच्या रूपाने एकत्र आले. काय सांगावे ? संघाच्या फॅसिस्ट प्रवृत्तीमुळे त्याचे विघटनही होईल. म्हणून पुरोगामी शक्तींनी एकत्र येऊन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रत्येक आघाडीवर मुकाबला करण्यास सिद्ध असले पाहिजे.' (पा. १३)

## जनसंघ–रास्वसंघाची शक्तिस्थानें

स्वतः कसबेनाही दार्शनिक क्षेत्रात तडजोडीचा, मार्क्सच्या अनित्यतावादी भौतिकवादाचा व अध्यात्मवादाचा समन्वय करायचा मोह आवरत नाही.

'... स्वतः मार्क्सने माणसाच्या मुक्तीचे तत्त्वज्ञान मांडलेले आहे. त्याला माणसाची मुक्ती केवळ भौतिक अर्थानेच हवी होती असे नाही, तर ती सर्वार्थाने हवी होती... जे मार्क्सच्या तत्त्वज्ञानाला केवळ आर्थिक मुक्तीच्या मर्यादा घालतात ते मार्क्सवादावर अन्याय करीत असतात. या दृष्टीने आचार्य स. ज. भागवतांनी अध्यात्म आणि बुद्धिप्रामाण्य यांच्या अन्योन्यसंबंधांचे केलेलें वर्णन विचार करण्यासारखे आहे.ते म्हणतात, ' अध्यात्म हे बुद्धिप्रामाण्याच्या विरोधी नाही. फक्त बुद्धीचा विकास केवळ तर्कशक्तीने होत नाही, तर त्यासाठी भावशुद्धीचीही आवश्यकता असते, एवढेच या अध्यात्माचे म्हणणे आहे. (पा. ३५)

बृहदारण्यक उपनिषदावर भाष्य करताना स्वतः आद्य शंकराचार्यांनी अध्यात्मवादाची व्याख्या केलेली आहे. अधि+आत्मा+वाद म्हणजे विश्व आत्म्यातून उद्‌भवणे व त्याच्यातच लय पावणे. आचार्य भागवतांची ' भावशुद्धी ' म्हणजे दार्शनिक भाषेत तर्काच्या पलीकडला भाव वा ब्रह्म ! खरे पहाता तर्क, भाव व भावशुद्धी हे सर्व एकाच मनाचे, ' भूतेभ्यः चैतन्यम् । 'चे व्यापार आहेत. भावाची शुद्धी दोन प्रकारे होते; एक तर्काने व दुसरी श्रद्धेने. बुद्धीच्या विकासाला तर्कशक्तीपलीकडल्या भावशुद्धीची गरज आहे याचा तर्कशुद्ध अर्थ असा की, बुद्धिप्राण्याला श्रद्धेची गरज आहे !

बुद्धिप्रामाण्यवादी तर्कशक्ती सांगते की, जनसंघ व रास्वसंघ बदलले हा आभास आहे, तर भावशुद्धी वा श्रद्धा सांगते की, ते बदलले आहेत. डाव्यांचा हा व्यामोह व किंकर्तव्यता ही जनसंघ–रास्वसंघाची येत्या काळात शक्तिस्थाने राहाणार आहेत. इंदिरा सरकारच्या संभाव्य हुकुमशाहीचा पराभव करण्यासाठी जेपींच्या आघाडीशी, जनसंघादींसारख्या उजव्या पक्षांशी दोस्ती करा असे मी बिहार विद्रोहापासून सतत हरप्रकारे सांगत होतो. त्या वेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाला जनसंघादींचा विटाळ होत होता. आता या नेतृत्वाला अटलबिहारी बाजपेयी हे केंद्रीय मंत्रिमंडळातील ' सर्वांत विचारी गृहस्थ ' दिसायला लागले आहेत. कारण काय तर बाजपेयींनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाशी दोस्तीचे जोरदार समर्थन करून त्याला ' डायनॅमिक ' पक्ष म्हणणारी मुलाखत दिलेली आहे. ही मुलाखत ' पीपल्स डेमॉक्रसी ' या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्राने छापली आहे. एका बाजूला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाने चांदवडची परंपरागत कम्युनिस्ट जागा जनसंघाला देऊन टाकली, तर दुसऱ्या बाजूला जनसंघाने साक्री राखीव मतदारसंघात स्वतंत्र उमेदवार उभा करून एस. आर. पी. दडपशाहीविरुद्ध आदिवासी भूमिहीनांच्या ऐतिहासिक लढ्याचे नेतृत्व केलेल्या तरुण मार्क्सवादी कम्युनिस्ट उमेदवाराला पाडून इंदिरा कॉंग्रेसचा विजय शक्य केला व शिंदखेडे मतदारसंघात समाजवादी पक्षाच्या झुंजार उमेदवाराविरुद्ध स्वतंत्र उमेदवार उभा करून जनता पक्षाचा पराभव केला आणि हे सर्व करणारे उत्तमराव पाटील आज विधानसभेत जनता व विरोधी पक्षाचे नेते बनले आहेत आणि महाराष्ट्रासारख्या सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीचा गड असलेल्या राज्याचे संभाव्य मुख्यमंत्री !

भारतीय इतिहास व तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील साम्यवादी–समाजवाद्यांच्या कर्तव्यशून्यतेमुळे या क्षेत्रात जनसंघ–रास्वसंघाच्या हिंदु राष्ट्रवादी विचारसरणीचे प्रभुत्व अबाधित राहिलेले आहे असे कसबे परखडपणे सांगतात–

'या देशात पुरोगामी चळवळी सुरू होऊन शंभर-सव्वाशे वर्षे लोटूनही समाजवाद व लोकशाहीमूल्यांवर श्रद्धा ठेवणाऱ्यांनी भारतीय तरुणांना जडवाद म्हणजे काय ? भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासात जडवादी परंपरा समर्थ असूनही तिला जाणीवपूर्वक बदनाम का केले गेले ? चैतन्यवाद व जडवाद यातील मूलभूत फरक कोणते ? या प्रश्नांची खोलवर जाऊन चर्चा केली नाही. भारतीय समाजवादी व साम्यवादी यांनी जडवाद स्वीकारला तरीही त्यांच्यात भारतीय इतिहासाची भौतिकवादी मीमांसा कशी करता येईल याबद्दल भरपूर गोंधळ आहे. हे जिकिरीचे काम समाजवाद्यांकडून न झाल्याने व जे थोडेफार झाले ते तरुणांच्यापर्यंत न पोचल्याने गोळवलकरांनी मांडलेला विकृत इतिहास तरुणांना आकर्षित करू लागला. यात दोष गोळवलकरांचा नसून समाजवादी व साम्यवादी यांच्या या क्षेत्रामधील कर्तृत्वशून्यतेचा आहे.' (पा. ६)

११–३–७८ ता. च्या पत्रात कसबे मला लिहितात–

'तुमचे Dasa-Sudra Slavery हे पुस्तक ७२ सालापासून इंग्रजी व मराठी प्रकाशकांनी अडवून धरल्याचे वाचून खूप दुःख झाले. स. प्र. नवभारत व इतर नियतकालिकांतून मी जे आपले लिखाण वाचतो व ते समजावून घेण्याचा प्रयत्न करतो त्यातून या लिखाणाची आवश्यकता मला तीव्रतेने जाणवू लागली आहे. ते लवकर प्रसिद्ध होईल यासाठी काही तरी करणे आवश्यक आहे. डॉ. गेल ऑमवेटच्या प्रबंधावरील आपले भाष्य मोलाचे तर वाटलेच; परंतु नंबुद्रिपादांनी ते परत का पाठविले हे मात्र मी समजू शकलो नाही.'

The Dialectics of Caste and Class Conflicts (वर्ग व वर्णजाती संघर्षांचा द्वंद्ववाद) हे माझे उपरोल्लेखित भाष्य नंबुद्रिपादांनी 'सोशल सायंटिस्ट'मध्ये छापायचे नाकारून परत पाठवल्यानंतर मी २०–१–७७ ता. ला त्यांना पाठविलेल्या पत्रात त्यांच्या आक्षेपांचे खंडन करून समारोप केला.

'महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीच्या सच्च्या मार्क्सवादी मीमांसेवर हा (प्रा. नलिनी पंडितांचा) तथाकथित मार्क्सवादी व छुपा ब्राह्मणी हल्ला आहे. म्हणून मी भारतीय इतिहासातील ब्राह्मणी व अब्राह्मणी या दोन्ही प्रवाहांचा मागोवा घेतला. ओमवेदचा मी केलेला बचाव प्रसिद्ध करायला तुम्ही दिलेला नकार पर्यायाने या पहिल्या (ब्राह्मणी) प्रवाहाला तुमचा पाठिंबा सूचित करतो.'

'सोशल सायंटिस्ट'च्या नोव्हेंबर ७७ च्या अंकात नंबुद्रिपादांचा 'कास्ट्स, क्लासेस अँड पार्टीज इन मॉडर्न पोलिटिकल डेव्हलपमेंट' हा महत्त्वपूर्ण लेख प्रसिद्ध झाला आहे. या लेखात भारतीय इतिहासाबद्दल अज्ञानमूलक विधाने तर आहेतच; पण भारतीय संस्कृतीच्या वर्गीय विश्लेषणाच्या नावाखाली तिचे जातीयवादी व्याख्या करणारे विधान आहे. संपादकाला २२–१२–७७ ता. ला लिहिलेल्या पत्रात या विधानांचे खंडन करून मी नमूद केले आहे–

'भारतीय जातिव्यवस्थेच्या ऐतिहासिक उदयविकासाचा मागोवा घेताना कॉ. ई. एम्. एस्. हे कालबाह्य व उच्चजातीय कल्पनांना चिकटून राहतात. संस्कृती ही वर्गसमाजाचे अपत्य आहे असे म्हणणे वेगळे; पण '...(वर्ग) समाजातील शासकवर्ग संस्कृतीचे वाहक असतात...' वा '...दुसऱ्या शब्दात, या अहिंदु धार्मिक समाजातील उच्चवर्गीयांनी व हिंदुसमाजातील उच्चवर्गीयांनी मिळून सच्च्या भारतीय संस्कृतीला जन्म दिला...' असे म्हणणे वेगळे. या दुसऱ्या विधानाचा अर्थ असा होतो की, भारतीय संस्कृतीच्या जननी केवळ वरिष्ठ जातीच होत्या! महाराष्ट्रात अशी औद्धत्यपूर्ण विधाने करायचे धाष्टर्य फक्त शूद्रद्वेष्टे चित्पावन ब्राह्मणच दाखवतात...'

पुढे मी असे सिद्ध केले आहे की, भारतीय संस्कृतीच्या जननी केवळ वरिष्ठ जाती नसून स्त्रीजातीसकट सर्व शूद्रातिशूद्र जाती आहेत. हे पत्र छापायची पत्रकारिताही नंबुद्रिपादांनी दाखवली नाही.

जनसंघ–रा. स्व. संघाची शक्तिस्थाने डाव्या पक्षातील औपचारिक लोकशाही, नेतृत्वाची दार्शनिक, राजकीय व संघटनात्मक उच्चभ्रूता आणि ब्राह्मणेतर जातिजमातीतील स्वयंप्रज्ञ नेतृत्व विकसित होऊ द्यायला विरोध ही आहेत.

बड्या आघाडीकडून व नंतर जेपीप्रणीत आघाडीकडून हुकुमशाही येत आहे अशी हूल दाखवून इंदिरा कॉंग्रेसने स्वतःच हुकुमशाही आणली. भारतासारख्या जातिधर्मव्यवस्थाक देशात हुकुमशाही धार्मिक व जातीयच असू शकते. हुकुमशाही इंदिरा कॉंग्रेसकडून येत आहे असे दिसत असले, तरी हा पक्ष सत्तेच्या सुंदोपसुंदीने ग्रस्त आहे आणि इंदिरा गांधींचे 'अपील' धार्मिक व जातीय अल्पसंख्यांकांपुरते आहे. हुकुमशाही अल्पसंख्यांक जमातींविरुद्ध बहुसंख्य जमातींचीच येऊ शकते. बहुसंख्य जमातींचा पक्ष आहे जनसंघ. जो सुंदोपसुंदींनी ग्रस्त नाही. राज्यांवर ब्राह्मण मुख्यमंत्री लादू पाहणारी व मुसलमानांविरुद्ध 'तुर्कोमान गेट' करणारी इंदिरा गांधी जनसंघ–रा. स्व. संघाच्या नेतृत्वाखालील प्रस्थापित वर्गांच्या हुकुमशाहीची पूर्वतयारी करीत आहे. हुकुमशाहीची ठराविक रूपात कल्पना करणारे पुन्हा गाफील सापडतील. या वर्गीय-जातीय हुकुमशाहीचा सामना, वर्गलढा व वर्णजातिलढा यांचा समन्वित मुक्तिसंग्राम उभारू शकणारी पर्यायी डावी व लोकशाही आघाडी व जनशक्तीच करू शकेल.

–शरद पाटील, धुळे

---

प्रतिक्रिया दोन

# संदर्भांची मोडतोड

दिनांक २२ मार्च.

संघबंदी उठून एक वर्ष झालेलं.

त्याच दिवशी प्रा. रावसाहेब कसबे यांचं 'झोत' रा. स्व. संघावर 'प्रकाशझोत (?)' टाकणारं पुस्तक वाचायला मिळालं. आणीबाणीनंतर जनमानसात संघाविषयी आस्था असताना, औत्सुक्य असताना संघावर टीका करून अनेकांनी प्रकाशझोतात येण्याचा प्रयत्न केला. संघावर टीका करण्याची समाजवादी फॅशन सुरू झाली. काही समाजवाद्यांना, पुरोगाम्यांना संघावर टीका हा सवंग लोकप्रियतेचा सोपा आणि स्वस्त मार्ग वाटला आणि अनेकांनी ह्याचं अनुकरण केलं. त्याच परंपरेतले हे आणखी एक टीकात्मक पुस्तक 'झोत', 'जनबोध'ने प्रकाशित केलेले.

*खरं म्हणजे अशा टीकेकडे दुर्लक्ष करायला हवं.*

'मकरसंक्रमण' उत्सवप्रसंगी मुंबईला केलेल्या भाषणात सरसंघचालक मा. बाळासाहेब देवरस यांनी एक मुद्दा स्पष्ट केला होता. 'संघाचं कार्य हे सार्वजनिक कार्य आहे. तेव्हा त्यावर टीका, चर्चा, सूचना करण्याचा सर्वांना अधिकार आहे. या टीकेची, सूचनांची गंभीरपणे दखल घेणे ही आपली जबाबदारी आहे. अर्थात ही टीका सद्हेतूने केलेली असावी. जे लोक केवळ दुष्ट हेतूने, संघ नष्ट व्हावा या हेतूने टीका करतात त्यांची टीका लक्षात घेण्याचे कारण नाही.'

तरीही 'झोत'च्या 'प्रकाशकीय'मध्ये उल्लेखिलेल्या 'या लिखाणाने विचारमंथनाची प्रक्रिया सुरू व्हावी' या अपेक्षेप्रमाणे 'झोत'मधील टीकेचा परामर्ष घेणे आवश्यक ठरते.

या पुस्तकातील वैचारिक गाभ्याचा विचार करण्याआधी त्यातील संदर्भसत्यता पडताळून पाहाणे आवश्यक ठरते. ज्या श्री. गोळवलकर गुरुजींच्या 'विचारधन' या ग्रंथावर सदर पुस्तक बेतलेले आहे, त्या 'विचारधना'तून संदर्भसत्यता तपासली पाहिजे. असा संदर्भ पडताळून पहाताना पुस्तकातील टीकेचा फोलपणा, स्वतंत्रपणा जाणवल्याशिवाय राहात नाही.

'मनुष्यप्राणी भौतिक गरजांचे एक गाठोडे आहे, बस!' असा विचारधना'तील एकाच ओळीचा उल्लेख करून गोळवलकरांनी भौतिकवाद विरोधी जहरी अपप्रचार जाणीवपूर्वक करण्याचे तंत्र वापरले (झोत पृ. ४) असा आरोप लेखक करतो; पण 'विचारधना'तील उल्लेखिलेल्या ओळीचा पुढचा व नंतरचा संदर्भ लेखकाने

स्वतःच्या सोयीसाठी गाळलेला दिसतो. ' मनुष्यप्राणी म्हणजे भौतिक-गरजांचे एक गाठोडे आहे ' अशी लोकशाहीवादी व साम्यवादी लोकांची धारणा आहे. माणसामाणसातील समतेचा विचार ह्यांनी केवळ भौतिकदृष्टिकोनातून केला; परंतु केवळ भौतिक गरजा भागविणे हीच माणसाच्या सर्व हालचालीमागची प्रेरणा असेल तर त्याने समाजासंबंधी विचार करताना ' समाज म्हणजे आपल्या गरजा भागविण्याचे साधन ' याहून वेगळा विचार करण्याचे कारण उरत नाही आणि अशा प्रकारे स्वतःच्या स्वार्थाचा विचार करणाऱ्या व्यक्तींचा बनलेला समाज एक दिवसही टिकू शकणार नाही. समाज जिवंत रहावयाचा असेल तर त्यासाठी त्याच्या घटकात त्यागाची भावना असणे आवश्यक आहे.

' मनुष्यप्राणी हा केवळ भौतिक गरजांचे गाठोडे आहे ' असे म्हणणे म्हणजे त्याला पशूंच्या पंक्तीत नेऊन बसविण्यासारखे आहे ' या उल्लेखाकडे लेखकाने सोयिस्कररीत्या दुर्लक्ष केलेले दिसते.

त्याचबरोबर गोळवलकरांना तर हे आधुनिकवाद आणि तत्त्व-प्रणाली नामंजूर आहेत. लोकशाही आणि साम्यवाद नाकारताना गोळवलकर म्हणतात, ' लोकशाही व साम्यवाद या दोन्ही तत्त्वज्ञानांचा जन्म त्यांच्यापूर्वी असलेल्या समाजव्यवस्थेच्या प्रक्रियेतून आला आहे आणि लोकशाही व साम्यवाद या दोन्हीही तत्त्वप्रणाली जडवादावर किंवा भौतिकवादावर उभ्या आहेत–' (स्रोत पृ. ३) याचाही संदर्भ लेखकाने दुर्लक्षिलेला दिसतो.

श्री. गुरुजींनी साम्यवादाचा पराभव त्याच्या जन्मभूमीत, रशियात कसा झाला याचे वर्णन करून साम्यवादी देशही आता व्यक्ति-स्वातंत्र्याकडे वळू लागल्याचे लिहिले आहे. याउलट लोकशाहीविषयी चर्चा करताना श्री. गुरुजी लिहितात, ' ज्य देशात ' अनिर्बंध व्यक्ति-स्वातंत्र्या 'च्या सिद्धान्ता 'वर लोकशाहीचा उदय झाला त्यांनाही ह्या मूलभूत धोरणांचा पुनर्विचार करावा लागला. ' निरंकुश ' समानसंधी आणि ' निरंकुश ' व्यक्तिस्वातंत्र्य या दोहोंचे भीषण परिणाम पाहिल्यावर समाजाच्या सामूहिक कल्याणासाठी त्यांना आपल्या सिद्धान्तांना प्रत्यक्ष व्यवहारात मुरड घालावी लागली आहे. त्यामुळे लोकशाही शासनव्यवस्था ते टिकवू शकले.' श्री. गुरुजींना भौतिकवाद ही लोकशाहीची मूलभूत धारणा आवश्यक वाटत नाही. ' बहुजन-हिताय, बहुजनसुखाय ' या पाश्चिमात्य विचारवंतांच्या कल्पनेच्याही पुढे जाऊन आपली लोकशाहीची प्राचीन परंपरा स्पष्ट करताना श्री. गुरुजी लिहितात–

' संपूर्ण मानवजातीच्या ऐक्याची, संघर्षविरहित आणि दुःखविरहित अश्या आदर्श जगताची कल्पना अतिप्राचीन काळापासून आमच्या अंतःकरणात झंकारलेली आहे, युगानुयुगे आम्ही अशी प्रार्थना करीत आलो आहोत– ' सर्वेऽपि सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयाः '

' संघ मुसलमानविरोधी नाही असे म्हणावयाचे तर दुसरीकडे १९५७ च्या निवडणुकीत अंबाला मतदारसंघातून मुसलमान उमेद-वार निवडून आला तर तीव्र दुःख व्यक्त करायचे याला विसंगती-शिवाय आणखी काय म्हणावे ?–' (स्रोत पृ. १९)

आणखी एक संदर्भहीन लिखाणाचा नमुना.

श्रीगुरुजींनी दुःख व्यक्त केलंय ते मुसलमान उमेदवार निवडून आला म्हणून नव्हे, तर समाजाच्या आत्मविस्मृत, आत्मघातक अवस्थेविषयी. कारण त्या मतदारसंघात मुसलमान मतदार तो एकटाच. बाकी सर्व हिंदू आणि केवळ दहा वर्षांपूर्वी तेथील हिंदूंवर मुसलमानांनी अवर्णनीय अत्याचार केले होते.

आपल्या देशातील असंख्य सुबुद्ध लोकशाहीवाद्यांना इंदिरा गांधींच्या कर्नाटक, आंध्र विजयाबद्दल खेद झाला असेल...

' स्रोत 'च्या पहिल्याच पृष्ठावर संघकार्यकर्त्यांना वैचारिक बैठक, उद्देशाची आवश्यकता वाटली नाही; निकोप चर्चा, वादविवाद वगैरे बाबी संघाला अनावश्यक वाटणे सहाजिक होते असा उल्लेख आढळतो.

संघाचे एक ज्येष्ठ प्रचारक कै. नानाराव पालकर यांनी एके ठिकाणी नमूद केलंय. "संघाचे व विचारशीलतेचे वावडे नाही. प्रत्येक गोष्ट बुद्धीच्या कसावर घासून, पारखून स्वयंसेवकांनी स्वीकरावी अशी संघाची बुद्धिनिष्ठ भूमिका आहे, रा. स्व. संघाला विचार-शीलता जागवायची आहे. बुद्धीशी संघाची फारकत आहे असा आक्षेप घेणारे जन्मालाही आले नसतील तेव्हापासून संघात बौद्धिक वर्ग सुरू झालेले आहेत."

वाणि उद्देशाविषयीचा उल्लेख संघाच्या प्रार्थनेत आढळतो. ' परं वैभवं नेतुम् एतद् स्वराष्ट्रम् '– आमचे हे राष्ट्र वैभवाच्या शिखरावर न्यायचे आहे.

संघ फॅसिस्ट आहे, हुकुमशाही प्रवृत्तीचा आहे अशी नेहरूंची टीकाही या पुस्तकात आढळते. या आरोपाला एका मुलाखतीत सर-संघचालक मा. बाळासाहेब देवरस यांनी उत्तर दिलेले आहे. त्याचाच उल्लेख करणे इष्ट ठरेल. "संघाच्या शाखा खुल्या मैदानात चालतात. संघात निवडणुका नाहीत म्हणून हुकुमशाही आहे असे म्हणणे चुकीचे आहे. आमच्या विषयवार बैठकी होतात. तीन-तीन दिवस चर्चा चालतात. विचारमंथन होते, वादविवाद होतात, त्यातून आमचे कार्यक्रम ठरतात. उपस्थित प्रश्न चर्चा, वादविवाद करून तडीस लागावे, लोकांनी निर्भयपणे त्यावर आपले मत प्रगट करावे याला आम्ही लोकशाही म्हणतो."

अर्थात लेखकाला लोकशाही म्हणजे बेजबाबदार ' समाजवादी ' पत्रकबाजी अभिप्रेत असावी.

१९७७ च्या राजकीय सत्तेतील परिवर्तनाचे एकीकडून श्रेय मागावयाचे आणि रा. स्व. संघ ही राजकीय संघटना नसून सांस्कृ-तिक संघटना आहे अशा मुलाखती द्यायच्या (स्रोत– पृ. ६८) यावर लेखकाचा आक्षेप आहे. प्रथम एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की आणीबाणीतील संघर्ष हा सत्तेतील परिवर्तनापुरता मर्यादित नव्हता. हुकुमशाही विरुद्ध लोकशाही असे ह्याचे सरळ सरळ स्वरूप होते. तिचा समाजजीवनाच्या सर्व थरांवर परिणाम झाला होता. या संकटाचं निराकरण करणे हे राष्ट्रीय कर्तव्य होते आणि म्हणून एक सांस्कृतिक संघटना असूनही संघाने हे कर्तव्य पार पाडले.

संघाचे हजारो कार्यकर्ते ' लोकसंघर्षसमिती 'च्या सत्याग्रहात सामील झाले. जनतेचे मनोबल उंचावण्यासाठी संघाने जी व्यूहरचना केली त्यामुळे जनता जागृत तर झालीच, पण इंदिरा सरकारला सत्ता सोडणे भाग पडले. हे वस्तुस्थिती लेखकाला ज्ञात असेल तर ती नाकारण्याचा करंटेपणा कशाला करायचा ?

या ठिकाणी एक अनुभव दिला तर तो उचित ठरेल.

ज्या वेळेला सत्याग्रहाची योजना झाली तेव्हा आम्ही संभाव्य सत्याग्रहींना ह्यामागची भूमिका सांगायचो. शंकाच निराकरण करायचो. एका ' सेवादला 'च्या सैनिकाला सत्याग्रहाविषयी विचारले त्याने आम्हाला सुनावले– हे सगळं ठीक असलं तरी माणसानं आपला स्वार्थ बघायचा असतो. मला ' युवक कांग्रेस 'च सेक्रेटरी करतायेत, कशाला सोडायचा हा चान्स ? "

यावर अधिक भाष्य न लगे.

हिंदुराष्ट्र, हिंदुसंस्कृती, हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व इ. शब्दांच्या ' विचारधना 'तील उल्लेखाने लेखक अस्वस्थ झालेला दिसतो. प्रथम एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, हिंदुधर्म हा व्यक्तिनिष्ठ अथवा ग्रंथनिष्ठ नाही. ईश्वर मानणारे, न मानणारे, द्वैतवादी– अद्वैतवादी आदी निरनिराळ्या विचारांची माणसे या हिंदुधर्मात वर्षानुवर्षे सुखनैव रहात आहेत. आपल्या विचारांपासून वेगळा माणूस वधार्ह आहे असे कोणताच हिंदु मानीत नाही. ' सत्य एकच आहे. कोणी कोणत्याही मार्गाने ते गाठू शकतो,' हे हिंदुधर्माचे मूलतत्त्व आहे. हिंदुत्व ही कल्पना संकुचित नाही. संपूर्ण विचारस्वातंत्र्य आणि आचारस्वातंत्र्य हे हिंदुधर्माचे वैशिष्टय आहे.

स्वामी विवेकानंद शिकागोच्या धर्मपरिषदेस गेले होते. त्यांच्याशिवाय भारतातून मुस्लिम आणि इतर धर्मांचेही प्रतिनिधी होते. त्यांचा परिचय करून देताना ' हिंदुस्थानातील हिंदु-मुस्लिम धर्माचे प्रतिनिधी ' असा उल्लेख संयोजकांनी केला होता. याचा अर्थ सरळ आहे. कोणत्याही उपासनापद्धतीचा अंगीकार करणारा समाज हे हिंदुधर्माचे एक अंगच आहे.

' हिंदुत्व हे राष्ट्रीयत्व ' ही कल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मान्य असावी असे त्यांच्या एका पत्रावरून स्पष्ट होते.

डॉ. आंबेडकर लिहितात, ' मी माझ्या समाजाला ख्रिश्चन वा मुसलमान होऊ देणार नाही, ' कारण हिंदुसंस्कृतीच्या छायेतून जर माझी माणसे परधर्मात जातील, म्हणजे ख्रिश्चन वा मुस्लिम होतील तर तो राष्ट्रीयत्वाला आचवतील ! "

विषमता कमी करण्यासाठी संघ काही करीत नाही. संघ सामाजिक कार्यात नसतो असेही खंत लेखकाने व्यक्त केली आहे.

संघ काही करणार नाही असे नेहमी सांगितले जाते. स्वतःचे नियंत्रण प्रस्थापित करण्यास संघाला स्वारस्य नाही हे स्पष्ट होते. संघ, संघ म्हणून काही करणार नाही. जे जे आवश्यक ते ते समाजाने जागरूक राहून करावे हे संघाला अभिप्रेत आहे. एवढी जाण हृदयात हवी. ती जागृती, ती जाग संघ देतो. स्फूर्ती, प्रेरणा, स्फुरण संघाकडून मिळते. प्रत्येकाला आपापल्या स्वभाव, अभिरुचीप्रमाणे काम करण्यास संघ मोकळीक देतो. स्वयंप्रेरणेने सेवावृत्ती होणाऱ्यांची वाण समाजात आहे, ती भरून काढण्यासाठी संघ निघाला आहे. निःस्वार्थ सेवाभाव हृदयात बाळगणारे आणि देशभक्तीने भारलेले अनेक स्वयंसेवक संघाने उभे केले असून त्यांची सेवाकार्ये चालू आहेत.

जनता सरकारच्या उदयानंतर संघ आपली ताकद खूप वाढवील की काय म्हणून पुरोगामी शक्ती चिंतेत आहेत. परंतु संघाला सर्वव्यापी होता येणे शक्य नाही व ते त्यांना नकोही आहे. संघाला आपली मर्यादित पण सुसंघटित ताकद कायम टिकवायची आहे. ' (स्रोत– पृ. १३)

या ठिकाणी लेखकाचा गैरसमज झालेला दिसतोय. जनताराजवट आल्यावर संघाला अनुकूल काळ जरूर आला असेल. तरी संघाच्या दृष्टीने त्यामुळे फारसा फरक पडत नाही. कारण गेली पन्नास वर्षे विरोधी वातावरण, विरोधी राजसत्ता असून, दोन वेळा बंदी येऊनही आसेतुहिमाचल सर्व भारतवर्षात संघाने आपली संघटना उभी केली आहे. संघाला सर्वव्यापी होता येणे शक्य नाही हा आशावाद लेखकाने स्वतःच्या समाधानासाठी फार तर बाळगावा. कारण वाचाळपणा करण्यापेक्षा काम करणं संघवाले जाणतात. संघाला आपली ताकद इतकी वाढवायची आहे की सर्व समाज संघमय होईल. मग जातीय, वर्गीय दबावगटाची गोष्टच सोडा. आदिवासी, गिरिजनमागात संघाच्या प्रेरणेने सुरू झालेले प्रकल्प आणि शहरातील झोपडपट्ट्यांतून, खेड्यातील वाडीवस्त्यांवरून भरणाऱ्या शाखा याची साक्ष देतील.

विनय गुणे, संगमनेर

स्रोत
प्रा. रावसाहेब कसबे
जनबोध प्रकाशन
पा. ८०, ५ रु.


**लोकशाही : समाजवाद : सामाजिक समता : सांस्कृतिक संपन्नता**

**संपूर्ण माणूसपणाच्या पुनःस्थापनेचा विचारविनिमय**

# तात्पर्य

लोकायत प्रतिष्ठानचे नवे मासिक प्रकाशन

**लोकायत प्रतिष्ठान :** प्रा. गं. बा. सरदार ¤ डॉ. अ. रा. कामत ¤ प्रा. नलिनी पंडित ¤ श्री. बाबुराव बागुल ¤ प्रा. राम बापट.

**संपादक-मंडळ :** एप्. डी. पाटील ¤ शांताराम गरुड ¤ नारायण सुर्वे ¤ भास्कर जाधव ¤ दया पवार ¤ सुलभा ब्रह्मे ¤ छाया दातार ¤ अजित सरदार ¤ सुधीर बेडेकर (कार्यकारी संपादक)

**वार्षिक वर्गणी १५ रुपये : अंक १.५० रुपया**

संपर्क : १२५९/२ जं. म. रस्ता, पुणे ४११००४ / फोन ५३८०७

मुक्काम : मुंबई

# लूट—छबिलदास !!

उदय कला केन्द्रानं परिश्रमपूर्वक बसवलेल्या "राजा पारगावकरांच्या 'लूट' ह्या दोन अंकी नाटकाचा प्रयोग नुकताच 'छबिलदास' मध्ये सादर झाला.

प्रत्येक व्यक्तिमात्रात दडलेली दोन माणसं ! एक आतला दुसरा बाहेरचा· बाहेरचा माणूस— हे त्याचं घडणारं दैनंदिन दर्शन व आतला माणूस हे ठराविक परिस्थितीत स्पष्ट होणारं त्याचं प्रतिबिम्ब ! वरवर पाहता माणूस कसाही असला तरी वेळोवेळी 'आतला माणूस' डोकं वर काढीतच असतो.. मुखवटा कोणताही असला तरी ठराविक प्रसंगात, कितीही प्रयत्न केला तरी सुद्धा माणसाच्या नैसर्गिक प्रवृत्ती (Natural Tendencies) नष्ट होत नाहीत· वेळोवेळी त्या उफाळून येतातच. ह्याच नैसर्गिक प्रवृत्तींचं दर्शन घडविणारी परंतु निरनिराळ्या मुखवट्यांआड आपल्या प्रवृत्ती झाकू पाहणाऱ्या माणसांची निरनिराळ्या पातळ्यांवर चाललेली धडपड अन् त्यातून प्रतीत होणारी त्याची दुबळी संवेदना हा नाटचाचा मुख्य विषय. मयताबाबतचा उपहासगर्भ दृष्टिकोण हेही नाटचाचं दुसरं अंग !

पन्नाशी उलटलेल्या घैसासांची बायको मृत्यू पावते· घैसास बायकोच्या मृत्यूनंतर तीनच तासांत, नर्सबरोबर लग्न करण्याच्या गोष्टी करू लागतात· घैसासांचा मुलगा बच्चू (खरं तर आईच्या मृत्यूनं त्याला दुःख वगैरे व्हावं) पण त्याचं सोयरसुतक कोणालाच नाही. मित्राच्या नादानं बँक लुटून मिळवलेले पाच लाख रुपये घराबाहेर कसे काढावेत व फॉरिनला कसं पळावं ह्या विवंचनेत सापडलेला बच्चू, स्मशानात काम करणाऱ्या मित्राच्या—अविनाशच्या सल्ल्यानं ताटीबरोबर पैसे बाहेर काढायचं ठरवतो. एवढ्यात बँक-दरोडा-प्रकरण हातावेगळं करण्याचा विडा उचललेले व मागाहून प्रकरण दडविण्यासाठी लाच मागणारे सी· आय. डी. इन्स्पेक्टर तुंगारे एकंदर प्लॅनमध्ये विचका करतात—नंतर प्रत्येकाच्या जबान्या वगैरे व पुराव्याअभावी शेवटी स्वतःला प्रामाणिक म्हणवणाऱ्या दुबळ्या घैसासांचा दिला गेलेला बळी— हा कथाविषय !

आळतेकर स्पर्धा, चिंतामणराव कोल्हटकर स्पर्धा वगैरेंसाठी सादर केल्या गेलेल्या या नाटकाचा प्रयोग नेटका झाला खरा; परंतु कथाविषय जेवढा विस्तृतरीत्या परिणामकारक ठरावा तेवढा ठरत नाही·

बायकोच्या मृत्यूचा किंचितही परिणाम न झालेले, दुसऱ्या बाईच्या नादाला लागलेले परंतु वयोपरत्वे, आलेल्या दुबळेपणाची कबुली नर्सजवळ प्रांजळपणे देणारे, स्वतःशी प्रामाणिक असणारे श्री. घैसास— हे एक पापभीरू व्यक्तिमत्त्व ! त्यांना भय आहे— समाजाचं— प्रतिष्ठेचं ! परंपरा झुगारण्याचं धाडस त्यांच्यात नाही. प्रथम बायकोच्या ताटीवर पाय पसरून बसणारे घैसास— नंतर त्यांच्यातला माणूस बँकेच्या पैशात वाटा घेण्याचं साफ नाकारतो. सर्वांनी लादलेला बायकोच्या खुनाचा आरोप नाकारताना, स्वतःचं प्रामाणिक रूप स्पष्ट करण्याची त्यांची धडपड अन् त्यातून स्पष्ट होणारा त्यांचा दुबळेपणा इ. सारी रूपं श्री. रवीन्द्र बेरडे यांनी अप्रतिमपणे उभी केली· नाटकाच्या एकंदर यशात त्यांचा वाटा निश्चितच महत्त्वाचा !

सॅनिटरी इन्स्पेक्टर म्हणून घरात घुसलेले सी. आय. डी. इन्स्पेक्टर तुंगारे— हे एका बेजबाबदार, उथळ मनोवृत्तीचं प्रतीक ! "ड्यूटीवर असताना अनेक मोह टाळावे लागतात" असं तोंडानं म्हणताना— नर्सशी लगट करू पाहणारे, प्रेतास पाय लागला म्हणून नमस्कार करणारे अन् दुसरीकडे प्रकरण हातावेगळं करण्यासाठी लाच घेऊन घैसासांचा बळी देऊ पाहणारे तुंगारे— श्री. शरद वाघ यांचा अभिनय (विशेषतः त्यांची आवाजावरील पकड) तुंगारेंचं व्यक्तिमत्त्व समर्थपणे स्पष्ट करून गेला. अर्थात चालण्याबोलण्यात होणाऱ्या हालचालींचा अतिरेक टाळणं हे एकंदर परिणामाच्या दृष्टीनं निश्चितच चांगलं. बच्चूचा मित्र अविनाश आणि नर्सचं काम करणाऱ्या प्रतिमा वाघ ठीक वाटल्या; परंतु बच्चूचं काम करणारे वसंत गलगडे ह्यांचा अभिनय खटकतो· त्यांच्या हालचालीही जरा 'डल' वाटतात·

रवीन्द्र दिवेकरांचं दिग्दर्शन सुरेखच ! विशेषतः "मडक्याचा विविधोपयोग" एकदम पसंत ! परंतु प्रेताची चालविलेली हलवाहलव आवश्यक असली तरी सुद्धा त्यातला विस्कळीतपणा जाणवल्याखेरीज राहिला नाही. तुंगारेंनी पिस्तूल दाखवून इतरांना हॅंड्स्-अप वगैरे करणं (मंद प्रकाशात) कितपत आवश्यक आहे ह्याचा विचार व्हावा. रमेश उमरोटकरांचं नेपथ्य ठीक. शशांक वैद्यांची प्रकाशयोजना मात्र खटकते.

थोडक्यात सांगायचं तर, उपक्रम स्तुत्य' सुधारणेस वाव !

□


## नवीन दाखल झालेली काही पुस्तके

| | |
|---|---|
| १. अंधारवाटा – (कादंबरी) –सुभाष भेण्डे | रु. १२/– |
| २. आठवण – (कथासंग्रह) – गंगाधर गाडगीळ | „ १०/– |
| ३. गेला तिच्या वंशा – (कादंबरी) – उद्धव ज. शेळके | „ २०/– |
| ४. मागले पाऊल – (कादंबरी) – नयना आचार्य | „ १२/– |
| ५. उद्रेक – (कादंबरी) – नयना आचार्य | „ २२/– |
| ६. घायाळ हरिणी – (कादंबरी) – कुमुदिनी रांगणेकर | „ ८/– |
| ७. अखेरची लढाई – (कादंबरी) – स. शं. देसाई | „ २०/– |

● पुस्तकांच्या किमती फार भडकल्या आहेत ! पुस्तके विकत घेण्यापेक्षा एखाद्या चांगल्या वाचनालयाचे सभासद व्हा व पैसे वाचवा !

● 'फिनिक्स' एक आगळे, एक वेगळे वाचनालय !!

● 'फिनिक्स'चे सभासदत्व म्हणजे आपल्या उच्च अभिरुचीची साक्ष !

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

चित्रपट परीक्षण

# किताब

## गुलजारच्या प्रतिभेचा बगीचा पुन्हा बहरात येऊ लागला.

सदानंद बोरसे

चित्रसृष्टीत काही तरी नवीन, चांगले घडविणाऱ्या व्यक्तींना कधीकधी सातत्याने आपल्याच कामगिरीवर बोळा फिरविण्याचा झटका येत असावा. हृषिकेश मुकर्जींना आलाप, कोतवालसाब या चित्रपटांमधून असा एक सौम्यसा झटका येऊन गेला, तर शांतारामबापूंनी 'चानी'मधून आपणही या झटक्यातून सुटलो नसल्याचे सिद्ध करून टाकले. बराच काळ त्यापासून मुक्त असणारा गुलजारही हल्ली त्याला बळी पडला होता. अचानक, मेरे सपने, परिचय, कोशिश, आँधी यांसारखी एकेक सरस चित्रपटांची मालिकाच पेश केल्यानंतर मौसम, खुशबू, किनारा इत्यादींमधून गुलजार दिवसेंदिवस आपला कलात्मकतेचा आलेख खाली खाली कसा येईल याची काळजी घेऊ लागला होता. हे झाले दिग्दर्शक गुलजारबद्दल. कवी गुलजारही आनंद बक्षींकडून शब्दजुळाऱ्याचे पद हिसकावण्यासाठी झडगत होता. खट्टा-मीठा व पलकों की छाँव में या त्या झगड्यातील मोठ्या जखमा. कथालेखक म्हणून गुलजारची कारकीर्द उज्ज्वल कधीच नव्हती. त्याच्या चांगल्या चित्रपटांपैकी परिचय, कोशिश या चित्रपटांच्या कथांची बीजे परदेशी चित्रकथांमध्ये आहेत, आँधीची कथा कमलेश्वरांची, मेरे अपनेची कथा तशी सामान्यच, त्यात दिग्दर्शक गुलजारचाच प्रभाव अधिक. त्यामुळे कथालेखक म्हणून त्याच्याकडून फारशी अपेक्षा नसतेच. त्यानेही या निरपेक्षतेबद्दल योग्य तो आदर दाखवून 'पलकों की छाँव में'ची कथा लिहून पाहिली. म्हणजे काय, तर प्रेमत्रिकोणातील तीन बिंदू मांडून थोडासा संघर्ष उभा करणे आणि नंतर पटकन एक बिंदू उखडून टाकून मग उरलेल्या दोन बिंदूंमधील सरळरेषा जोडून टाकणे अशी जुनीपुराणी भूमिती वापरली. 'किनारा'मध्येही त्याने हेच कृत्य वापरले होते.

तर सर्व आघाड्यांवर मोठ्या जोमाने चाललेली ही घसरण गुलजारने 'किताब'मधून अतिशय प्रयत्नपूर्वक थांबवली आहे. त्याने स्वतः कथालेखक न बनता कथानिवडक बनून अमरेश बसूंची एक सुरेख कथा निवडली आहे. दिग्दर्शक म्हणून जुनी आणि प्रभावी नाही; पण अजूनही निदान वाईट वाटणार नाही अशी तंत्रे वापरली आहेत, चित्रपटाची गीतेही चांगल्यापैकी अर्थपूर्ण दिली आहेत आणि खुसखुशीत संवाद हा तर त्याचा खास प्रांत आहेच. 'किताब'ची कथा आहे बाबला नावाच्या एका लहान मुलाभोवती गुंफलेली. शिक्षणासाठी हा बारा वर्षांचा पोरगा आपल्या मोठ्या बहिणीकडे (पर्यायाने मेहुण्याकडे) दिल्लीला राहात असतो. अनेक घटनांमुळे बाबला शिक्षणाला, शाळेला कंटाळतो, वैतागतो आणि आईकडे परत जाण्यासाठी, अमरेलीला परतण्यासाठी म्हणून बहिणीच्या घरून पळून जातो. प्रवासातील चित्रविचित्र अनुभवांमुळे बाबला बदलतो आणि शिक्षण घेण्याच्या तीव्र स्वेच्छेने मेहुण्यांबरोबर पुन्हा दिल्लीला परततो. शाळेत, बहिणीच्या घरी आलेल्या छोट्या छोट्या अनुभवांमधून बाबलाच्या बालमनावर उठणारे ओरखडे, होणारे आघात, मित्राच्या सहवासात त्याच मनाला येणारा मोरपिसाच्या हळुवारपणाचा अनुभव हे बाबलाच्या बालमनाचे विश्लेषण आणि प्रवासातील त्याच्या अनुभवांद्वारे घडविलेले वैविध्यपूर्ण जीवनदर्शन ही दोन या कथेची ठळक वैशिष्ट्ये.

दहा-बारा वर्षांचा मुलगा जितका खोडकर असू शकतो, तितकाच बाबलाही खोडकर होता. बाबलाच्या शाळेचे वातावरण अतिशय कडक असल्याने किंवा त्यांचे मुलांकडे आवश्यकतेपेक्षा अधिक लक्ष असल्याने बाबलाने केलेल्या व न केलेल्या खोड्यांबद्दल वारंवार त्याच्या नावाने घरी पत्र जात असे. खोड्यांमुळे, मुलांच्या चिडविण्यामुळे आणि स्वतःची चूक नसताना शिक्षा झाल्यामुळे बाबलाच्या मुलांशी मारामाऱ्याही होत. साहजिकच बाबलाला शाळेचा अत्यंत कंटाळा आला. तो व त्याचा मित्र पप्पू जमूरा, जिलबीवाला, बग्गीवाला आणि अशीच किती तरी स्वप्ने पाहत असतात- केवळ शाळेपासून सुटका करून घेण्यासाठी. बाबलाने पप्पूला एक पेन भेट दिल्यानंतर त्याचे मेहुणे त्याला रागावतात. अशा छोट्या छोट्या प्रसंगांची बाबलाच्या मनात उमटणारी प्रतिबिंबे व त्यामुळे शाळेबद्दलची वाढती नावड बाबलाच्या डायरी लिहिण्यातून व्यक्त होते.

पळून गेल्यानंतर त्याला अंगाई म्हणणारी प्रेमळ आई आठवते, आपल्या शिक्षणाचा भार नवऱ्यावर पडू नये म्हणून नोकरी करणारी बहीण आठवते, स्वतःच्या मुलाप्रमाणे प्रेम करणारे मेहुणे आठवतात, शाळेतील मित्र पप्पू आठवतो. प्रवासातही त्याची रेल्वेचा इंजिन-ड्रायव्हर, गार्ड यांच्याशी मुलाखत होते, आयुष्य पाहिलेला एक आंधळा फकीर भेटतो, शेवटी भुकेने व त्यापेक्षाही एकाकीपणाने व्याकुळलेला बाबला घरी परततो, तो शाळेत जाऊन, मन लावून अभ्यास करण्याच्या निश्चयानेच.

'अचानक' पासून आपल्या प्रत्येक चित्रपटात गुलजारने फ्लॅश बॅकचा सढळ हाताने वापर केला आहे. 'किताब'ही त्याला अपवाद नाही. संपूर्ण चित्रपटात सहा फ्लॅश-बॅकचा वापर केला आहे, जोडीला बाबला व पप्पू हात बांधलेल्या अवस्थेत दोरीला बांधलेली फळे खाण्याचा प्रयत्न करतानाचे एक स्वप्नदृश्य. सहा फ्लॅश-बॅकमधून छोट्या छोट्या प्रसंगांमधून बाबला आकार घेतो. त्याच्या खोड्या, अभ्यास करण्याबद्दलच्या शिक्षकांच्या, बहिणीच्या व मेहुण्याच्या सतत दटावणीने त्याच्या मनावरचा वाढत जाणारा ताण, अभ्यास न करता उद्योग करण्याबद्दल त्याने व पप्पूने रचलेली मनोराज्ये हे सगळे या प्रसंगांमधून घडत जाते. शाळेला दांड्या मारून दोघांनी मोठ्या माणसाच्या स्टाइलने सिगरेट ओढणे व फेकून देणे, इंग्रजीच्या सरांना 'शत्रुमुख, अंडा दे' म्हणून चिडविणे, हिंदीच्या नवविवाहित सरांचे 'क्यों पंडितजी, सुहाग रात कैसे कटी? मजा आया?' या ओळीने केलेले स्वागत, टिंगू नावाच्या बुटक्या माणसाने केलेली गब्बरसिंगची नक्कल व धरम वीरमधील गाणे, 'अ आ इ ई, मास्ट-

'रजी की आयी चिठ्ठी' हे बडबडगीत असे अनेक प्रसंग गुलजारने खुसखुशीत रंगविले आहेत. तर अभ्यास न करता जादू शिकून जगण्याच्या विचाराने बाबला-पप्पू ज्या डोंबाऱ्याकडे जातात, तो डोंबारी मात्र आपल्या पोराला रात्रीच्या शाळेत पाठविण्याच्या विवंचनेत, आंधळ्या बैजूने भिकारी, त्यांची श्रीमंती, खानदान यांवर केलेली टिप्पणी, सहज जाता जाता सांगितलेले जीवनाचे तत्त्वज्ञान किंवा एक मृत म्हाताऱ्या भिकारणीच्या कुशीत बाबलाने काढलेली रात्र असे कित्येक प्रसंग मनाला चटका लावून जातात. बाबलाची बहीण सुमन आणि मेहुणे निखिल गुप्ता यांच्यात सुमनने मॉडेलिंगचा व्यवसाय करण्यावरून निर्माण झालेल्या तणावाचेही बाबलाच्या जीवनात Projection पडले आहे.

बाबलाचे डायरीलेखन म्हणजे तर त्याच्या घडणाऱ्या व्यक्तिचित्रणाचा आरसाच आहे.

या सगळ्या सुबक हाताळणीबाबत फक्त दोनच आक्षेप- १) गुलजारचे फ्लॅश बॅकचे तंत्र जुने व कंटाळवाणे वाटते. चित्रपटही त्यामुळेच काहीसा संथ वाटतो. २) चित्रपटात पुष्कळशा पात्रांच्या तोंडून गुलजारच बोलतो. उदा.- निखिल गुप्ता, बैजू फकीर वा बाबलाला तपासण्यास आलेले डॉक्टर. ही यादी येथेच थांबली असती तर तक्रारीचे फारसे कारण नव्हते; पण त्यात बाबलाचीही भर पडते. वेळीअवेळी हे नखाएवढे पोर धाडदिशी जीवनविषयक तत्त्वज्ञानच बोलून टाकते, त्या वेळी त्याच्या कोवळ्या खांद्यावर गुलजारचा चेहरा प्रेक्षकाला दिसतो.

गुलजारची गीतकार म्हणूनही कामगिरी ठीक झाली आहे. विशेषतः 'हरि, दिन तो बीता, शाम हुई; रात पार करा दे' आणि 'मेरे साथ चले ना साया; धरम ने ही, करम ने ही जनम गँवाया!' ही दोन भजने अर्थदृष्टया सुरेख उतरली आहेत; तर 'कासव छाप अगरबत्ती' आणि 'व्ही. आय्. पी. अंडरवेअर, बनियान' ह्या जाहिराती घातलेले बडबडगीतही ठाकठीक आहे. गुलजारच्या कामगिरीला राहुलदेव बर्मनने योग्य साथ दिली आहे. दोन भजनांना त्याने दिलेले संगीत केवळ त्यांच्या पिताजींनी दिलेल्या भजनांची आठवण करून देणारे. 'धन्नो की आँखों में हाः रात का सूरमा और चाँद का जुम्मा' या इंजिन-ड्रायव्हरच्या गाण्याला त्याने दिलेले काहीसे कर्कश, ओबडधोबड संगीत आणि वापरलेला स्वतःचा टिपेचा आवाज यांमुळे ते गीत केवळ इंजिन-ड्रायव्हरचे वाटण्याइतके खरे व चांगले बनले आहे. एकूणच गुलजार-आर्. डी. जोडीची कामगिरी नेहमीच समाधानकारक असते. (Titles ना आर्. डी. ने दिलेला 'भाग चला, भाग चला, किधर चला, किधर चला'चा आगगाडीसारखा ताल 'आशीर्वाद'ची आठवण देणारा.)

चित्रपटात सर्वाधिक वाव बाबलाच्या मध्यवर्ती व्यक्तिरेखेला आणि मा. राजूने वर उल्लेखिलेले त्या व्यक्तिरेखेचे सर्व पैलू अत्यंत सुरेख भावदर्शनाने साधले आहेत. मा. टिटोने पप्पूच्या कामात त्याला तितकीच चांगली साथ दिली आहे. मला त्या दोघांमुळे 'ऑलिव्हर' व 'मेलडी'मधील मार्क लिस्टर आणि त्याच्या जोडीदाराची आठवण झाली, बाकी उत्तमकुमार-विद्या सिन्हापासून डॉ. श्रीराम लागू-दीना पाठकपर्यंत सर्वजण ठीक.

चित्रपटाचे छायाचित्रकार आहेत एम्. संपत. त्यांनी रात्रीच्या वेळी आगगाडीचे घेतलेले शॉट्स अफलातून आहेत.

तर गुलजारच्या प्रतिभेचा बगीचा पुन्हा बहरात येऊ लागल्याची चिन्हे दाखविणारा हा 'किताब.' *

---

खुद्द जादुगारालाही न कळलेला

# जादूटोना

---

काही दिवसांपूर्वीच 'दरवाजा' नावाच्या चित्रपटाबद्दल लिहिताना उल्लेख केलेला 'जादूटोना' पुण्यात येऊन दाखल झाला आहे. 'दरवाजा'ची कथा सोडली; तर बाकी भीतिपट म्हणून त्याच्याबद्दलचे सगळे वर्णन 'जादुटोनाला'ही लागू पडते.

प्रथम जादूटोनाची कथा सांगतो. पन्नालाल नावाच्या मृत माणसाचा प्रेतात्मा हर्षा (बेबी पिंकी) नावाच्या छोटया मुलीला पछाडतो आणि तिच्या शरीराचा आश्रय घेऊन आपल्या दोन दुश्मनांचा खून करतो, नंतर बजरंगीबाबांच्या कृपेने हर्षा पन्नालालच्या तावडीतून सुटते व पन्नालाल आपल्या तिसऱ्या शत्रूचा खून करून मुक्त होतो. या साऱ्या कथानकात मग डॉ. कैलाश आर्य (फिरोजखान) नावाचा एक मनोरुग्णतज्ज्ञ आणून नव्या-जुन्याचा झगडा, 'जुने ते सोने' हा सिद्धांत पटविणे व हर्षाच्या मोठ्या उपवर बहिणीसाठी-वर्षासाठी (रीना रॉय) एक योग्य स्थळ गटविणे इतके पक्षी दिग्दर्शकाने त्या डॉक्टरकरवी मारले आहेत.

चित्रपटाच्या सुरुवातीलाच जन्म, मृत्यू, आजचे विज्ञान, त्यांच्या आवाक्याबाहेरचे ज्ञान इत्यादिविषयक एक लंबेचवडे भाषण आहे. त्याचा सारांश असा, 'माणसाच्या जन्माआधी व मृत्यूनंतर काय घडते, तो कोठून येतो व कोठे जातो, या गोष्टी अजूनही कोणाला कळलेल्या नाहीत. चंद्र व मंगळ माणसाच्या आटोक्यात आलेले असले तरी त्यापलीकडील अथांग, अनंत ब्रह्मांडाचा अंशही त्याला माहीत नाही. माणसाला दिसते वा माहीत असते, तेच सत्य असते असे नाही; तर नजरेस न पडणारे न आकळणारे बरेच सत्य अस्तित्वात आहे, ते फक्त सर्व शक्तिमान परमेश्वरालाच ठाऊक आहे. अशाच सत्यांपैकी एक-भूतयोनी. अतृप्त वासना असलेल्या आत्म्यांना मुक्ती न मिळता ते भुते बनतात व आपल्या इच्छा तृप्त झाल्यानंतरच मुक्त होतात. हिंदू पुराणे, मुस्लीम कुराण व ख्रिस्ती बायबल या तिन्हींमध्ये अशा आत्म्यांचे उल्लेख आहेत. अशाच एका अतृप्त आत्म्याची ही कहाणी.' आणि चित्रपटाला सुरुवात होते. मग जुने संकेत, रूढी, चालीरीती कशा खऱ्या आहेत, हे सिद्ध करण्यात आणि त्यापुढे नव्या पद्धती किती क्षुद्र आहेत, हे दाखविण्यात सर्व फिल्म खर्ची पडते. अमीरचंद (प्रेम चोप्रा) व त्यांच्या मुली हर्षा-वर्षा खेडेगावात येताना वेशीवरील पिंपळाला नमस्कार न करता आल्याने त्यांची गाडी बंद पडते, हर्षाला पन्नालालचे भूत झपाटते, बजरंगीबाबांच्या ताइतामुळे व गंगाजलामुळे भूत काही वेळ हर्षापासून दूर राहते, भुताने खून केल्यास बोटांचे ठसे मिळत नाहीत, भुताने पछाडलेल्या हर्षाच्या हातून डॉ. कैलाश ७८६ या आकड्यामुळे वाचतो. (संदर्भ-'दीवार'-७८६ अल्लाचा

नंबर ) आणि शेवटी बजरंगीबाबा व भूत यांची लढत हे सगळेच भूत व त्याचे अस्तित्व खरे असल्याचे ठसविण्यासाठी घेतले आहे. या सगळ्याला तिखटमीठ म्हणून डॉ. कैलाशचे असफल होणारे वैद्यकीय व शास्त्रीय प्रयत्न आहेत.

या सगळ्या प्रकारात माझ्या मते या कथेच्या परिणामाच्या दोन बाजू आहेत.– ( १ ) चित्रपट-समाजसुधारणेचे लोकशिक्षणाचे माध्यम म्हणून ही कथा, ( २ ) चित्रपट-एक विशुद्ध कला ( किंवा अनेक कलांचा एकवटलेला समुच्चय. ) यांपैकी कोणती बाजू बरोबर या वादात न शिरता व माझी मते काहीशी बाजूला ठेवून मी या दोन्ही दृष्टिकोनांमधून 'जादूटोना'चा विचार करणार आहे.

चित्रपट हे समाजमनावर व लोकमतावर परिणाम करणारे माध्यम म्हणून त्याच्याकडे पाहिले आणि ते लोकशिक्षणासाठी वापरण्याचा हेतु डोळ्यांसमोर ठेवला; तर 'जादूटोना' हा या हेतूच्या संपूर्ण विरुद्ध जाणारा चित्रपट आहे. आज विशेषत: हिंदी चित्रपट भारतात बऱ्याच खोलपर्यंत पोहोचला आहे. भारतीय खेड्यांमधील जुनाट मते, पुराण्या पद्धती–मग त्या शारीरिक संकटांवरील असोत वा मानसिक व्याधींवरील, त्यांच्यामधील वैज्ञानिक पाया नसलेली तर्कहीनता, क्रूरता व अंधश्रद्धा यांबद्दल वेगळे लिहिण्याची गरज नाही. उत्तम ( म्हणजे शहरी माणसापेक्षा कित्येके पट जास्त ) सहनशीलता व प्रतिकारशक्ती असूनही योग्य औषधाअभावी नव्हे, तर अयोग्य उपचारांमुळे काटयाचा नायटा बनून खेडेगावातील लोक स्वत:चे जन्माचे नुकसान करून घेतात आणि भूत–पिशाच्याला एखाद्या वेडयाच्या डोक्यावर बसवून, त्याला अनन्वित मानसिक व शारीरिक छळाला बळी पाडून त्याच्या आयुष्याचे नुकसान करतात. अशा अवस्थेत चित्रपटांमधून या लोकांना 'अहो, हा तुमचा पुराणमतवादीपणाच बरोबर आहे हो, त्या शहरी वेडयांच्या नादी लागू नका!' असे सांगणे म्हणजे त्यांना भूतकाळात ढकलून आणखी खड्डयात घालण्यासारखे आहे. आता याचा अर्थ 'भूत' या संकल्पनेवर माझा विश्वास नाही, असे नाही किंवा खेडयातील एखादा हिरवा पाला एखाद्या जीवघेण्या दुखण्यावर रामबाण उपाय होऊ शकतो, ही वस्तुस्थितीही मला अमान्य करायची नाही. फक्त या गोष्टींचा विचार न करता, त्यांना कसोटीच्या दगडावर पारखून न घेता अशिक्षित लोकांच्या मनात मुळे घुसवून बसलेल्या त्या कल्पना आपण आणखी पक्क्या करू नयेत. अर्थात 'तर्कशुद्ध अभ्यास' हे दोन शब्द आले की, आम्ही असहाय्यपणे पाश्चात्यांच्याच गळयात पडतो. त्यांच्याकडे Pewapsychology या नवीन शास्त्राचा झालेला उदय हे याचेच उदाहरण आहे. बाकी आम्ही डोक्याला ताण न देता फक्त crude तंत्र लक्षात ठेवणार. तर अशी परिस्थिती असताना लोकशिक्षणाचे माध्यम म्हणून 'जादूटोना' पूर्णत: अयोग्य आहेच. 'सर्व जुन्या पद्धतींबद्दलचे तुमचे अज्ञान हीच त्यांच्या खरेपणाची कसोटी' असा फसवा युक्तिवाद त्यात पांघरला आहे. 'जे दिसत नाही, ते सत्य अस्तित्वातच नसते काय?' या प्रश्नाला उत्तर म्हणून 'जे माहीत नाही; ते सारेच अस्तित्वात असते काय?' असा प्रश्न विचारता येईल. 'जादूटोना'मध्ये हर्षावरील मानसोपचार, Epilepsy अथवा Split / Dual Personality असे तिच्या रोगाचे केलेले निदान हा सगळा आधुनिक विज्ञानाचा भाग प्रेक्षकांसमोर आणलेला असला, तरी त्यातील फोलपणाच (मग तो खरा फोलपणा असो वा खोटा) फक्त जाणवेल अशा रीतीने तो मांडून प्रत्येक ठिकाणी भूत व त्याचे चाळे या सुसज्ज व अक्षय्य भात्यातील बाणांनी त्या शास्त्रीयतेला छेद दिला आहे.

हे झाले चित्रपटाकडे पाहण्याच्या पहिल्या दृष्टिकोनाच्या चष्म्यातून.

आता चित्रपट–एक विशुद्ध कला म्हणून पाहिले, तरी 'जादूटोना' पुष्कळ बाबतीत हिणकस ठरतो.

कलेचाच दृष्टिकोन ठेवल्यावर कथावस्तूवर विषयाचे बंधन राहात नसले, तरी स्वत:चीच प्रकृती सांभाळण्यासाठी तिला काही पथ्ये सांभाळावीच लागतात. भूत ही संकल्पना व विज्ञान यांमधील झगडा अशी कथा असल्यास त्यातील एकांगीपणा मी वर सांगितलाच. भुताचा खरेपणा व त्यातून आकारणारा भीतीपट असा विषय असला, तरी तो पोकळच बनतो. कारण त्यातील कथानकाबरोबर चालणारी उपकथानके–(१) वैज्ञानिक पद्धतींबरोबरील झगडा व त्याचा फोलपणा दाखविण्याचा अट्टाहास. २) डॉ. कैलाश व वर्षाचे प्रेमप्रकरण, ३) डॉ. कैलाशचे वेडयांचे इस्पितळ आणि त्याच्या सहाय्यकाचे–युसुफचे (मुक्री) प्रेमप्रकरण. या तिसऱ्या उपकथानकाचे उद्देश प्रेक्षकांच्या मनावरील ताण विनोदाने दूर करणे असा असावा, अशी मला पुसटशी शंका आहे या गोष्टींमुळे 'जादूटोना' चांगला भीतीपटही ठरत नाही. दिग्दर्शक रविकांत नगाईच यांनी या उपकथानकांच्या घोळात विषयाची फरपट तर केलीच; पण स्वत: तेही व्ही. शांताराम ते होमी वाडिया या दोन टोकांमध्ये झोकांड्या खात होते. उदाहरणार्थ– दैवी व सैतानी शक्तींची लढाई–काळ्या व पांढऱ्या ( मला वाटते, रंगांचा क्रम अनुक्रमे उलटा हवा ) मांजरांची झुंज, जादूगाराच्या हलत्या हातांवरील titles प्रत्येक वेळी काळ्या मांजराचा भौत्य (म्हणजे भुताचे) प्रतीक म्हणून केलेला वापर असे खास व्ही. शांतारामी वळणाचे टच् अन् पन्नालाल व बजरंगीबाबा या दोन भुतांची मारामारी म्हणजे होमी वाडियागिरीला अर्थात trick–scenes ला रान मोकळे. दोन्हीही टोके सारखीच बटबटीत व जुनी वाटतात. रविकांत नगाईच हा गृहस्थ मेरे जीवनसाथी वा रानी और लालपरी या चित्रपटांमधून दिग्दर्शनाकडे वळला असला, तरी तो चांगला दिग्दर्शक नाही, तो आहे एक नाणावलेला छायाचित्रकार. या गोष्टीचे प्रत्यंतर त्याने 'जादूटोना'मध्ये पूर्णपणे आणून दिले. हर्षाला पन्नालाल पहिल्यांदा पछाडतो, तेव्हा व चित्रपटात नंतरही काही वेळा केलेले एक रंगी निगेटिव्हचा feel देणारे छायाचित्रण पछाडलेल्या हर्षाने अमानवी कृत्ये करताना–


मोफत ! मोफत !! मोफत !!!

**पांढरे डाग**

नीलकमल बुटीने ३० वर्षांपासून पांढऱ्या डागाच्या रोग्यांना पूर्णपणे लाभ देऊन जगात प्रसिद्धी मिळविली आहे. आपणही एक लावायचे पॅकिट मोफत मागवून लाभ प्राप्त करा. केवळ १ महिन्यातच पूर्णपणे फायदा.

जवाहर चिकित्सा केंद्र

पो. कतरीसराय (गया)

वापर करून घेतलेली दृश्ये, हर्षाच्या हातून हॅगिंग गार्डनमध्ये पहिला खून होताना टिपलेली प्राण्यांची हिंस्रता व अस्वस्थता हे सगळे केवळ एक कसलेला छायाचित्रकारच करू शकतो. 'आईने, कुछ तो बता, उनका हमराज है तू।' या गीताला डॉ. कैलाशला आरशात दिसलेल्या वर्षाच्या प्रतिबिंबांचे चित्रण, त्या वेळी लावलेले शॉट्स आणि त्या प्रत्येक प्रतिबिंबातील नेत्रसुखद रंगसंगती हेही त्यांच्या छायाचित्रणकौशल्याचे एक नमुनेदार उदाहरण.

चित्रपटात अभिनय करणारी माणसे दोनच– बेबी पिंकी व अशोककुमार. जुनेपणावर विश्वास ठेवणारा, प्रत्येक गुन्ह्याला, नंतरच्या कायदेशीर सोपस्काराला 'just a matter of routine' मानणारा, धडाधड शब्दांचे शॉर्ट फॉर्म करणारा (Vs–vegetable sandwiches, Ic–identity–card इत्यादी) मुरलेला इन्स्पेक्टर जॉली गुडमॅन अशोककुमारने थाटात उभा केला आहे. बाकी रीना रॉयची फॅशन परेड, फिरोजखानची आवारागिरी, प्रेमनाथचे रेड्यागत रेकून ओरडणे ही सगळी यादी आणि last but not the least बेबी पिंकी.

बेबी पिंकीने हर्षाच्या भूमिकेचे अक्षरशः सोने केले आहे. लहान, खेळकर, खोडकर हर्षा (तिचे वर्षाताईला चिडविणे, वर्षा व कैलाशची थट्टा करणे, तिचा निष्पापपणा) ही बाजू तिने आपल्या वयामुळे व सहजतेमुळ उत्कृष्ट वठविली आहेच; पण भुताने झपाटल्यानंतर पहिल्या अनुभवाच्या वेळेस निर्माण होणारा असह्य शारीरिक व मानसिक ताण, त्यातून सुटण्याची तिची असहाय्य केविलवाणी धडपड, नंतर भुताच्या तावडीत सापडल्यानंतर चेहऱ्यावर येणारा कठीणपणा, खून करतानाचे क्रौर्य, त्या वेळचे भेसूर हास्य, झपाटले जात असताना शरिराला मिळणारे आचके, हातपाय वाकडे होणे, शेवटी बजरंगीबाबाकडे जाऊन भुताच्या तावडीतून सुटण्याची तिची चाललेली धडपड आणि तिने वठविलेले आत्यंतिक परस्परविरोधी moods मी कधीच विसरू शकणार नाही. या एवढ्याशा पोरीकडून इतके अवघड काम करवून घेण्याचे श्रेय रविकांत नगाईच– दिग्दर्शक जरूर घेऊ शकतात. आपल्या वयाबाहेर, स्त्रीत्वाबाहेर आणि अनुभवाबाहेर जाऊन या पोरीने केलेले हे काम अक्षरशः थक्क करणारे आहे. त्याबद्दल तिचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे.

या चित्रपटामधून 'टॅक्सी टॅक्सी'नंतर पुन्हा हेमंत भोसलेला संगीतकार म्हणून संधी मिळाली आहे. चित्रपटातील 'हे सेवक श्रीराम के' ही 'ॐ जय जगदीश हरे'च्या नेहमीच्या चालीतील मारुतीची आरती सोडल्यास 'ये गाँव प्यारा प्यारा', 'आइने, कुछ तो बता' आणि सांवर सलोनी, जमना का जीवन' ही तीनही गीते श्रवणीय आहेत. जाहिरातीत नेहमी लागणारे व चित्रपटाच्या ट्रेलरमध्येही दाखविलेले 'हर सन्नाटा कुछ कहता है' हे चांगले गीत चित्रपटातून कापल्याने ती चुटपुट लागून राहिली. बाकी पार्श्वसंगीत म्हणजे तथाकथित भीतिदायक प्रसंगांना 'ढॅटणॅण्' आणि प्रेम वगैरे नाजूक भावना की सतार-तबला.

चित्रपटातच शेवटी म्हटल्याप्रमाणे 'खुदा की बातें खुदाही जाने'च्या तालावर जादू-टोनाका जादू खुद जादुगर भी ना जाने। □

## पक्ष बैठका

पृष्ठ ७ वरून

दोन कम्युनिस्ट पक्षांची अधिवेशने पंजाबमध्ये नुकतीच झाली. त्यातून या दोन पक्षांच्या एकीकरणाची नव्हे पण सहकार्याची शक्यता वाढली आहे. उजव्या कम्युनिस्टांनी काँग्रेसची व इंदिरा गांधींची संगत सोडल्याशिवाय त्यांच्याशी कोणत्याही प्रकारची बोलणी आम्ही करणार नाही अशी मार्क्सवाद्यांची ठाम भूमिका होती; पण सहकार्यासाठी आता बिनशर्त वाटाघाटींची तयारी त्यांनी दर्शविली आहे. भटिंडा येथील उजव्या कम्युनिस्टांच्या अधिवेशनात जो अहवाल संमत झाला तो लक्षात घेता शर्ती घालण्याची आवश्यकता मार्क्सवाद्यांना वाटत नाही. या अधिवेशनात डांगे भूमिकेचा पराभव झाला. आणीबाणीला पाठिंबा देण्यात पक्षाची चूक झाली, अलाहाबाद हायकोर्टाच्या निर्णयानंतर श्रीमती गांधींच्या राजीनाम्याची मागणी पक्षाने करायला हवी होती. बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीला पक्षाने विरोध करायला हवा होता हे अहवालात मान्य करण्यात आले आहे. जनता पक्षातही काही पुरोगामी गट आहेत हे उजव्या कम्युनिस्टांनी आता मान्य केले आहे.

दोन कम्युनिस्ट पक्षांच्या सहकार्याच्या दृष्टीने मार्क्सवाद्यांच्याही धोरणात काही बदल झाले आहेत. डाव्या व लोकशाही आघाडीत पुरोगामी धोरणाच्या काँग्रेसजनांचा समावेश करण्याचे मार्क्सवाद्यांनी मान्य केले आहे. तसेच केरळच्या संयुक्त आघाडी सरकारमधून कम्युनिस्टांनी बाहेर पडावे याबद्दलही त्यांचा आता आग्रह नाही. या भूमिका लक्षात घेता दोन्ही कम्युनिस्ट पक्षांचे एकीकरण नजीकच्या काळात होण्याची शक्यता नसली तरी काही क्षेत्रात सहकार्य होऊ शकते. डाव्यांच्या एकजुटीच्या प्रयत्नांना त्यातून नव्याने गति मिळेल, देशात जनता पक्षाला पर्याय इंदिरा काँग्रेसऐवजी डावी आघाडीही होऊ शकेल. मात्र त्यासाठी पूर्वीच्या चुका दुरुस्त करून व्यापक कार्यक्रमातून व व्यापक दृष्टिकोनातून कार्य करण्याची डाव्या व लोकशाहीवादी पक्षांची तयारी हवी. □